# पालि - कुसुमावली

(पालि - संपूर्ण आणि संयुक्त अभ्यासक्रमासाठी)



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# पालि - कुसुमावली

(पालि - संपूर्ण आणि संयुक्त अभ्यासक्रमासाठी)

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे -४११००४

प्रथमावृत्ति : २०१२
पुनर्मुद्रण : २०२२

© महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४
सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाचे मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४ यांच्या लेखी परवानगीशिवाय मुद्रण किंवा पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे. तसेच सी.डी., दृक्-श्राव्य फिती, छायांकित प्रती किंवा तशा प्रकारच्या माहिती साठवून ठेवणाऱ्या कोणत्याही विजेवर चालणाऱ्या अथवा यांत्रिक संदेश-वहन पद्धतीचा वापर करता येणार नाही.

प्रस्तुत पुस्तक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या धोरणानुसार संस्कृत-पालि-अर्धमागधी विषय अभ्यास-मंडळाच्या मार्गदर्शनाखाली संपादक मंडळाने तयार केले आहे.

**अभ्यासमंडळ सदस्य** :
प्रा. डॉ. नंदा पुरी (निमंत्रक)
प्रा. माधव मेश्राम (समन्वयक)
प्रा. रामकृष्ण तागडे (विषय तज्ञ)
प्रा. अशोक पैठणे (सदस्य)
प्रा. अरुणा पाटील (सदस्या)
प्रा. डॉ. ज्योत्स्ना खरे (सदस्या)

**संपादक मंडळ सदस्य** :
प्रा. डॉ. मनिष आनंद
प्रा. डॉ. योजना भगत
श्री. चंद्रमणी बागडे
श्री. पंजाब प्रधान
प्रा. विनोद भेले

**कार्यालयीन समन्वयक** : श्री. गोवर्धन सोनवणे

**प्रकाशक** : श्री. शहाजी हरिभाऊ ढेकणे
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४.

**छपाई व वितरण** : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११००४.

**अक्षरजुळणी** : मॅक-स्क्रिप्ट, आसावरी-१०, औंध, पुणे- ४११००७.

**निर्मिती** :
श्री. विवेक गोसावी, नियंत्रक
श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी

**मुखपृष्ठ व सजावट** : श्री घनशाम देशमुख

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रीमवोव

**मुद्रक** :

**मुद्रणादेश क्रमांक** :

# "भारतस्स संविधान"

## उद्देसिका

**मयं, भारतस्स लोक,** भारतस्स एको **बाहुभूमिकं**
**सङ्गणिकावादी धम्मनिरपेक्ख लोकसाही गणरज्ज** रचयतिस्स
च तस्स सब्बे नागरिकानं;
**बाहुजञ्ञ, वित्तिय, च राजनेत्तिक ञाय;**
**वितक्क अभिवेत्ति, विस्सास, सद्धा**
**च उपासना एस्स विमुत्ति;**
**दज्जस च सन्धीस्स समानत्त;**
**एकंस पापेतु कत्वानं ददातिस्स च**
**तं सब्बेस्मिं पुग्गलस्स पतिट्ठा**
**च रट्ठस्स समग्गी च सामग्गीयं**
**एस्स आन दातु बन्धूता**
पवड्ढितुं कितस्स सङ्कप्पपुब्बकं सम्मासङ्कप्प कत्वानं;
**अम्हाकं संविधान सभास्मिं**
अज्ज दिवाङ्क सव्वीसति कत्तिक, एकूनवीसति एकूनपञ्ञासति दिने
इत्थं अयं **संविधान अधिकत च अधिनियत**
कत्वान **सयं पत समप्पयाम.**

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे।।

# पटिञ्ञा

भारतो मम देसो ।
सब्बे च भारतीया मम बान्धवा ।
अत्थि देसविसये मे पेमं ।
मम देसस्स या समिद्धता,
या च विविधताय मण्डिता परम्परा, तस्साहं मानि ।
एतं दायज्जं उपसम्पादेतुं अहं दळ्हपरक्कमो भविस्सामि ।
अहं मातापितुन्नं च आचरियानं च पाचरियानं च
वयो–अनुप्पत्तानं सक्करिस्सामि ।
सब्बे जने अहं सोरताय पटिपज्जिस्सामि ।
अहं देसविसये देसबान्धवविसये च दळ्हभत्तिं
पटिजानामि ।
यं तेसं कल्याणं तं एव होतु मे कल्याणं,
या तेसं समिद्धि सा मे समिद्धि
यं तेसं सुखं तं मे सुखं।

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेल्या 'अभ्यासक्रम आराखडा-२०१०' व 'एन.सी.एफ. २००५' यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार इयत्ता-९वी द्वितीय भाषागटात एक वैकल्पिक भाषा म्हणून 'संपूर्ण व संयुक्त पालि' हा विषय घेऊन पालि भाषेचा अभ्यास करता येतो.

ह्या पाठ्यपुस्तकातील भाग-१ संपूर्णसाठी असून भाग-२ संयुक्तसाठी आहे.

विद्यार्थ्याला पालिभाषेची तोंडओळख इयत्ता-आठवीपासून झालेली असते. परंतु इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता लक्षात घेऊन गद्य व पद्य तसेच 'थूलवाचन' या पाठांची क्रमवार रचना केलेली आहे. काही पाठ मूळ 'पालि-तिपिटक' साहित्यातून घेतले आहेत, तर काही पाठांची रचना नव्याने केलेली आहे. 'मूल्यधिष्ठित शिक्षण' या धोरणाच्या अनुषंगाने व्यवहार-चातुर्य, कौटुंबिक, सामाजिक मूल्यांची ओळख, व्यक्तिगत नीतिमूल्ये या सर्वांचे भान यावे या दिशेने गद्य-पद्य पाठांची निवड करण्यात आलेली असून त्यातील रोचकता व सुलभता यांवर भर देण्यात आला आहे.

तथागत बुद्धाच्या उपदेशाने प्रेरित होऊन अनेक 'थेर व थेरी' यांनी दुक्खमुक्त झाल्यावर स्वकथन केले आहे. त्यापैकी काही गद्य-पद्य पाठ प्रेरणा देणारे आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पर्यावरणाविषयी पाठांचा अंतर्भाव पुस्तकात केला आहे. या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सुसंस्कृत, संयमशील, विचारशील, सामाजिक जाणिवा निर्माण करणारे ठरावे असा हेतू आहे. पाठ्यपुस्तकाच्या वैशिष्ट्यपूर्ण अंतरंगाचा विचार करतांना विद्यार्थ्यांना पालिभाषेसंबंधी अभिरुची व आत्मीयता वाढीस लागेल. प्रत्येक पाठात अनुरूप शब्दार्थ, तळटीपा, स्वाध्याय आणि प्रत्येक गद्य-पद्य पाठास प्रस्तावना दिल्यामुळे विद्यार्थ्यांना पाठाचा मथितार्थ समजेल अशी आशा आहे. तसेच पाठ्यपुस्तकात व्याकरणाची परिशिष्टे आवश्यक तेवढीच समाविष्ट केली आहेत.

प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार करण्याच्या कामी पालि विषय अभ्यास मंडळाचे आमंत्रक व इतर सदस्य, तसेच राज्य मंडळाने नियुक्त केलेल्या संपादक मंडळाचे सदस्य या सर्वांनी परिश्रम घेऊन पाठ्यपुस्तक तयार केले आहे.

पालिभाषेचे शिक्षक व तज्ज्ञशिक्षक यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक व भारतीय समाज या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

**(श्री. सर्जेराव जाधव)**
**अध्यक्ष**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक
शिक्षण मंडळ, पुणे - ४११००४

पुणे :

दिनांक : १८/०५/२०१२

# पाठानुक्कमो


| अ.क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| **भाग -१ (पालि संपूर्ण)** | | |
| **गज्जो** | | |
| १. | तिरतन गुणानि | १ |
| २. | पठम धम्मसंङ्गीति निदानं | ३ |
| ३. | तथागत पच्छिमवाचा | ५ |
| ४. | अञ्ञमञ्ञं सल्लपनं | ७ |
| ५. | कोसिय जातकं | ९ |
| ६. | नालन्दा विस्सविज्ञालय | ११ |
| ७. | पब्बतङ्ग पञ्हो | १३ |
| ८. | सागल वण्णना | १५ |
| ९. | पियदस्सि असोको धम्मरञ्ञो | १७ |
| १०. | सल्लविद्धो पुरिसो | १९ |
| ११. | सुरापान जातकं | २१ |
| १२. | बोधिरुक्खो अहं ताता | २३ |
| **पज्जो** | | |
| १. | उट्ठान सुत्तं | २५ |
| २. | चन्दा थेरी | २७ |
| ३. | हिरि सुत्तं | २९ |
| ४. | राहुल सुत्तं | ३१ |
| ५. | सुखवग्गो | ३३ |
| ६. | एवं रम्मो हि अस्समो | ३५ |
| ७. | अञ्ञासिकोण्डञ्ञ थेरो | ३८ |
| **थुलवाचन** | | |
| १. | इस्सत सुत्तं | ४० |
| २. | वसल सुत्तं | ४२ |
| **परिशिष्ट** | | |
| १. | टीपा व निबंधाचे विषय | ४४ |
| २. | व्याकरण | ४४ |
| ३. | पालिभाषेचे महत्त्व | ५५ |
| ४. | तोंडीपरीक्षा | ५७ |
| ५. | प्रश्नपत्रिका आराखडा | ५८-५९ |

| अ.क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| **भाग -२ (पालि संयुक्त)** | | |
| **गज्जो** | | |
| १. | तिरतन गुणानि | ६० |
| २. | अञ्ञमञ्ञं सल्लपनं | ६२ |
| ३. | तथागतो सम्मासम्बुद्धो | ६४ |
| ४. | सुजला सुफला भूमि | ६६ |
| ५. | वानरिन्दो च कुम्भिलो च | ६८ |
| ६. | एकङ्गदस्सिनो विवदन्ति | ७० |
| ७. | नामेन सिद्धि नत्थि | ७२ |
| ८. | चत्तारो वलाहकूपमा पुग्गला | ७४ |
| ९. | पुण्णो भिक्खू | ७६ |
| **पज्जो** | | |
| १. | मधूर वाचा | ७८ |
| २. | सोपाको थेरो | ८० |
| ३. | महापजापति गोतमी | ८२ |
| ४. | कसिभारद्वाज सुत्तं | ८४ |
| **परिशिष्ट** | | |
| १. | टीपा | ८६ |
| २. | व्याकरण | ८६ |
| ३. | तोंडी परीक्षा | ९४ |
| ४. | प्रश्नपत्रिकेचा आराखडा | ९५-९६ |

पालि - संपूर्ण भाग-१

## गज्जो विभागो - पठमो पाठो ।

# तिरतन गुणानि ।

सम्बोधिप्राप्तीनंतर तथागतांनी 'चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय बहुजन सुखाय' असा भिक्खू-सङ्घाला फार मोठा संदेश देत सतत ४५ वर्षे विचरण केले. पालि तिपिटकातील 'विनयपिटक' या ग्रंथामध्ये याचा उल्लेख प्राप्त होतो.

तथागतांनी तत्कालीन भारतीय समाजालाच नव्हे तर संपूर्ण जगाला आपल्या बौद्धिक, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक नीतिमूल्यांद्वारे 'नत्थि अतीता च, नत्थि अनागतो च' अशी फार मोठी देणगी दिलेली आहे. बुद्धकालीन श्रमण-ब्राह्मण-परिव्राजकांमध्ये विविध विषयांवर परस्परांमध्ये चर्चा होत असताना त्यांचे जेव्हा एकमत होत नव्हते, त्यांच्यामध्ये काही शंका उपस्थित होत असत अशावेळी आपल्या शंका-निरसनासाठी ते तथागताकडे येत होते. तत्पूर्वी ते बुद्ध, धम्म आणि सङ्घ या तीन रत्नांच्या कल्याणकीर्तिची प्रशंसा करीत असत, त्याचेच वर्णन या पाठामध्ये आलेले आहे.

---



इतिपि सो भगवा अरहं, सम्मासम्बुद्धो, विज्जा-चरणसम्पन्नो, सुगतो, लोकविदू, अनुत्तरो, पुरिसदम्म-सारथि, सत्था देवमनुस्सानं बुद्धो भगवा' ति ।

स्वाक्खातो भगवता धम्मो सन्दिट्ठिको अकालिको एहिपस्सिको ओपनेय्यिको पच्चत्तं वेदितब्बो विञ्ञूही' ति ।

सुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, उजुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, ञायप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, सामीचिप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, यदिदं चत्तारि पुरिसयुगानि, अट्ठ पुरिसपुग्गला, एस भगवतो सावकसङ्घो, आहुनेय्यो, पाहुनेय्यो, दक्खिणेय्यो, अञ्जलिकरणियो अनुत्तरं पुञ्ञक्खेत्तं लोकस्सा' ति ।

(*Dr. Babasaheb Ambedkar - Writing and Speeches, Vol. 16 - आवश्यक बदल करून*)

### सद्दत्थ (शब्दार्थ)

**भगवा** (पुं.) - तृष्णामुक्त, भगवन्त

**सम्मासम्बुद्धो** (पुं.) - (सम्मा+सम्बुद्ध) संपूर्ण ज्ञानी

**सुगतो** (वि.) - चांगल्या गतीला प्राप्त झालेला

**लोकविद्** (वि.) - (लोक + विद्) बुद्धासंदर्भात संबोधिलेले गुणवाचक विशेषण, विश्वाचे स्वरुप जाणणारा

**सत्था** (पुं. प.वि.) - शास्ता, तथागत

**बुद्धो** (वि.) - (बुद्ध) ज्ञानी, बुद्धिमान

**अरहं** (पुं.) - अर्हत, जीवनमुक्त

**विज्जाचरणसम्पन्नो** (नपुं.) - (विज्ज+आचरण) विद्या आणि आचरणाने युक्त

**अनुत्तर** (नपुं.) - सर्वोत्तम

**पुरिसदम्मसारथी** (अकुशल मार्गगामी) - पुरुषांचे दमन करणारा सारथी

**स्वाक्खात** (वि.) - (सु-आख्यात) चांगल्याप्रकारे व्याख्या केलेला

**धम्मो** (पुं.) - धम्म, सिद्धान्त, स्वभाव, सत्य, सदाचार
**अकालिको** - (अ+कालिक) - तात्काळ, वेळीच
**एहिपस्सिक** - (वि.) - जो धम्म सर्वांना सूचित करतो की, या आणि परीक्षा करून पहा, या अनुभवा
**वेदितब्बो** (विद्) - जाणणे, जाणण्यायोग्य
**सावकसङ्घ** (पुं.) - शिष्यांचा समूह
**उजु** (वि.) - सरळ
**सामीचि-पटिपन्न** (वि.) - उचित मार्गावर आरूढ
**चत्तारि** - चार
**युग** (नपुं.) - जोडी
**आहुनेय्यो** (वि.) - भेट देण्यायोग्य
**दक्खिणेय्यो** (वि.) - दान देण्यायोग्य
**सन्दिट्ठिको -सन्दिट्ठिक** - (वि.) दृष्टीस पडणारा, दिसून येणारा
**ओपनेय्यिको** (वि.) - (उपनय + इक) जवळ नेणारा
**पच्चत्तं** (क्रि.वि.) - पृथक-पृथक, व्यक्तिगत
**विञ्ञू** (वि.) - बुद्धिमान, विद्वान, ज्ञाता
**सुप्पटिपन्न** (वि.) - सुमार्गावर आरूढ, सुमार्गावर जाणारा
**ञायप्पटिपन्न** (वि.) - न्याय्य मार्गाला नेणारा, चांगल्या मार्गाला नेणारा
**यदिदं** (वि.) - (यद्+इदम) - म्हणजे
**पुग्गल** (पुं.) - पुद्‌गल, व्यक्ती
**अट्ठ** (वि.) - आठ
**पाहुनेय्यो** (वि.) - आदरातिथ्य करण्यायोग्य
**अञ्जलिकरणियो** (वि.) - हात जोडण्यायोग्य

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) ‘बुद्ध’ म्हणजे काय ?

(२) ‘धम्म’ म्हणजे काय ?

(३) ‘सङ्घ’ म्हणजे काय ?

**२. खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) बुद्धस्स धम्मो किदिसो होति ?

(२) बुद्धस्स सावकसङ्घो किदिसो होति ?

**टिपणे**

- बुद्ध, धम्म आणि सङ्घ या शब्दांची ओळख व त्यांचे गुणकार्य सांगणे.
- बुद्ध, धम्म आणि सङ्घ हे ‘तिरतन’ सर्व रत्नांपेक्षा मौल्यवान कसे आहेत ते जाणणे.

★★★

दुतियो पाठो ।

# पठम धम्मसङ्गीति निदानं ।

तथागत बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर वितरागी आणि अवितरागी भिक्खूंची शारीरिक, मानसिक व सामाजिक अवस्था कशी होती याची माहिती या पाठामध्ये आलेली आहे.

वृद्ध सुभद्र जो अवितरागी आहे, अविनयशील आहे तो भिक्खूंना कसे स्वैराचारी जगण्यास प्रवृत्त करतो व सङ्घभेदी कृत्यांना कशी चालना देतो याचे दिग्दर्शनही या पाठामध्ये करण्यात आलेले आहे. पठमधम्मसङ्गीतीच्या आयोजनाची व धम्म आणि विनयाचे संगायन करण्याच्या पार्श्वभूमीची प्राथमिक कारणे या पाठामध्ये पाहायला मिळतात.

---

तेन खो पन समयेन सुभद्दो नाम वुड्ढपब्बजितो तस्सं परिसायं निसिन्नो होति । अथ खो सुभद्दो वुड्ढपब्बजितो ते भिक्खू एतदवोच - ''अलं, आवुसो, मा सोचित्थ, मा परिदेवित्थ । सुमुत्ता मयं तेन महासमणेन उपद्दुता च होम - 'इदं वो कप्पति, इदं वो न कप्पती' ति । इदानि पन मयं यं इच्छिस्साम तं करिस्साम, यं न इच्छिस्साम न तं करिस्सामा'' ति । अथ खो आयस्मा महाकस्सपो भिक्खू आमन्तेसि - ''अलं, आवुसो, मा सोचित्थ, मा परिदेवित्थ । ननु एतं, आवुसो, भगवता पटिगच्चेव अक्खातं - 'सब्बेहेव पियेहि मनापेहि नानाभावो विनाभावो अञ्ञथाभावो । तं कुतेत्थ आवुसो, लब्भा । यं तं जातं भूतं सङ्खतं पलोकधम्मं तं तथागतस्सा पि सरीरं मा पलुज्जी ति, नेतं ठानं विज्जती'' ति ।

*(दीघनिकाय - महापरिनिब्बाण सुत्त)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**सुभद्दो** - सुभद्र - हा सुभद्र इथे वेगळा आहे जो अविनयशील, अवितरागी असून अर्हत नाही, मात्र तथागतांचा अंतिम शिष्य हा वेगळा आहे जो अर्हत होता.

**सोचति** (क्रिया.) - शोक करणे

**सुमुत्त** (कृदन्त) - सुविमुक्त, चांगल्याप्रकारे विमुक्त

**कप्पति** (क्रिया.) - योग्य असणे

**करिस्साम** - करणार, करेन, करेल

**अलं** (अव्यय) - पर्याप्त

**आवुसो** (अव्यय, सम्बोधन पद) - मित्र! आयुष्मान!

**पिय** (वि.) - प्रिय

**नाना** (अव्यय) - अनेक, विविध, भिन्न-भिन्न

**विना** (अव्यय) - रहित

**कुतेत्थ** (क्रि.वि.) - कुठे

**जातं** (नपुं.) - उत्पन्न, घटित

**सङ्खत** (कृदन्त) - संस्कृत, समुत्पन्न

**पलुज्जी, पलुज्जति** - खाली पडतो, तुटून जातो

**विज्जति** (क्रिया.) - विद्यमान असणे

**परिदेव** - विलाप करणे, रडणे

**उपद्दुत** (कृदन्त) - उपद्रुत, उपद्रवी, कष्ट देणारा, त्रास देणारा

**इच्छति** (क्रिया.) - कामना करणे, इच्छा करणे

**अथ** (अव्यय) - तेव्हा

**ननु** (अव्यय) - निश्चित, निश्चयाने

**अक्खात** (क्रि.वि.) - व्याख्या केल्या गेलेला

**मनाप, मानसिक** (वि.) - मनोनुकूल, आकर्षक

**भाव** (पुं.) - स्वभाव

**अञ्ञथा** (अव्यय) - अन्यथा, दुसऱ्या प्रकारे

**लब्भा** (अव्यय) - शक्य, संभव

**भूत** (कृदन्त) - उत्पन्न झाला

**तथागत** (यथावादी, तथाकारी, यथाकारी, तथावादी) - जसे बोलतो तसे करतो, जसे करतो तसे बोलतो

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सुभद्र प्रव्रजिताने इतर भिक्खूंना काय म्हटले ?

(२) आयुष्मान महाकस्सपांनी भिक्खूंना कसे संबोधित केले ?

(३) या पाठाचा सारांश सांगा.

**२. खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सुभद्दो कुतो निसिन्नो होति ?

(२) महाकस्सपो भिक्खू किं आमन्तेसि ?

**३. रूपे ओळखा.**

तथागतस्स, आवुसो, करिस्साम ।

**टिपणे**

- 'पालि-तिपिटक' साहित्य निर्मितीची पार्श्वभूमी कथन करणे.
- तिपिटकाचे वर्गीकरण करा.

★ ★ ★

तुतियो पाठो ।

# तथागत पच्छिमवाचा ।

पालि तिपिटकसाहित्यामध्ये 'दीघनिकाय' ग्रंथाचा समावेश होतो. 'दीघनिकाय' या ग्रंथामध्ये ३४ (चौतीस) सुत्त असून 'महापरिनिब्बाणसुत्त' त्यांपैकीच एक सुत्त आहे. 'तथागत पच्छिमवाचा' हा पाठ त्यामधून घेतलेला आहे.

या पाठामध्ये तथागत, भिक्खू आनंद यांना उद्देशून म्हणतात की, ''आनन्द ! हे वचन होऊन गेलेल्या शास्त्याचे आहे, आता आपले कोणी शास्ता नाहीत असे समजू नका. माझ्यानंतर तुमचे शास्ता धम्म आणि विनय हेच असतील .... .'' अशाप्रकारे या पाठामध्ये माहिती आलेली असून बुद्धकालीन भिक्खू-सङ्घाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यास हा पाठ अत्यंत महत्त्वाचा आहे.



अथ खो भगवा आयस्मन्तं आनन्दं आमन्तेसि - ''सिया खो पनानन्द, तुम्हाकं एवमस्स - 'अतीतसत्थुकं पावचनं, नत्थि नो सत्था' ति । न खो पनेतं, आनन्द, एवं दट्ठब्बं । यो वो आनन्द, मया धम्मो च विनयो च देसितो पञ्ञत्तो, सो वो ममच्चयेन सत्था' ति । यथा खो पनानन्द, एतरहि भिक्खु अञ्ञमञ्ञं आवुसो वादेन समुदाचरन्ति, न खो ममच्चयेन एवं समुदाचरितब्बं । थेरतरेन आनन्द, भिक्खुना नवकतरो भिक्खु नामेन वा गोत्तेन वा आवुसो वादेन वा समुदाचरितब्बो । नवकतरेन भिक्खुना थेरतरो भिक्खु 'भन्ते' ति वा 'आयस्मा' ति वा समुदाचरितब्बो । आकङ्खमानो, आनन्द, सङ्घो ममच्चयेन खुद्दानुखुद्दकानि सिक्खापदानि समूहनतु । अथ खो भगवा भिक्खु आमन्तेसि - 'हन्द दानि भिक्खवे, आमन्तयामि वो - 'वयधम्मा सङ्खारा, अप्पमादेन सम्पादेथा'' ति । अयं तथागतस्स पच्छिमा वाचा ।

(*महापरिनिब्बाणसुत्तं*)

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**पन** (अव्यय) - आणि, आता, परंतु

**पावचन** (नपुं.) - प्रवचन, बुद्धोपदेश

**विनय** (पुं.) - भिक्खू-जीवनाचे नियम-उपनियम

**पञ्ञत्त** (कृदन्त) - बनविलेले नियम, प्रज्ञप्त केलेली घोषणा, बुद्धिमानता

**समुदाचरण** (नपुं.) - आचरण, अभ्यास, व्यवहार

**थेरतरेन** - स्थविरांच्या व्यतिरिक्त, स्थविरांपेक्षा इतर

**नवकतर** (वि.) - तरुणापेक्षाही तरुण

**आकङ्ख** (क्रिया.) - इच्छा, आकांक्षा करणे

**सङ्घ** (पुं.) - समूह, परिषद, भिक्खुपरिषद

**खुद्दानुखुद्दक** (वि.) - लहान-मोठे

**समूहनति** - (क्रिया.) - मुळापासून उपटून टाकणे

**सङ्खार** (पुं.) - संस्कार

**सत्थु** (पुं.) - शास्ता

**दट्ठब्बो** (क्रिया.) - पाहिले पाहिजे

**देसित** (कृदन्त) - उपदिष्ट, उपदेशिलेले

**ममच्चयेन** - माझ्यानंतर

**अञ्ञमञ्ञ** (वि.) - परस्पर

**थेर** - स्थविर, ज्येष्ठ भिक्खू, जो कमीतकमी दहा वर्षांचा उपसम्पन्न भिक्खू असावा

**भन्ते** (भदन्त) (सम्बोधनरूप) - शेवटच्या श्वासापर्यंत लोकांच्या, जगाच्या संसाराच्या कल्याणाची भावना जोपासणारा

**सिक्खापद** (नपुं.) - शीलसंबंधित नियम, शिक्षापद

**अप्पमाद** (वि.) - अप्रमाद, जागृकता

**सम्पादेति** (क्रिया.) - पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) तथागताने भिक्खू आनंदला काय सांगितले ?

(२) तथागताने भिक्खू आनंदला नवीन भिक्खूसंदर्भात काय सांगितले ?

(३) तथागताची अंतिम वाणी कोणती ?

**२. जोड्या जुळवा.**

| (अ) | (ब) |
|---|---|
| (१) वयधम्मा सङ्खारा | (१) पच्छिमा वाच । |
| (२) अतीत सत्युकं पावचन | (२) सो वो ममच्चयेन सत्था |
| (३) अयं तथागतस्स | (३) नत्थि नो सत्था' ति । |
| | (४) अप्पमादेन सम्पादेथा' ति । |

**टिपणे**

- निसर्ग व पर्यावरण सांगणे.
- निसर्गाचा अभ्यास करणे.

★ ★ ★

# चतुत्थो पाठो ।

# अञ्ञमञ्ञं सल्लपनं ।

प्रस्तुत पाठाचा हेतू विद्यार्थ्यांमध्ये पालिभाषेतून संवाद-कौशल्य विकसित व्हावे हा आहे.




**धम्मपालो** - त्वं पालिभासा जानसि ?

**रट्ठपालो** - अहं थोकं थोकं जानामि ?

**धम्मपालो** - त्वं पालिभासा सल्लापितुं सक्कोति ?

**रट्ठपालो** - आम, थोकं थोकं सल्लपिंतु सक्कोमि ।

**धम्मपालो** - त्वं नामं किं ?

**रट्ठपालो** - मम नामं रट्ठपालो ।

**धम्मपालो** - त्वं कुहिं वससि ?

**रट्ठपालो** - अहं नागपूर नगरे दिक्खाभूमिस्स समिपे वसामि ।

**धम्मपालो** - तव भातुभगिनि किं करोन्ति ?

**रट्ठपालो** - एको वाणिजो दुतियो कस्सको एका भगिनि उग्गण्हति ।

**धम्मपालो** - भगिनि, तव पाठसालाया नाम किं अत्थि ?

**भगिनि** - मम पाठसालाय नामं महामाया कञ्ञा माज्झमिकं विज्जालयो अत्थि ।

**धम्मपालो** - त्वं किं कम्मं कातुं इच्छति ?

**भगिनि** - अहं पालि भासाय अज्झायका भवितुं इच्छामि ।

**धम्मपालो** - साधु, साधु, साधु ।

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**त्वं** - तु
**अहं** (प्र.पु. सर्वनाम) - मी
**भवितुं** ('भू' धातू - तुमन्त) - होण्याची शक्यता
**कुहि** - कुठे
**समिप** - जवळ

**अज्झायका** - शिक्षिका
**अत्थि** - आहे
**सक्कोति** - शक्य
**कातुं** - ('कर' धातू, तुमन्त) करण्यासाठी

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) मुलीच्या शाळेचे नाव काय ?

(२) ती कोणते कार्य करू इच्छिते ?

(३) रट्ठपाल कोठे राहतो ?

**२. खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) त्वं कुहिं वससि ?

(२) त्वं भातुभगिनि किं करोति ?

(३) त्वं विज्जालयं नाम किं अत्थि ?

**३. रिकाम्या जागा भरा.**

(१) अज्झायका - - - - इच्छामि । (भव)

(२) दिक्खाभूमिस्स - - - - वसामि । (समिप)

**टिपणे**

- पालि संवाद-कौशल्य वृद्धिंगत करणे.
- पालिभाषेतील मूल्यांचा दैनंदिन जीवनात उपयोग करणे, पालि वाक्य दैनंदिन व्यवहारात वापरणे.

★ ★ ★

पञ्चमो पाठो ।

# कोसिय जातकं ।

प्रस्तुत पाठ 'जातक' ग्रंथातून घेतला आहे. व्यक्तीला तिच्या कर्माचे निश्चित असे फळ मिळते. ह्यासाठीच प्रत्येकाने आपले कार्य योग्य वेळी केले पाहिजे. कोणतेही काम अवेळी केले तर इच्छित फळ मिळत नाही. एवढेच नव्हे तर एखादे काम अवेळी केल्याने त्याचे चांगले फळ मिळण्याऐवजी दुष्परिणामच भोगावे लागतात, हे या पाठात सांगितले आहे.

---

अतीते वाराणसी राजा अकाले निक्खमित्वा उय्याने खन्धावारं निवेसेसि । तस्मिं काले उलूक - सकुणो वेळुगुम्बं पविसित्वा निलीयि । काकसेना आगन्त्वा ''निक्खन्तमेव तं गण्हिस्सामा'' ति परिवारेसि । सो सुरियत्थगमनं अनोलोकेत्वा व अकालस्सेव निक्खमित्वा पलायितुं आरभि । अथ नं काका परिवारेत्वा तुण्डेहि कोट्टेन्ता परिपातेसुं । राजा बोधिसत्त आमन्तेत्वा ''किन्नु खो पण्डित इमे काका कोसियं परिपातेन्ती' ति'' पुच्छि! बोधिसत्तो ''अकाले महाराज अत्तनो वसनट्ठाना निक्खमन्तुं एवरूपं दुक्खं पटिलभन्ति येव । तस्मा अकाले अत्तनो वसनट्ठाना निक्खमिन्तुं न वट्टती'' ति । इममत्थं पकासेन्तो इमं गाथद्वयमाह —

''काले निक्खमना साधु, नाकाले साधु निक्खमो ।
अकालेन हि निक्खम्म एककंपि बहू जनो ॥
न किञ्चि अत्थं जोतेति धंकसेना व कोसियं ।
धीरो च विधिविधानञ्ञू, परेसं विवरन्तगू ।
सब्बामित्ते वसीकत्वा, कोसियो व सुखी सिया ॥''
राजा बोधिसत्तस्स वचनं सुत्वा निवत्ति ।



*(२२६ क्रमांक 'जातका'वरून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**कोसिय** (पुं.) - कौशिक, घुबड
**निक्खमित्वा** (पूर्वकालवाचक त्वान्त अव्यय) - बाहेर पडून
**निवेसेसि** (भू.का.तृ.पु.ए.व.) - राहिला
**सकुण** (पुं.) - पक्षी
**पविसित्वा** (पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) - प्रवेश करून
**काकसेना** (स्त्री.) - कावळ्यांचा समूह, सेना
**परिवारेसि** - वेढा दिला
**अनोलोकेत्वा** (अन+ओ+लोक पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) न पाहता

**अकाल** (पुं.) - अ-वेळी
**उलूक** (पुं.) - घुबड
**वेळुगुम्ब** (पुं.) - बांबूचे वन
**निलीयी** - लपला
**गण्हिस्साम** - पकडणार, पकडू
**सुरियत्थ** (पुं.) - सूर्यास्त
**पलायितुं** (तुमन्त अव्यय) - पळण्यास
**आरभि** - सुरुवात केली
**कोट्टेन्त** (व.का.धा.वि.) - टोचत टोचत

**तुण्डं** (नपुं.) - तोंड, चोच
**परिपातेसु** (भू.का.तृ.पु.अ.व.)(प्रयोजक रूप) - खाली पडणे
**पकासेन्त** - प्रकाशित करीत
**धंकसेना** (स्त्री.) - कावळ्यांची सेना
**विवरन्तगू** (पुं.) - छिद्र, त्रुटी, दोष ओळखणारा
**न वट्टति** - योग्य नाही
**जोतेति** - साध्य करणे, प्रकट करणे
**विधिविधानञ्ञू** (पुं.) - कायदे व नियम जाणणारा
**सब्बामित्त** (सब्ब+अमित्त, नपुं.) - सर्व शत्रू
**निवत्ति** - परत फिरला

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) अवेळी घराबाहेर पडल्याने कोणते दुष्परिणाम भोगावे लागतात ?
(२) राजा परत का फिरला ?

**२. खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) वाराणसी राजा कुहिं निवेसेसि ?
(२) उलूकसकुणो कुतो निलियी ?
(३) काका परिवारेत्वा तुण्डेहि कोट्टेन्ता किं परिपातेसुं ?
(४) किं अकाले अन्तनो वसट्ठाना निक्खमितुं न वट्ठती ?

**३. जोड्या जुळवा.**

| (अ) | (ब) |
|---|---|
| (१) कालेनिक्खमनासाधु | (१) एककंपि बहूजनो । |
| (२) अकालो हि निक्खम | (२) नाकाले साधु निक्खमो । |
| (३) न किञ्चिअत्थ जोतेति | (३) कोसियो व सुखी सियो । |
| (४) सब्बमित्ते वसीकत्वा | (४) धंकसेना व कोसियं । |
| | (५) वचन सुत्वा निवन्ति । |

**टिपणे**

- अवेळी बाहेर पडण्याचे दुष्परिणामच होतात.
- वेळेचे महत्त्व ओळखून काम करणे.

★★★

# छट्ठो पाठो ।

# नालन्दा विस्सविज्जालय ।

नालंदा विद्यापीठ हे जगप्रसिद्ध प्राचीन भारतीय विद्यापीठ होते. येथे देशविदेशांतील एक हजार प्राध्यापक आणि दहा हजार विद्यार्थी अध्ययन - अध्यापन करीत असत. ही ज्ञानाची परंपरा जवळजवळ इ.स. बाराव्या शतकापर्यंत यथास्थित होती. नालंदा विद्यापीठातील ग्रंथालय फार समृद्ध होते. थोर दार्शनिक आचार्य नागार्जुन व चिनी पर्यटक ह्युएनत्संगासारखे महापुरुष येथे राहिले. विद्यापीठाचे वर्णन ह्युएनत्संगाच्या प्रवास वर्णनात सविस्तर आढळते.

---

पाचीन जम्बुदीपे सोगतमहाविज्ञायतनेसु अतिपाकटभावप्पत्तम्पन नालन्दा विस्सविज्जायतनमहोसि । सो पन विस्सविज्जालयो सकलमगधरट्ठे 'धम्मगञ्ञ' नामेन विदितो भवि । भारतीय पोत्थकालयान महन्तमो तस्स विज्जायतनस्स पोत्थकालयो रतनोदधि नामाही नवभूमकं पासादे पतिट्ठा पितो अहोसि । किट्ठुप्पत्तितो पठम सतवच्छरतो पट्ठाय अथवा तस्मिं विस्सविज्जालये आचरियभावेन वुत्यस्स नागज्जुन महाथेरस्स कालतो पट्ठाय, याव किट्ठुप्पत्तितो अट्ठमसतसंवच्छर अयं निखिलं सत्थालयो अभिवुड्ढिया अनूनो पवत्तित्थ ।





अट्ठमसतसंवच्छरे वत्तमाने इमस्स विस्सविज्जायतनस्स नातिदूरट्ठाने उदन्तपुरियं पालराजुन अनुग्गहेन कारापितो पन महाविञ्ञालयो सेट्ठतरभावं सम्पापुणिं । सत्तमसतसंवच्छरस्स आदिम्हि येव युवाङ्गच्छवाङ्ग नामो महापरियटको चीनदेसीय महाथेरो एतं नालन्दा विस्सविज्जायतनं पत्वा तत्थ पण्डिताचरियानं सन्तिका पालिभासा, बुद्धधम्ममुग्गहेत्वा तस्स विस्सविज्जायतनस्स पवत्तियो च आलोकेत्वा महन्त परियटनवुत्तन्तु चीन भासाय लिखित्वा ठपेसि ।

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**पाचीन** (वि.) - प्राचीन

**अतिपाकटभावप्पत्तम्पन** (अति+पाकट+भाव+पत्त+पन) - सर्वांत जास्त प्रसिद्धीप्राप्त

**धम्मगञ्ञ** (पुं.) - धम्माचे भांडार

**महन्तमो** (वि.) - सर्वांत मोठा

**जम्बुदीप** (पुं.) - भारताचे पालिसाहित्यात आलेले नाव

**विस्सविज्जायतन** (पुं.) - (विस्सविज्जा+आयतन) - विश्वविद्यालय

**पोत्थकालय** (नपुं.) - पुस्तकालय

**रतनोदधि** (नपुं.) - रत्नांचा सागर

**नवभूमक** (वि.) - नऊमजली

**किट्‌ढुप्पत्तितो** (पुं.) - येशू ख्रिस्ताच्या उत्पत्तिच्या, जन्मापासून
**अनुनो** (वि.) - सतत
**कारापिनो** - उभारलेला
**पवत्ति** (स्त्री.) - घटना, प्रसंग
**परियटनवुत्तन्त** - प्रवास वर्णन
**लिखित्वा** (पूर्वकालवाचक त्वान्त अव्यय) - लिहून
**सन्तिके** (वि) - जवळ

**पठमसतसंवच्छरतो** (पुं.) - पहिल्या शतकापासून
**नातिदूर** (वि.) - जवळ
**पत्वा** (पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) - पोचून
**आलोकेत्वा** (पूर्वकालवाचक त्वान्त अव्यय) - अवलोकन करून
**उग्गहेत्वा** (पूर्वकालवाचक त्वान्त अव्यय) - शिकून

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) नालंदा विद्यापीठाची सुरुवात केव्हा झाली ?
(२) त्यातील पुस्तकालय किती विशाल होते ?
(३) नालंदा विद्यापीठात कोणता चिनी प्रवासी केव्हा आला होता ?
(४) ‘नालंदा’सारखे आणखी कोणते बौद्ध विद्यापीठ होते ?

**टिपणे**

- प्राचीन भारतातील उच्च शिक्षणप्रणाली समजून दयावी.
- विहार, महाविहार यांमधून आंतरराष्ट्रीय बौद्ध विद्यापीठे कशी निर्माण झाली ह्याची माहिती घेणे.

★★★

सत्तमो पाठो ।

# पब्बतङ्ग पञ्हो ।

प्रस्तुत भाग 'अनुपिटक' पालि-वाङ्मयातील असून 'मिलिन्दपञ्हो' या ग्रंथातून घेतला आहे. यामध्ये भन्ते नागसेन यांनी मिलिन्दराजाला पर्वताच्या पाच गुणांविषयीचे कथन केलेले आहे. या पाठातून निसर्गविषयक विचार दिसून येतात.





''भन्ते नागसेन, पब्बतस्स पञ्च अङ्गानि गहेतब्बानी' ति य वदेसि, कतमानि तानि पञ्च अङ्गानि गहेतब्बानी' ति ? ''यथा, महाराज, पब्बतो अचलो अकम्पितो असम्पवेधी, एवमेव खो, महाराज, योगिना योगावचरेन सम्मानने विमानने सक्कारे असक्कारे गरूकारे अगरूकारे यसे अयसे निन्दाय पसंसाय सुखे दुक्खे इट्ठानिट्ठेसु सब्बत्थ रूपसद्दगन्धरसफोट्ठब्ब धम्मेसु रजनीयेसु न मुय्हितब्बं, न कम्पितब्बं न चलितब्बं, पब्बतेन विय अचलेन भवितब्बं । इदं, महाराज, पब्बतस्स पठमं अङ्गं गहेतब्बं ।



पुन च परं महाराज, पब्बतो थद्धो न केनचि संसट्ठो, एवमेव खो, महाराज, योगिना योगावचरेन थद्धेन असंसट्ठेन भवितब्बं । न केनचि संसग्गो करणीयो । इदं, महाराज, पब्बतस्स दुतियं अङ्गं गहेतब्बं ।

पुन च परं, महाराज, पब्बते बीजं न विरूहति, एवमेव खो, महाराज, योगिना योगावचरेन सकमानसे किलेसा न विरूह--पेतब्बा । इदं, महाराज, पब्बतस्स ततियं अङ्गं गहेतब्बं ।

पुन च परं, महाराज, पब्बतो अच्चुग्गतो ति । एवमेव खो महाराज, योगिना योगावचरेन ञाणच्चुग्गतेन भवितब्बं । इदं, महाराज, पब्बतस्स चतुत्थं अङ्गं गहेतब्बं ।

पुन च परं, महाराज, पब्बतो अनुन्नतो-अनोनतो, एवमेव खो महाराज, योगिना योगावचरेन उन्नतावनति न करणीया । इदं महाराज, पब्बतस्स पञ्चमं अङ्गं गहेतब्बं ।

*(मिलिन्दपञ्हो - ओपमवग्गो)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**मुञ्हति** (क्रि.) - विसरतो
**भद्ध** (वि.) - कठोर, कठीण, कडक
**अनुन्नतो** - खाली झुकत नाही तो

**चल** (वि.) - अस्थिर, चंचल
**अच्चुग्गत** (वि.) - अतिशय उंच
**योगि** - भिक्खू

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) पर्वतांचे पाच गुण कोणते ?

(२) पर्वताचे गुण निर्वाणापर्यंत कसे घेऊन जातात - स्पष्ट करा.

## टिपणे

- निसर्ग व पर्यावरण सांगणे
- निसर्गाचा अभ्यास करणे

★★★

## अट्ठमो पाठो ।

# सागल वण्णना ।

पालि-वाङ्मयातील एक अत्यंत लोकप्रिय ग्रंथ म्हणजे 'मिलिन्दपञ्हो' (मिलिंद प्रश्न) हा होय. या ग्रंथात बॅक्टिअन राजा ग्रीक देशाचा मिनॅन्डर (सुमारे इ.स. पूर्व २रे शतक) व बौद्ध भिक्खू नागसेन यांचा प्रश्नोत्तरोत्तम संवाद आहे. इ.स. पूर्वच्या पहिल्या शतकात या ग्रंथाची रचना झाली असावी. मिलिन्द राजाच्या सागलनगर या राजधानीच्या वर्णनाने ग्रंथाला आरंभ होतो. सागल (सियालकोट) वर्तमान पाकिस्तानातील एक शहर. देशाच्या विभाजनापूर्वी ते भारतात होते. या वर्णनात अनेक मनोरंजक उल्लेख आलेले आहेत. त्यातील नगर-रचना, व्यापारी लोक, नगरवासी यांविषयीचे उल्लेख विशेष लक्षणीय आहेत.

---

अत्थि योनकानं नानापुटभेदन सागलं नाम नगरं नदी पब्बत सोभितं रमणीय भूमिभाग नदीपब्बतेहि सोभितं, आरामेहि, उय्यानुपवनेहि, तळाकेहि, पोक्खरणीहि च सम्पन्नं । सुतवन्ते हि तं तथा निम्मितं यथा विविधेहि दळ्हेहि च — अट्टालकोट्ठकेहि गम्भीराय परिखाय पण्डरेन पाकारेन तं सुरक्खितं होति । तेन सब्बे पच्चअत्थिका च पच्चामित्ता च निहता । तस्स वीथियो चतुक्कसिङ्घाटकेहि तं नगरं सुविभत्तं करोन्ति । सुप्पसारितेहि अनेकविधेहि वरभण्डेहि परिपूरितानि आपणानि, हिमगिरिसिखरसदिसा निसतसहस्सानि वरभवनानि, वरगोपुरानि च तस्स नगरस्स मण्डनानि । गज - हय - रथ - पत्तिसमाकुलं तं नगरं बहुन्नं जनानं पियंमनापं च — अभिरूपेहि नर-नारी-गणेहि अनुचरितं, बहुविधेहि विञ्ञावन्तेहि निसेवितं, खत्तियब्राह्मणादीहि नेकविधेहि जनेहि तं सब्बेन सब्बदा आकिण्णं । विविधेहि समण-ब्राह्मणादीहि सभाजनेहि तं सङ्घटितं । कासिक-कोटुम्बरकादीहि वत्थेहि संपन्नानि तस्स वत्थापणानि । बहुविधेहि रुचिरेहि सुप्पससारितेहि पुप्फेहि च गन्धेहि सुगन्धीनि तस्स वीथिचतुक्कानि । रतनापणेसु विज्जमानेहि आसंसनीयेहि रतनेहि विज्जोतिता तस्स रथिया । सिङ्गारवणिजगणा तत्थ निच्च विचरन्ति । रजतसुवण्ण - परिपूरं कहापण - कंसपत्थर संपन्नं, पज्जोतामन - निधि - निकेतं, पहुत-धन-धञ्ञं, परिपुण्ण-कोसं, बहु-अन्नपान, खज्ज-भोज्ज - समिद्धं, सम्पन्नसस्सं, उत्तरकुरू - सकासं सागलनगरं आळकमन्दा विय देवपुरं ।

### सद्दत्थ (शब्दार्थ)

**योनक** (पुं.) - यवन IONIAN GREEK
**सोभित** (वि.) - शोभविलेले
**पोक्खरणी** (स्त्री.) - कमळाचे छोटे कृत्रिम तळे
**सुतवन्त** (वि.) - ज्ञान असलेला, विद्वान
**अट्टाल** (पुं.) - पहाऱ्यासाठी उभारलेला मनोरा
**गम्भीर** (वि.) - खोल
**पण्डर** (वि.) - पांढरा
**पच्चअत्थिक** (पुं.) - प्रतिस्पर्धी
**निहत** (वि.) - परतविलेला
**चतुक्क** - चौक
**सु-विभत्त** (वि.) - चांगल्या प्रकारे विभागलेले
**वर-भण्ड** (नपुं.) - विक्रीचा उत्तम माल
**भूमि-भाग** (पुं.) - प्रदेश
**आराम** (पुं.) - उद्यान
**निम्मित** (वि.) - निर्माण केलेले
**दळ्ह** (वि.) - भक्कम
**कोट्ठक** (नपुं.) - कोठार
**परिखा** (स्त्री.) - खंदक
**पाकार** (पुं.) - तटबंदी
**पच्चामित्त** (पुं.) - शत्रू
**वीथि** (स्त्री.) - रस्ता
**सिङ्घाटक** (पुं.) - चौक
**सुप्पसारित** (वि.) - चांगल्या प्रकारे मांडलेले
**आपण** (नपुं.) - दुकान

**हिम-गिरि-सिखर-सदिस** (वि.) - हिमालय पर्वताच्या शिखरासारखा

**हय** (पुं.) - घोडा

**समाकुल** (वि.) - गजबजलेले

**निसेवित** (वि.) - ज्याचा आश्रय घेतला आहे असा

**सब्बेन सब्बदा** - सर्वप्रकारे (वाक्यप्रयोग)

**सङ्घटित** - बनलेला

**कोटुम्बरक** (वि.) - कोटुम्बर नावाच्या प्रदेशात तयार झालेले वस्त्र

**आसंसनीय** (वि.) - ज्याची अभिलाषा, इच्छा करावी असा

**सिङ्गार वणिज** (पुं.) - काजळ, कंगवे इत्यादी शृंगाराची साधने विकणारा व्यापारी

**पज्जोतमान** (वि.) - चमकणारा

**परिपुण्णकोस** - ज्याचा खजिना भरलेला आहे असा

**समिद्ध** (वि.) - संपन्न

**वरभवन** (नपुं.) - उत्तम निवासस्थान

**वरगोपुर** (नपुं.) - सुंदर प्रवेशद्वार

**पत्ति** (पुं.) - पादचारी सैनिक

**अनुचरित** (वि.) - वावर असलेला

**विञ्ञावन्त** (वि.) - विद्वान

**आकिण्ण** (वि.) - भरलेला

**कासिक** (वि.) - काशीमध्ये तयार झालेले (वस्त्र)

**वत्थापण** (नपुं.) - वस्त्राचे दुकान

**रुचिर** (वि.) - सुंदर

**विज्जोतित** - उजळलेला, प्रकाशमान केलेला

**कहापण** (पुं.) - सोन्याचे नाणे

**कंसपत्थर** (पुं.) - काशाचा पत्रा

**निधि-निकेत** (पुं.) - खजिना, घर

**खज्ज** (नपुं.) - खाण्याचे पदार्थ

**देवपुर** (नपुं.) - देवांचे नगर

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) मिलिंदराजा कोणत्या देशाचा रहिवासी होता ?

(२) नागसेन कोण होता ?

(३) राजा मिलिंद व भन्ते नागसेन ह्यांच्या संवादाच्या ग्रंथाचे नाव काय ?

(४) सागलनगर 'बहुमूल्य रत्नांचे चमकते कोषागार' असे का म्हटले आहे ते स्पष्ट करा.

(५) सागलनगर प्रतिभाशाली विद्वानांचे केंद्र होते असे का म्हटले आहे ?

**टिपणे**

- प्राचीन बौद्ध काळातील समृद्ध नगरांची माहिती देणे.
- प्राचीन सभ्यतेचा अभ्यास करणे.

★★★

नवमो पाठो ।

# पियदस्सि असोको धम्मरञ्ञो ।

धम्मराजा अशोकाचा जन्म इ.स. पूर्व ३०४ मध्ये झाला. वयाच्या ३५व्या वर्षी राज्याभिषेक झाल्यानंतर तीन वर्षांनी त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. कलिंग विजयानंतर त्यांनी प्रथम बोधगया येथे धम्मयात्रा केली. त्यानंतर त्याने १४ शिलालेख धम्म-प्रचार आणि प्रसारासाठी तयार केले. तिसरी धम्म परिषद इ.स. पूर्व २५३मध्ये पाटलिपुत्र (पाटना) येथे धम्मराजा अशोकाच्या राजाश्रयाखाली झाली. अशोकाचे परिनिर्वाण इ.स. पूर्व २३२मध्ये झाले.



अम्हाकं जम्बुदीपे बहवो महन्तो राजानो जाता। पुरा मगधेसु पाटलिपुत्ते नगरे असोको बिन्दुसार रञ्ञो पुत्तो बिन्दुसारो पि रञ्ञो चन्दगुत्तस्स पुत्तो । बिन्दुसारस्स रञ्ञो किर अनेकपुत्ता होन्ति । ते सब्बे असोकेन विजित्वा दळ्हपरक्कमेन सहोदरं तिस्सकुमारसह सब्बं पाटलिपुत्तं नगरं अत्तनो हत्थगतं कतं । चत्तारि वस्सानि अनभिसित्तेनव रज्जं कतं । चतुन्नं वस्सानं अच्चयेन, तथागतस्स महापरिनिब्बनतो द्विन्नं वस्ससतानं उपरि अट्ठरसमे वस्से, सकलजम्बुदीपे एकरज्जो अभिसित्तो ।

कलिङ्गदेसं विजेतुं तेन महन्तं युद्धं कतं। तत्थ बहवो जना मता। बहु वित्त नट्ठं। तेन दुक्खितेन असोको रञ्ञो युद्धं सब्बथा परिच्चजित्वा तथागत सरणं गतो ।

असोकस्स बुद्धधम्मो अतीव अभिमतो । ठाने ठाने तेन सिलालेखा, थम्भलेखा, गुहालेखा लिखापिता । जनेहि धम्माचरणं समाचरण चरितब्ब' ति तस्स पमुखा आणा।

बुद्धभिक्खूनं उपकारत्थं तेन बहवो आरामा च कारिता, विपुलं दानं दिन्नं। सब्बेसु दिट्ठीसु तस्स हदये समानो भावो। 'धम्मराजा' ति असोको विस्सुतो इतिहासे। तस्स रज्जं विसालं येन 'चक्कवत्ती असोको' ति सञ्ञा तेन लद्धा। 'देवानं पियो पियदस्सी' ति असोको लेखेसु अत्तानं निद्दिसति ।

तस्स जनपदं खो इद्धं चेव अहोसि फीतं च, बहुजनं च आकिण्णमनुस्सं च सुभिक्खं च। तं च दसहि सद्देहि अविवित्तं अहोसि दिवा च एवं रत्तिं च सेय्यथीदं — हत्थिसद्देन, अस्ससद्देन, रथसद्देन, भेरिसद्देन, मुदिङ्गसद्देन, विणासद्देन, गीतसद्देन, सम्मसद्देन, तालसद्देन, सङ्खसद्देन, अस्नाथ, पिवथ खादथा' ति दसमेव सद्देन ।

असोकत्थम्भे ठिता चत्तारो सीहा भारतरट्ठस्स राजमुद्दा । असोकत्थम्भे ठितं यं धम्मचक्कं तेन अम्हाकं रट्ठस्स अलङ्कतो। असोकस्स चक्कं सब्बेसं जनपदानं अ-सोकाय होतु ।

**सद्दत्थ (शब्दार्थ)**

**धम्मराजा** (पुं.) - धम्माने, न्यायाने राज्य करणारा
**बिन्दुसारो** (पुं.) - अशोकाचा पिता
**मगधेसु** (पुं.) - मगध देशात
**चन्दगुत्तस्स** (पुं.) - चन्द्रगुप्ताचा

**विजित्वा** (पूर्वकालवाचक त्वान्त अव्यय) जिंकून
**हत्थगतं** (वि.) - हस्तगत, ताब्यात असलेले
**अट्ठरसमे** (वि.) - अठराव्या
**एकरज्जे** (नपुं.) - साम्राज्यात, आधिपत्यात
**अभिमतो** (वि.) - आवडता, मान्य
**गुहालेख** (पुं.) - गुहेत कोरलेले लेख
**लिखापिता** - लिहून घेतले
**कारिता** - करविले
**चक्कवती** (पुं.) - चक्रवर्ती
**जनपद** (नपुं.) - राष्ट्र
**फीत** (वि.) - समृद्ध, पसरलेले
**अविवित्तं** (वि.) - नेहमी
**असोकत्थम्भे** (पुं.) - अशोक स्तंभावर
**जानपदानं** (वि.) - जनपदातील लोक
**तिस्सकुमार** (पुं.) - तिष्यकुमार (अशोकाचा भाऊ)
**अनभिसत्तेन** (वि.) - अभिषेक झाला नसताना
**कलिङ्गदेसं** (पुं.) - कलिंग देश (हल्लीचा ओरिसा)
**परिच्चजित्वा** - त्याग करून
**सिलालेख** (पुं.) - शिलालेख
**थम्भलेख** - स्तंभलेख
**आणा** (स्त्री.) - आज्ञा, आदेश
**दिट्ठीसु** (स्त्री.) - दृष्टीबाबत, मतांबाबत
**पियदस्सी** (पुं.) - सुंदर, देखणा
**इद्ध** (वि.) - संपन्न
**आकिण्णं** (वि.) - गजबजलेले, भरलेले
**सेय्यथा** (अ.) - जसे, ज्याप्रमाणे
**राजमुद्दा** (स्त्री.) - राजमुद्रा, राजचिन्ह
**असोको** (अ+सोको) (पुं.) - आनंद, शोकरहित

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) कलिंग युद्धानंतर अशोकाने काय केले ?
(२) शिलालेखात अशोकाचा कोणत्या नावाने उल्लेख येतो ?
(३) भारत सरकारने अशोकाची कोणती चिन्हे स्वीकारली आहेत ?
(४) अशोकाने किती प्रकारचे शिलालेख कोरले ?

**२. खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) असोको कस्स पुत्तो ?
(२) असोकेन किमत्थं महन्तं युद्धं कतं ?
(३) बुद्ध भिक्खूनं उपकारत्थं असोकेन किं कतं ?
(४) अम्हाकं धजो केन अलङ्कतो ?

**३. खालील वाक्यांशाच्या जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| (१) असोको | (१) बिन्दुसारो । |
| (२) चन्दगुत्तस्सपुत्तो | (२) धम्मराजा । |
| (३) कलिङ्गदेस विजेतुं | (३) विपुल दानं दिन्नं । |
| (४) बुद्धभिक्खून उपकारत्थ | (४) युद्धकतं । |

**टिपणे**

- प्रियदर्शी अशोक धम्मराजाचे कार्य विद्यार्थ्यांसमोर ठेवणे.
- शिलालेख, स्तंभलेखांची माहिती गोळा करणे.

★ ★ ★

दसमो पाठो ।

# सल्लविद्धो पुरिसो ।

तथागत बुद्धाचा धम्म बुद्धिप्रामाण्यावर आधारलेला असल्यामुळे त्यांनी मानवी कल्याणाशी कसल्याही प्रकारचा संबंध नसलेल्या गोष्टींना आपल्या धम्मात स्थान दिले नाही. निरर्थक प्रश्नांना उत्तर देण्याचे ते टाळत असत. अशा प्रश्नांना 'अव्याकृत' म्हणजे स्पष्टीकरण न केलेले म्हटले आहे.

प्रस्तुत उतारा 'मज्झिमनिकाय' ग्रंथातील 'चुळमालुक्यसुत्ता'मधून घेतलेला आहे. त्यात काही गोष्टी कशा निरर्थक आहेत हे सोदाहरण स्पष्ट केले आहे.



''यो खो, मालुक्यपुत्त, एवं वदेय्य न तावाहं भगवा' ति ब्रह्मचरियं चरिस्सामि याव मे भगवा न ब्याकरिस्सति – सस्स तो लोको ति वा, असस्सतो लोको ति, वा नेव होति ना होति तथागतो परं मरणा ति वा' ति, अब्याकतमेव तं मालुक्यपुत्त, तथागतेन अस्स, अथ सो पुरिसो कालं करेय्य । सेय्यथापि, मालुक्यपुत्त, पुरिसो सल्लेन विद्धो अस्स सविसेन गाळ्हपलेपनेन । तस्स मित्तामच्चा ञातिसालोहिता भिसक्कं सल्लकत्तं उपट्ठपेय्युं । सो एवं वदेय्य – ''न तावाहं इमं सल्लं आहरिस्सामि याव न तं पुरिसं जानामि येनम्हि विद्धो, खत्तियो वा ब्राह्मणो वा वेस्सो वा सुद्दो वा' ति, न तावाहं इमं सल्लं आहरिस्सामि याव न तं पुरिसं जानामि येनम्हि विद्धो, एवं नामो एवंगोत्तो इति वा' ति । 'न तावाहं इमं सल्लं आहरिस्सामि याव न तं पुरिसं जानामि येनम्हि विद्धो, दीघो वा रस्सो वा मज्झिमो वा' ति काळो वा सामो वा मङ्गुरच्छवी' ति वा । याव न तं पुरिस जानामि येनम्हि विद्धो, अमुकस्मिं गामे वा निगमे वा नगरे वा ति । याव न तं धनुं जानामि येनम्हि विद्धो, यदि वा चापो यदि वा कोदण्डो' ति । याव न तं जियं जानामि यायम्हि विद्धो यदि वा सण्हस्स यदि वा न्हारुस्सति । याव न तं कण्डं जानामि येनम्हि विद्धो यस्स पत्तेहि वजितं यदि वा गिज्झस्स यदि वा कंकस्स यदि वा कुललस्स यदि वा मोरस्सा' ति । याव न तं सल्लं

जानामि येनम्हि विद्धो, यदि वा खुरप्पं यदि वा वच्छदन्तं' ति । अञ्ञातमेव तं मालुंक्यपुत्त, तेन पुरिसेन अस्स, अथ खो कालं करेय्य । एवमेव खो, मालुक्यपुत्तो, यो एवं वदेय्य – न तावाहं भगवति ब्रह्म'चरियं चरिस्सामि याव मे भगवा न – ब्याकरिस्सति – सस्सतो लोको त वा असस्सतो लोको ति वा - - - नेव होति न होति तथागतो परं मरणा' ति वा' ति – 'अब्याकतमेव तं मालुक्यपुत्त, तथागतेन अस्स, अथ खो पुग्गलो कालं करेय्य'' ।

*(मज्झिमनिकाय १३.२.४)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**ब्रह्मचरियं** (नपुं.) - निर्मल, धम्ममयजीवन
**ब्याकरिस्सति** (क्रि.) - वि+आ+कर भविष्यकाळ तृ.पु.ए.व. स्पष्टीकरण करतील
**अब्याकत** (वि.) - अव्याकृत-स्पष्टीकरण न केलेले
**विद्ध** (वि.) - घायाळ, जखमी झालेला
**ञातिसालोहिता** - नात्याचे व एका रक्ताच्या नात्याने संबंधी
**सल्लकत्त** (पुं.) - शल्यकर्म करणारा
**आहरिस्सामि** (आ+हर, भविष्यकाळ प्र.पु. ए.व.) - काढेन, काढून देईन
**चाप** (पुं.) - धनुष्य
**जिया** (स्त्री.) - धनुष्याची दोरी, प्रत्यंचा
**सण्ह** (नपुं.) - ताग
**वाजित** (नपुं.) - बाणाच्या मागे लावलेले पंख
**कंक** (पुं.) - बगळा
**खुरप्प** (नपुं.) - एकप्रकारचा बाण
**करवीरपत्त** (नपुं.) - एकप्रकारचा बाण
**चरिस्सामि** (की) (चर-चरति भविष्यकाळ प्र.पु.ए.व.) - आचरण करेल
**सस्सत** (वि.) - शाश्वत
**सल्ल** (नपुं.) - शस्त्र, शल्य, बाण
**मित्तामच्चा** (पुं.) - मित्र व सहकारी
**भिसक्क** (पुं.) - वैद्य, चिकित्सक
**उपट्ठपेय्युं** (उप+ठा प्रयो. विध्यर्थ) - उपस्थित करावेत
**साम** (वि.) - सावळा
**मङ्गुरच्छवी** (वि.) - सुवर्णवर्णी, गेहू वर्णाचा
**कोदण्ड** (पुं.) - तिरकमठा
**कण्ड** (नपुं.) - वेतांचे टोक असलेला बाण
**न्हारू** - स्नायू
**गिज्झ** (पुं.) - गिधाड
**कुलल** (पुं.) - ससाणा
**वच्छवन्तं** (नपुं.) - एकप्रकारचा बाण

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) अव्याकृत म्हणजे काय ?
(२) 'सल्लविद्धपुरिसा' उपमा स्पष्ट करा.
(३) तथागत बुद्धाने आपल्या धम्मात निरर्थक गोष्टींना का स्थान दिले नाही ?

### टिपणे

- निराधार, अवास्तव चर्चेमध्ये व्यर्थ वेळ न घालविता, चिकित्सकपणे समस्येचे समाधान करणे.
- कार्यकारणसिद्धांतानुसार आलेल्या परिस्थितीत मार्ग काढावा.

★★★

## एकादसमो पाठो ।

# सुरापान जातकं ।

प्रस्तुत कथेत सुरापानाचे म्हणजे मादक पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम सांगितले आहे. दारूच्या सेवनामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झालेले आहेत. यासाठी दारूचे व्यसन मुळातच लावून घेऊ नये असा या कथेचा नीतिबोध आहे.

---

अतीते वारणसियं ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो कासिरट्ठे उदिच्चब्राह्मणकुले निब्बत्ति । वयप्पत्तो सो इसिपब्बज्जं पब्बज्जित्वा हिमवन्तप्पदेसे वसति । पञ्चहि अन्तेवासिकसतेहि अथ नं वस्सानसमये सम्पत्ते अन्तेवासिका आहंसु – ''आचरिय, मनुस्सपथं गन्त्वा लोणम्बिलं सेवित्वा आगच्छामा'' ति ।

''आवुसो, अहं इधेव वसिस्सामि । तुम्हे गच्छथ । सरीरं सन्तप्पेत्वा, वस्सं वीतिनामेत्वा आगच्छथा'' ति । ते 'साधू' ति आचरियं वन्दित्वा वाराणसियं गन्त्वा, राजुय्याने वसिंसु । पुन दिवसे बहिद्वारगामे येव भिक्खाय चरित्वा सुहिता हुत्वा नगरं पविसिंसु । मनुस्सा भिक्खं अदंसु । कतिपाहच्चयेन ते रञ्ञोपि आरोचेसुं – ''देवं, हिमवन्ततो पञ्चसता इसयो आगन्त्वा उय्याने वसन्ति । ते सब्बे घोरतपा परिवारितिन्द्रिया सीलवन्तो' ति । राजा तेसं गुणे सुत्वा उय्यानं गन्त्वा अवन्दि । कतपटिसन्थारो वस्सानं चातुमासं तत्थेव वसनत्थाय निमन्ते सि । ते ततो राजगेहे येव भुञ्जित्वा उय्याने वसन्ति ।

अथेक दिवसं नगरे सुरानक्खत्तं नामं अहोसि । राजा 'पब्बजितानं नाम सुरा दुल्लभा' ति । बहुं उत्तमं सुरं दापेसि । तापसा सुरं पिवित्वा, उय्यानं गन्त्वा, सुरामदमत्ता हुत्वा, एकच्चे उट्ठाय नच्चिंसु, एकच्चे गायिंसु । नच्चित्वा गायित्वा खारियादीनि अवत्थरित्वा निद्दायिंसु । सुरामदे छिन्ने पबुज्झित्वा तं अत्तनो विप्पकारं पस्सिंसु । अम्हेहि पब्बजितसारूप्पं न कतं' ति रोदित्वा परिदेवित्वा 'मय आचरियेन विना एवरूपं पापं करिम्हा' ति मञ्ञिंसु । तं खणञ्ञेव उय्यानं पहाय हिमवन्त अगमिंसु । पटिसामित परिक्खारा आचरियं वन्दित्वा निसीदिंसु – ''किन्नु खो ताता, अकिलयमाना सुखं समग्गवासं वसित्था'' ति । आचरियेन पुच्छिता ''आचरिय सुखं मयं वसिम्ह । अपि च खो मयं अपातब्बयुत्तकं पिवित्वा विसञ्ञीभूता । मयं नच्चिम्ह गायिम्ह चा' ति । एतमत्थं आरोचेन्ता इमं गाथं आहंसु –

**''अपायिम्ह अनाचिम्ह, अगायिम्ह रूदिम्ह च ।**
**विसञ्ञकरणिं पीत्वा, दिट्ठा नाहुम्ह वानरा' ति ।**

एवं ते अत्तनो अ-गुणं कथेसुं । बोधिसत्तो ''गुरुसंवासरहितान नामं एवरूपं होती'' ति वत्वा ते तापसे गरहि । ''पुन एवरूपं मा करित्था'' ति तेसं ओवदि ।

*(सुरापानजातकातून आवश्यक ते फेरबदल करून)*

### सद्दत्थ (शब्दार्थ)

**अतीत** (वि.) - पूर्वीचा काळ
**निब्बत्ति** - जन्म घेतला
**अन्तेवासिक** (पुं.) - शिष्य
**मनुस्सपथ** (पुं.) - माणसांची वस्ती
**छिन्न** - संपलेला
**विप्पकार** (पुं.) - विचित्र प्रकार, बदल
**पब्बजितसारूप्प** - प्रव्रजिताला अनुरूप वागणूक
**लोणम्बिल** (नपुं.) - खारट व आंबट

**पटिसमित** - व्यवस्थित केलेले
**परिक्खार** (पुं.) - परिष्कार, आवश्यक गोष्टी
**समग्गवास** (पुं.) - मैत्रीपूर्ण सहवास
**सुरानक्खत्तं** (नपुं.) - मादक पदार्थ उत्सव, सुरानक्षत्र
**गरहि** - निन्दा करता झाला
**ओवादि** (ओ+वद् भू.का.तृ.पु.ए.व.) - उपदेश केला.
**विसञ्ञी** - भान हरवलेला

**पटिसन्थार** (पुं.) - आसन
**कतिपाहच्चय** (पुं.) - काही दिवस उलटल्यावर
**अपातब्बयुत्तक** (वि.) - न पिण्यासारखे, अपेय
**अवत्थरित्वा** (पूर्वकाळ त्वान्त अव्यय) - पसरून
**पबुज्झित्वा** (पूर्वकाळ त्वान्त अव्यय) - जागे होऊन
**सुरामदमत्त** (नपुं.) - दारूमुळे झिंगणे
**विसञ्ञकरणिं** - भान नाहिसे करणारी मदिरा

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) बोधिसत्वाचे शिष्य गावात कशासाठी गेले ?

(२) सुरापानानंतर शिष्यांची काय स्थिती झाली ?

(३) शिष्यांचे गैरवर्तन कशामुळे झाले असे बोधिसत्वाला वाटले ?

२. **कंसातील योग्य पर्याय निवडून पालि वाक्य तयार करा.**

(१) अहं इधेव ———————— । (वसिस्साम, वसिस्सामि, वसिस्सथ)

(२) ———————— भिक्खं अदंसु । (मनुस्सो, मनुस्सा, मनुस्सानं)

(३) आचरिय सुख ———————— वसिम्ह । (मयं, अहं, तव)

(४) ते राजगेहे येव ———————— उय्याने वसन्ति । (उय्यानं, उय्याने, उय्यान)

३. **खालील पालिशब्दांचे वाक्यात उपयोग करा.**

नच्चिसु, पविसिंसु, अगमिंसु, सेवित्वा, निब्बत्ति, आगन्त्वा, उय्यान.

**टिपणे**

- मादक पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम होतात. व्यसनाधिन लोकांचा सहवास त्यागून सद्गुणी लोकांची संगत करावी.
- जाणते किंवा अजाणतेपणे कोणतीही चूक करू नये, त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.

★★★

द्वादसमो पाठो ।

# बोधिरुक्खो अहं ताता ।

तथागत बुद्धाने जगाला मानवी स्वातंत्र्य, चातुर्वर्ण्य, जातिभेद व स्त्री-पुरुष असमानतेचे खंडन केले पाहिजे अशी शिकवण दिली आहे. समता, बुद्धिनिष्ठता, बंधुता, न्याय इत्यादी तत्त्वांचे प्रतिपादन करणाऱ्या सिद्धार्थ गौतमास ज्या वृक्षाखाली बुद्धत्व प्राप्त झाले अशा बोधगया येथील बोधिवृक्ष आपल्या जीवनाचे कथन सांगत असल्याचा भाग प्रस्तुत पाठात आलेला आहे. इतर वृक्ष गोड फळे देतात पण बोधिवृक्ष ज्ञानरूपी अमृतफळ देतो. ह्याच बोधिवृक्षाखाली ध्यानस्थ बसलेल्या सिद्धार्थ गौतमाला वृक्षदेवता समजून बरोबर आणलेली खीर देणाऱ्या सुजाताचा येथे उल्लेख आहे. श्रीलंका, चीन, जपान, ब्रह्मदेश, थायलंड इत्यादी राष्ट्रांतून बौद्धधम्माला मानणारे बोधिवृक्षाचे दर्शन घेण्यासाठी येतात.

---




किं पुच्छथ तुम्हे ? को त्वं' ति ? तेन हि सुणाथ, आवुसो, भासिस्सामि । अहं बोधिरुक्खो । किं वदथ ? 'को पनायं बोधिरुक्खो' ति ?

अहं सो बोधिरुक्खो यस्स हेट्ठा गोतमेन संबोधि अधिगता । अत एव अहं बोधिरुक्खो ति जनेहि विदितो । अम्बरुक्खो अम्बफलानि देति, जम्बुरुक्खो जम्बुफलानि देति, जम्बीरंरुक्खो जम्बीरफलानि देति, अहं पन बोधिफलं दम्मि । जम्बुफलतो पि, अम्बफलतो पि बोधिफलं सादुतरं, बोधिफला महन्तं । सचे सिद्धत्थो गोतमस्स बोधि न अभविस्स सब्बे जना चक्खुमन्ता पि अन्धा अभविस्संसु । मंसचक्खुतो पि ञाणचक्खुसेय्यो ।

केचि जना मं पुच्छन्ति 'कीव महल्लको तुवं ति ? 'सप्पुरिसा, अहं' ति महल्लको पाचिने अड्ढतेय्य वस्ससहस्सायुको । मम जातक्खेत्तं नाम गयानगर यं बुद्धगयेति वोहरन्ति । मम खन्धा वित्थटा, साखा दीघा, पण्णानि बहलानि । मम सन्दच्छायायं लद्धो धम्मतत्तेहि सीतभावो । सिद्धत्थो गोतमेन मम छायायं येव निसीदित्वा सन्तं पदं अधिगतं । इदानि, पि सुट्ठु सरामि तं दिवसं यदा सिद्धत्थो गोतमो बोधिसत्तोञाणत्थाय । मम हेट्ठा चिरतरं निसिन्नो । सो हि सायण्ह -- समयो पुप्फानं वण्टतो मुञ्चनकालो । तस्मिं येव समये सुजाता नाम कोचि दारिका तत्थ आगता । मम हेट्ठा निसिन्नं गोतम दिस्वा 'रुक्खदेवता येव मनुस्सावण्णेन - ठिता ति सञ्ञाय ताय आनितो पायासो गोतमस्स दिन्नो । भन्ते सो पायासो गोतमेन । भो आवुसो, मया नाम बहूनि अच्छारियानि दिट्ठानि । यस्मा अहं बोधिरुक्खो तस्मा दानि पि बहवो पुञ्ञकामा पच्चहं मं वदन्ति पदक्खिणं च करोन्ति । लंकारट्ठतो, मरम्मरट्ठतो पि चीनरट्ठोपि अञ्ञेहि पि रट्ठेहि धम्मिका आगच्छान्ति मं वन्दितुं । केचि पन जना न आगन्तुं सक्कोन्ति । तेसं दस्सनाय अहं येव तत्थ तत्थ गच्छामि । तुम्हे सब्बे'पि जानाथ पियदस्सि असोकं धम्मराजानं । तस्स धीताय सङ्घमित्ताय मम एका साखा सीहलदीपं नीता, अनुराधापुरे च रोपिता । एवं लद्धा मया पतिट्ठा लंकादीपम्हि

**बोधिरुक्खो अहं ताता, अमतोचमंतददो ।**
**ञाणरूपेण जीवामि, फालिफुल्लो च सब्बदा ॥**

*(स्वयंरचित)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**बोधिरुक्ख** (पुं.) - बोधिवृक्ष
**हेट्ठा** (अ.) - खाली
**जम्बु** (पुं.) - जांभुळ
**चक्खुमन्त** (पुं.) - डोळे असणारा, पाहू शकणारा
**मंसचक्खु** (नपुं.) - चर्मचक्षू
**जातक्खेत्त** (नपुं.) - जन्मनगरी, जन्मक्षेत्र
**वन्दितुं** (अ) - वंदन करण्यासाठी
**मरम्म** (वि.ना.) - ब्रह्मदेश
**पतिट्ठा** (स्त्री.) - आधार, पाया
**अमतन्दद** (पुं.) - ज्ञानामृत देणारा
**बहल** (वि.) - दाट, विपुल
**सन्द** (वि.) - घनदाट, निबिड
**सीतभाव** (पुं.) - गारवा
**ञाणत्थाय** - ज्ञान व्हावे म्हणून
**वण्ट** (पुं.) - देठ
**पायास** (पुं.) - आटवलेल्या दुधाची एक विशिष्ट खीर
**खन्ध** (पुं.) - मोठी फांदी
**साखा** (स्त्री.) - लहान फांदी
**पुञ्ञकाम** (पुं.) - पुण्याची कामना करणारा
**पदक्खिणा** (स्त्री.) - प्रदक्षिणा, फेरी, वर्तुळाकार फेरी, भ्रमण
**ञाणचक्खु** (नपुं.) - ज्ञान हाच डोळा
**लंका** (स्त्री.) - सीलोन, श्रीलंका
**धीता** (स्त्री.) - कन्या
**रोपिता** (वि.स्त्री.) - रोवली
**अमत** (वि.) - अमृत
**फालि** (स्त्री.) - पर्णादि संभार
**वित्थट** (वि.) - पसरलेला
**तत्त** (वि.) - पोळलेला, भाजलेला
**सुट्ठ** (क्रि.वि.) - चांगल्या प्रकारे
**चिरतरं** (क्रि.वि.) - बराच वेळ
**सञ्ञा** (स्त्री.) - समजूत

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सिद्धार्थ गौतमाने बुद्धत्व कोणत्या वृक्षाखाली प्राप्त केले ?
(२) बोधिवृक्ष कुठे आहे ?
(३) बोधिवृक्ष किती प्राचीन आहे ?

२. **खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) को पन बोधिरुक्खो ?
(२) बोधिरुक्खो किं फल देति ?
(३) बोधिरुक्खो किव महल्लको ?
(४) गोतमस्स पायास को दिन्नो ?
(५) बोधिरुक्खं वन्दितुं केन केन रट्ठस्स जना भारतो आगच्छति ?
(६) बोधिरुक्खस्स एको साखा सिहलद्विपे को निला ?

### टिपणे

- बोधिगया येथील बोधिवृक्षाचे ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक तसेच पर्यावरणाचे महत्त्व स्पष्ट करा.
- निसर्गाच्या सानिध्यात सत्याचा शोध घेणे.

★★★

## पञ्ञो विभागो - पठमो पाठो ।

# उट्ठान सुत्तं ।

पालितिपिटक साहित्यामध्ये १) सुत्तपिटक, २) विनयपिटक, ३) अभिधम्मपिटक या ग्रंथांचा समावेश होतो. सुत्तपिटकामध्ये शेवटचा निकाय खुद्दकनिकाय असून यामध्ये पंधरा ग्रंथांचा समावेश होतो. यापैकी पाचवा ग्रंथ 'सुत्तनिपात' असून त्यामधून हा पाठ घेतलेला आहे.

या पाठामध्ये उद्योगाचे सुपरिणाम व निरुद्योगाचे दुष्परिणाम वर्णिलेले असून उद्योगाच्या आश्रयाने दुःखाचा अंत कसा करावा याचे वर्णन यामध्ये प्राप्त होते. सामाजिक, सांस्कृतिक आणि नीतिमूल्य समजावून घेण्याच्या दृष्टीने 'उट्ठान सुत्तं' हा पाठ अत्यंत महत्त्वाचा आहे.



उट्ठहथ निसीदथ, को अत्थो सुपितेन वो ।
आतुरानञ्हि का निद्दा, सल्लविद्धान रूप्पतं ॥१॥

उट्ठहथ निसीदथ, दळ्हं सिक्खथ सन्तिया ।
मा वो पमत्ते विञ्ञाय,
मच्चुराजा अमोहयित्थ वसानुगे ॥२॥

याय देवा मनुस्सा च, सिता तिट्ठन्ति अत्थिका ।
तरथेतं विसत्तिकं, खणो वो मा उपच्चगा ।
खणातीता हि सोचन्ति, निरयम्हि समप्पिता ॥३॥

पमादो रजो पमादो, पमादानुपतितो रजो ।
अप्पमादेन विज्जाय, अब्बहे सल्लमत्तनो ति ॥४॥

*(संदर्भग्रंथ : सुत्तनिपातो - चूळवग्गो)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**उट्ठान** (नपुं.) - उत्थान, उभारणे
**का** (स्त्री.) - कोणती
**सल्ल** (पुं.) - तीर, बाण
**मा** - नको
**उपच्चगा** (क्रि.) - पार झाला, पुढे गेला
**रज** (पुं. नपुं.) - धुळ, धुलीकण
**को** (पुं.) - कोणता, कोण
**निद्दा** (स्त्री.) - निद्रा, झोप
**दळ्हं** (वि.) - दृढ निश्चय, ठाम
**सिता** (स्त्री.) - नांगरलेली ओळ
**निरय** (पुं.) - नरक
**अप्पमाद** (वि.) - जागरुकता

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) उद्योगी व्यक्तीने काय करावयास पाहिजे ?
(२) तृष्णेचे दुष्परिणाम वर्णन करा.
(३) 'उट्ठानसुत्तं' या पाठाचा सारांश लिहा.

**टिपणे**

- आळस, कंटाळा, झोप, गर्व, अहंकार, स्वार्थ यांमध्ये आपल्या मूल्यवान जीवनातील वेळ वाया घालू नये.
- जीवनात वेळेचा सदुपयोग करून चांगले कार्य करावे.

★ ★ ★

## दुतियो पाठो ।

# चन्दा थेरी ।

प्राचीनकालीन महिलांच्या स्वातंत्र्याचा दस्तावेज म्हणून संबोधलेल्या 'थेरीगाथा' ग्रंथातून प्रस्तुत कविता घेतली आहे. चन्दा थेरीचा जन्म एका अत्यंत दरिद्री कुळात झाला. तिचे लहानपण फारच दुक्खात गेले. जेव्हा ती तारुण्यात आली तेव्हा तिचे सर्व आप्तसंबंधी एका भयंकर रोगाने मृत्यू पावले. चन्दा निराधार झाल्याने भिक्षा मागून उपजीविका करीत होती. भिक्षा मागत मागत एकदा ती भिक्खूणी पटाचाराजवळ आली, तेव्हा भिक्खूणी पटाचाराचे भोजन संपलेले होते. परंतु भिक्खूणी पटाचाराने तिच्या भोजनाची व्यवस्था केली. तेव्हा चन्दा, भिक्खूणी पटाचारा, भिक्खूचे जीवन व आचरण पाहून प्रभावित झाली. त्यानंतर चन्दा, भिक्खूणी पटाचारासोबत राहू लागली. काही दिवसांनंतर चन्दा भिक्खूणी झाली. भिक्खूणी चन्दाने आपल्या पूर्वजीवनाचे वर्णन करताना खालील गाथा म्हटल्या आहेत.



दुग्गताहं पुरे आसिं, विधवा च अपुत्तिका ।
विना मित्तेहि ञातिहि, भत्तचोळस्स नाधिगं ॥१॥

पत्तं दण्डं च गण्हित्वा, भिक्खमाना कुला कुलं ।
सीतुण्हेन, च डय्हन्ती, सत्त वस्सानि चारिहं ॥२॥

भिक्खुणि पुन दिस्वान, अन्नपानस्स लाभिनिं ।
उपसङ्कम्म अवोच, पब्बज्जं अनगारियं ॥३॥

सा च मं अनुकम्पाय, पब्बाजेसि पटाचारा ।
ततो मं ओवदित्वान, परमत्थे नियोजयि ॥४॥

तस्साहं वचनं सुत्वा, अकासिं अनुसासनिं ।
अमोघो अय्या ओवादो, तेविज्जाम्हि अनासवा' ति ॥५॥

(*थेरीगाथा*)

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**दुग्गताहं** (दुग्गतं+अहं) - माझी दुरवस्था
**दुग्गति** (स्त्री.) - दुर्गती
**अपुत्तिक** - पुत्रहीन, निपुत्रिक
**उपसङ्कम्म** - जवळ जाणे
**अवोच** - म्हणाले
**पब्बज्जा** - प्रव्रज्या
**अनगारिय** - बेघर
**अनुकम्पा** - अनुकंपा, दया करणे
**ततो** (अ.) - तेथून
**ओवादित्वान** (अ.) - उपदेश ऐकून
**नियोजयि** - प्रेरित केले
**तस्साहं** (तस्स+अहं) - मी त्याचा
**सुत्वा** (त्वान्त अ.) - ऐकून
**अकासि** - पूर्ण केले
**अमोघ** (वि.) - प्रयोजनपूर्वक, प्रयोजनयुक्त
**अय्याओवाद** (अय्या+ओवाद) - श्रेष्ठ स्त्रीचा उपदेश
**अय्या** (स्त्री.) - महान स्त्री, श्रेष्ठ स्त्री
**अन्नपान** - जेवणपाणी
**लाभ** - प्राप्त होणे
**पुरे** (क्रि.वि.) - पूर्वी, पूर्वतर
**असिं** (क्रि.) - (मी) होते
**विना** (अ.) - रहित
**मित्त** (पुं.) - मित्र
**भत्त** (नपुं.) - भात
**चोळ** (पुं.) - वस्त्र
**नाधिगं** - मला मिळत नव्हते
**पत्त** (नपुं.) - पात्र
**दण्ड** (पुं.) - काठी
**गहित्वा** (त्वान्त अ.) - हातात धरून
**भिक्खमान** - भिक्षा मागणे
**कुल** (नपुं.) - कुटुंब
**सीतुण्ह** (सीत+उण्ह) - थंडी, ऊन
**डय्ह** (डय्हति) (क्रि.) - जाळणे
**चारिहं** (चारि+अहं) - मी फिरत होते
**पुन** (अ.) - नंतर, एकदिवस
**दिस्वान** - पाहून
**तेविज्जा** - तीन विद्यायुक्त
**अनावस** (वि.) - चित्तमलरहित

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) भिक्खूणी होण्यापूर्वीच्या चन्दाथेरीच्या जीवनाचे वर्णन करा.
(२) चन्दाला कोणी भोजन दिले ?
(३) चन्दाने पटाचाराला कोणती विनंती केली ?
(४) चन्दाने भिक्खूणी झाल्यानंतर काय केले ?

**२. संधी विग्रह करा.**

दुग्गताहं, सीतुण्हेन, चारिहं, तस्साहं

### टिपणे

- धम्मविचाराने स्त्रियांना आधार देऊन कल्याणकारी ज्ञानप्राप्तीचा मार्ग मोकळा केला.
- बुद्धकालीन भिक्खूणींचे स्वकथन वाचावे.

★★★

## ततियो पाठो ।

# हिरि सुत्तं ।

या पाठात मित्राची ओळख कशी करावी याविषयीचे वर्णन तथागतांनी केले आहे. या पाठातून 'मित्रता कशी असावी' याविषयीचे उद्दिष्ट साध्य होते.

---

हिरिं तरन्तं विजिगुच्छमानं, तवाहमस्मि इति भासमानं ।
सय्हानि कम्मानि अनादियन्तं नेसो ममन्ति इति नं विजञ्ञा ॥१॥

अनन्वयं पियं वाचं, यो मित्तेसु पकुब्बति ।
अकरोन्तं भासमानं, परिजानन्ति पण्डिता ॥२॥

न सो मित्तो यो सदा अप्पमत्तो, भेदासंकी रंधमेवानुपस्सी ।
यस्मिं च सेति उरसी व पुत्तो, स वे मित्तो यो परेहि अभेज्जो ॥३॥

पामुज्जकरणं ठानं, पसंसावहनं सुखं ।
फलानिसंसो भावेति, वहन्तो पोरिसं धुरं ॥४॥

पविवेकरसं पित्वा, रस उपसमस्स च ।
निद्दरो होति निप्पापो, धम्मपीतिरसं पिबन्ति ॥५॥

*(हिरिसुत्तं - २-३ सुत्तनिपात खुद्दकनिकायो)*

### सद्दत्थ (शब्दार्थ)

**हिरि** - लाज
**विजिगुच्छमानं** - विजयी होणे
**इति** - खरोखर
**अनादियन्त** - तिरस्कार करणे
**ममन्ति** - माझा
**पकुब्बति** - करणे
**भेदासंकी** - फुट टाकणारा, भेदी
**अप्पमत्तो** - अल्प मताचा
**चसेति** - चेष्टा करणे
**अभेज्जो** - न डळमळणारा, दृढ निश्चयी
**पसंसावहनं** - प्रसन्नचित्त
**भावेति** - कामना करणे

**तरन्तं** - करणारा
**सखाहमस्मिं** - मित्रता
**भासमानं** - बोलणारा
**नेसो** - बसून राहणारा
**अनन्वय** - परिपूर्ण
**अकरोन्त** - अपमान करणे
**रंधमेवानुपस्सी** - सूक्ष्म दोष जाणणारा
**यस्मि** - जो कोणी
**परेहि** - दुसऱ्याचे
**पामुज्जकरणं** - कर्तव्यनिष्ठ
**फलानिसंसो** - फळप्राप्ती
**वहन्तो** - कार्यरत राहणे

**पोरिसं** - पौरुषत्व
**पविवेकरसं** - एकान्त, शान्त
**उपसमस्स** - समाधानी
**निप्पापो** - निर्दोष
**भासमानं** - बोलणारा
**धुरं** - जबाबदार
**पित्वा** - पिणे
**निद्दरो** - निडर, बिनधास्त
**धम्मपीतिरसं** - धम्माबाबतची अभिरुची
**परिजानन्ति** - जाणणारा

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) मित्राची ओळख कशी करावी ?

(२) खरे मित्र कोण ?

(३) कल्याणकारी मित्राची ओळख काय आहे ?

### टिपणे

- मैत्री आणि खरा मित्र यांची ओळख करून घेणे.
- विचारपूर्वक मैत्री करावी.

★★★

चतुत्थो पाठो ।

# राहुल सुत्तं ।

पालि तिपिटकात 'सुत्तनिपात' नावाचा प्राचीन गाथांचा एक संग्रह असून तो 'सत्तपिटका'च्या 'खुद्दकनिकाया'त समाविष्ट केला आहे.

प्रस्तुत सुत्तामधून तथागत बुद्धांनी आयुष्मान राहुलला सांसारिक कामना व इच्छा-आकांक्षांना दूर सारून निब्बाण (निर्वाण) प्राप्त करण्याच्या हेतूने सतत उद्योगी आणि प्रयत्नशील राहण्याचा उपदेश केला आहे.

**बुद्धः** – ''कच्चि अभिण्हसंवासा, नावजानासि पण्डितं ।
उक्काधारो मनुस्सानं, कच्चि अपचितो तया'' ॥१॥

**राहुलः** – ''नाहं अभिण्हसंवासा, अवजानामि पण्डितं ।
उक्काधारो मनुस्सानं, निच्चं अपचितो मया'' ॥२॥

**बुद्धः** – ''पञ्च कामगुणे हित्वा, पियरूपे मनोरमे ।
सद्धाय घरा निक्खम्म, दुक्खस्सन्तकरो भव ॥३॥



मित्ते भजस्सु कल्याणे, पन्तं च सयनासनं ।
विवित्तं अप्पनिग्घोसं, मत्तञ्ञू होहि भोजने ॥४॥

चीवरे पिण्डपाते च, पच्चये सयनासने ।
एतेसु तण्हं माकासि, मा लोकं पुनरागमि ॥५॥

संवुतो पातिमोक्खस्मिं, इन्द्रियेसु च पञ्चसु ।
सति कायगता त्यत्थु, निब्बिदाबहुलो भव ॥६॥

निमित्तं परिवज्जेहि, सुभं रागूपसञ्हितं ।
असुभाय चित्तं भावेहि, एकग्गं सुसमाहितं ॥७॥

अनिमित्तं च भावेहि, मानानुसयमुज्जह ।
ततो मानाभिसमया, उपसन्तो चरिस्ससी'' ति ॥८॥

*(संदर्भग्रंथ - सुत्तनिपातो - चूळवग्गो)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**उक्क** (स्त्री.) – मशाल, उल्का, प्रदीप

**निक्खम्म** (पू.क्रि.) – गृहत्याग करून, घरातून निघून जाऊन, घर सोडून

**मत्तञ्ञू** (वि.) – मात्रज्ञ, प्रमाण कळालेला, मात्रा जाणणारा

**पञ्चकामगुण** (पुं.) – पाच इंद्रियसुखे

**अन्तकर** (वि.) – शेवट करणारा

**विवत्त** (वि.) – एकटा, एकांतात

**पञ्चय** (पुं.) – हेतू, कारण, उद्देश

**मा** - (अ.) - नको, नाही
**परिवज्जेहि** (आ.दु.ए.व) - त्याग कर, दूर ठेव
**चरिस्ससि** (चरति, क्रि.) - विचरण करशील
**मा लोकं पुनरागमि** - पुन्हा या जगात येऊ नकोस
**अनिमित्तं** - निब्बाण, निर्वाण

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) तथागत बुद्धाने राहुलला कोणता प्रश्न विचारला ?

(२) तथागत बुद्धाने राहुलला कोणता उपदेश केला ?

**टिपणे**

- मनाची एकाग्रता, इंद्रियांवर नियंत्रण कसे करावे.
- वयवृद्धत्वापेक्षा ज्ञानवृद्धत्व मोठे आहे. यासाठी सतत प्रयत्नशील राहणे.

★★★

पञ्चमो पाठो ।

# सुखवग्गो ।

'धम्मपद' हा 'सुत्तपिटक-खुद्दकनिकाया'तील दुसरा ग्रंथ आहे. सर्वांत लोकप्रिय आणि महत्त्वाचा ग्रंथ म्हणून 'धम्मपद' जगप्रसिद्ध आहे. २६ वग्गांमध्ये विभागलेला व ४२३ गाथा असणाऱ्या धम्मपदामध्ये सोप्या भाषेत बुद्धांची शिकवण सांगितली आहे. वेगवेगळ्या विषयांनुसार असणाऱ्या ह्या गाथा खूपच अनुभव देणाऱ्या व रोजच्या जीवनाशी निगडित आहेत.

प्रस्तुत पद्यपाठात सुख कशाला म्हणावे, दुक्खातून बाहेर कसे पडावे व सुखाने कसे जगावे हे सांगितले आहे.

---

सुसुखं वत जीवाम, वेरिनेसु अवेरिनो ।
वेरिनेसु मनुस्सेसु, विहराम अवेरिनो ॥१॥

सुसुखं वत जीवाम, आतुरेसु अनातुरा ।
आतुरेसु मनुस्सेसु, विहराम अनातुरा ॥२॥

ससुखं वत जीवाम, उस्सुकेसु अनुस्सुका ।
उस्सुकेसु मनस्सेसु, विहराम, अनुस्सुका ॥३॥

सुसुखं वत जीवाम, येसं नो नत्थि किञ्चनं ।
पीतीभक्खा भविस्साम, देवा आभस्सरा यथा ॥४॥

जयं वेरं पसवति, दुक्खं सेति पराजितो ।
उपसन्तो सुखं सेति, हित्वा जयपराजयं ॥५॥

नत्थि रागसमो अग्गि, नत्थि दोससमो कलि ।
नत्थि खन्धसमा दुक्खा, नत्थि सन्तिपरं सुखं ॥६॥

जिधच्छा परमा रोगा, सङ्खार परमा दुखा ।
एतं ञत्वा यथाभूतं, निब्बानं परमं सुखं ॥७॥

आरोग्यपरमा लाभा, सन्तुट्ठिपरमं धनं ।
विस्सासपरमा ञाति, निब्बान परमं सुखं ॥८॥

पविवेकरसं पित्वा, रसं उपसमस्स च ।
निद्दरो होति निप्पापो, धम्मपीतिरसं पिवं ॥९॥

साहु दस्सनमरियानं, सन्निवासो सदा सुखो ।
अदस्सनेन बालानं, निच्चमेव सुखी सिया ॥१०॥

बालसङ्गातचारी हि, दिघमद्धान सोचति ।

दुक्खो बालेहि संवासो, अमित्तेनेव सब्बदा ॥

धीरो च सुखसंवासो, ञातीनं व समागमो ॥११॥

तस्मा हि - धीरं ञ्च पञ्ञ ञ्च बहुस्सुतञ्च, धीरञ्हसीलं वतवन्तमरियं ।

तं तादिसं सप्पुरिसं सुमेधं, भजेथ नक्खत्तपथं व चन्दिमा ॥१२॥

*(संदर्भग्रंथ - धम्मपद, सुखवग्गो)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**वत** (अ.) - निश्चयाने
**नत्थिकिञ्चनं** (वि.) - ज्याच्या जवळ काही नाही
**देवा आभस्सरा** (वि.) - सत्पुरुषांसारखे प्रकाशमान
**कलि** (पुं.) - पाप, दुर्भाग्य
**यथाभुतं** (वि.) - यथार्थ, जसे आहे तसे
**निद्यरो** (वि.) - निर्भय
**अमित्त** (नपुं.) - शत्रू
**धोरञ्हसीलं** (वि.) - शीलवान, शीलाची धुरा वाहणारा
**भज** (क्रि.) - अनुसरतो
**आतुर** (वि.) - रोगी, रुग्ण
**पीतिभक्खा** (वि.) - प्रसन्नता हाच आहार
**उपसन्तो** (पुं.) - शांत; ज्याने आपला लोभ, दोष, अज्ञान दूर केले आहे असा
**ञाति** (स्त्री.) - नातेवाईक
**सङ्गतचारी** (वि.) - शत्रू
**बहुस्सुत** (वि.) - बहुश्रुत, खूप धम्म ऐकलेला
**वतवन्तु** (वि.) - व्रताचे पालन करणारा

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) पाठाच्या आधारे सुख म्हणजे काय - स्पष्ट करा.

(२) निर्वाणाला सर्वांत मोठे सुख का म्हटले आहे ?

(३) जयपराजयाचा विचार सोडलेली व्यक्ती कशी असते ?

## टिपणे

- खरे सुख व खरे दुःख कोणते आहे, ते समजावून सांगणे.
- सुखाचा व दुःखाचा परिचय करून सत्पुरुष बनावे.

★★★

छट्ठो पाठो ।

# एवं रम्मो हि अस्समो ।

खालील निसर्ग-वर्णनपर गाथा वेस्सन्तर-जातकातून (जातक क्र. ५४७) काही आवश्यक ते फेरफार करून घेण्यात आल्या आहेत. गन्धमादन पर्वत म्हणजे अनोतत्त (शीतल) सरोवराभोवती असणाऱ्या सात पर्वतरांगांपैकी एक सृष्टिसौंदर्याने नटलेली पर्वतांची रांग. तेथील पुष्पसुगंधाने सर्वांना आनंद होतो म्हणून त्यास 'गन्धमादन' हे नाव पडले. 'गन्धेन मदकरो पब्बतो'। तेथील मेघसमान वाटणाऱ्या निळसर वनराई, आंबा, कवठ, फणस, जांभुळ, बेहडा इत्यादी विविध वृक्ष, कोकिळांचे मधुर संगीत, खजुरांच्या माळांनी लगडलेली खजुराची झाडे, सरोवरातील विविध रंगांची कमळे ह्या सर्वांमुळे गन्धमादनाचा परिसर फारच बहारीचा झाला होता. ह्याच रम्य परिसरात दानवीर राजा वेस्सन्तर अरण्यवासात आपल्या कुटुंबासोबत राहत होता.

---

एस सो विस्सुतो कन्तो पब्बतो गन्धमादनो ।
यत्थ आपो च रुक्खा च सकुणा च मनोरमा ।।

एते नीला पतिट्ठन्ति, नाना फलधरा दुमा ।
उग्गता अब्भकूटा' व नीला अञ्जनपब्बता ।।

अम्बा कपित्था पनसा साला जम्बु विभीतका ।
सम्पवेधन्ति वातेन सकिं पीता व माणवा ।।

अव्हयन्तेव गच्छन्तं, साखापत्तसमीरिता ।
रमयन्ते ' व आगन्तं, मोदयन्ति निवासिनं ।।

दुमानं पन साखासु गन्धब्बं पि सुणाथ तं ।
कूजन्ति कोकिला तत्थ सम्पतन्ति दुमा दुमं ।।



अञ्ञेत्थ पुप्फिता अम्ब, अञ्जे तिट्ठन्ति दोविला ।
अञ्जे आमा च पक्का च भिन्नवण्णा तदभयं ॥

परिभोगेहि रुक्खेहि वनं तं रतिवड्ढनं ।
देवानमिव आवासो सोभति नन्दनूपमं ॥

माला' व गन्थिता ढन्ति खज्जुरीनं ब्रह्मवने ।
नभं ताराचितं येव वनं तं पटिभाति मे ।
नानावण्णेहि फुल्लेहि पुप्फेहि रुचिरं बहु ॥

तत्थे' व पुन पोक्खरणी, भूमिभागे मनोरमे ।
पदुमुप्पलसञ्छन्ना, देवानमिव नन्दने ॥

तीणि उप्पलजातानि तस्मिं सरसि पस्सथ ।
नीलानेकानि सेतानि अथो लोहितकानि च ॥

अत्थेत्थ वाता वायन्ति दक्खिणा अथ पच्छिमा ।
पदुमानं च रेणूहि ओकिण्णो होति अस्समो ॥

अथेत्थ सकुणा सन्ति, नानावण्णा मनोहरा ।
मोदन्ति सह भरियाहि, अञ्ञमञ्ञं पकूजिनो ।

दहरा चेव वुड्ढा च रुक्खा तत्थ सुपुप्फिता ।
अस्समं उभतो ठन्ति, अग्यागारं समन्ततो ॥

यानि कानि च पुप्फानि वण्णवन्तानि नन्दने ।
सब्बानि तत्थ विञ्जन्ति, एवं रम्मो हि अस्समो ॥

*(वेस्सन्तर जातक - आवश्यक फेरफार करून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**विस्सुत** (वि.) - प्रसिद्ध
**कन्त** (वि.) - सुंदर
**उग्गत** (वि.) - वर आलेला
**अञ्जनपब्बत** (पुं.) - काजळाचा डोंगर
**दुम** (पुं.) - झाड
**अब्भकूट** (पुं.) - ढगाची कड, ढगाचे निमुळते टोक
**साल** (पुं.) - साल
**सं+प+वेध (सम्पवेधाति)** - हेलकावे खाणे, डोलणे
**पीत** (वि.) - प्यालेला
**प+ठा (पतिट्ठति)** - उभे राहणे
**पब्बत** (पुं.) - डोंगरांची रांग
**आपो** (स्त्री.) - पाणी
**सकुण** (पुं.) - पक्षी
**कपित्थ** (पुं.) - कवठ
**पनस** (पुं.) - फणस
**विभीतक** (पुं.) - बेहडा
**सकिं** (वि.) - पहिल्याप्रथम, एकवार
**व्हे (व्हेति-व्हयति)** - हाक मारणे

**अव्हयन्त** (वि.) - हाक मारणारा (आ+व्हे धातूपासून)
**साखापत्तसमीरित** (वि.) - ज्याच्या शाखा व पाने जोराने हलविली जात आहे असा
**गन्धब्ब** (नपुं.) - गायन, गाण्याचा आवाज
**पुप्फित** (वि.) - मोहोर आलेला, फुललेला
**पक्क** (वि.) - पिकलेला, पूर्ण वाढ झालेला
**परिभोग** (वि.) - उपभोगक्षम, उपयुक्त
**ब्रहा** (वि.) - मोठी
**पटि+भा-(पटिभाति)** - वाटणे, सुचणे
**पदुम** (नपुं.) - रक्तकमळ
**सञ्छन्न** (वि.) - झाकून गेलेला
**ओकिण्ण** (वि.) - भरलेला
**अग्यागार** (नपुं.) - अग्निशाळा
**खज्जुरी** (स्त्री.) - खजुरी
**गच्छन्त** (वि.) - जाणारा, वाटसरू, पांथस्थ
**रमयन्त** (वि.) - आनंदित करणारा
**आ+गन्तु** (पुं.) - येणारा, जवळ येणारा
**सं+पत-संपतति** - उडणे, संचार करणे
**दोविल** (वि.) - नुकतीच पालवी फुटलेला
**भिन्नवण्ण** (पुं.) - वेगळ्या रंगाचा
**रति** (स्त्री.) - आनंद
**ताराचित** (वि.) - तारकांनी गजबललेले, भरलेले
**पोक्खरणी** (स्त्री.) - कमळाचे तळे
**उप्पल** (नपुं.) - नीलकमळ
**वा** (वायति) - वाहणे
**पकूजी** (वि.) - साद घालणारा
**गन्थित** (वि.) - गाठवलेला, गुंफलेला

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) वेस्सन्तराचे निवासस्थान कुठे होते ?

(२) गंधमादन पर्वत कसा दिसत होता ?

(३) गंधमादन पर्वतावर असलेल्या फुलांची व फळांची नावे लिहा.

**टिपणे**

- निसर्गसौंदर्याची ओळख करून देणे.
- परिसरातील निसर्गसौंदर्याचे निरीक्षण करून त्याचे वर्णन करावे.

✶ ✶ ✶

सत्तमो पाठो ।

# अञ्ञासिकोण्डञ्ञ थेरो ।

'थेरगाथा' हा खुद्दनिकायाचा आठवा ग्रंथ आहे. या ग्रंथात २६४ थेरांच्या (म्ह. भिक्खुच्या) गाथा संकलित केल्या आहेत. हा ग्रंथ स्वकथनात्मक स्वरूपाचा असून प्रामुख्याने भिक्खूंच्या भिक्खू होण्यापूर्वीच्या जीवनाची माहिती यात वर्णन केली आहे. तसेच भिक्खू झाल्यावर त्यांच्या जीवनात तथागत बुद्धाच्या उपदेशाने त्यांना उच्च प्रतीचा आनंद कसा प्राप्त झाला याचेही वर्णन या ग्रंथातून दिसून येते. त्या शिवाय भिक्खूंनी तथागत बुद्धाच्या वेगवेगळ्या शिकवणीवर आणि तत्त्वज्ञानावर भाष्य केल्याचे पाहावयास मिळते.

प्रस्तुत गाथा ह्या तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाच्या असून यामध्ये तथागत बुद्धाच्या शिष्यांमध्ये वयाने सर्वांत मोठे आणि सर्वांत प्रथम अर्हंत झालेल्या अञ्ञासिकोण्डञ्ञ थेराने कामासक्त लोकांना उपदेश करताना गायिलेल्या गाथा आहेत. अनिच्च, दुक्ख व अनत्त हे तथागत बुद्धाच्या महान शिकवणीतील तत्त्वज्ञान थेराने सहजगत्या व्यक्त करीत मानवाच्या दुक्ख-मुक्तीचा मार्ग सांगितला आहे.

---

एस भिय्यो पसीदामि, सुत्वा धम्मं महारसं ।  
विरागो देसितो धम्मो, अनुपादाय सब्बसो ॥१॥

बहूनि लोके चित्रानि, अस्मिं पठविमण्डले ।  
मथेन्ति मञ्ञे सङ्कप्पं, सुभं रागूपसंहितं ॥२॥

रजमुहतं च वातेन, यथा मोघोपसम्मये ।  
एवं सम्मन्ति सङ्कप्पा, यदा पञ्ञाय पस्सति ॥३॥

सब्बे सङ्खारा अनिच्चा ति, यदा पञ्ञाय पस्सति ।  
अथ निब्बिन्दति दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया ॥४॥

सब्बे सङ्खरा दुक्खा ति, यदा पञ्ञाय पस्सति ।  
अथ निब्बिन्दति दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया ॥५॥

सब्बे धम्मा अनत्ता ति, यदा पञ्ञाय पस्सति ।  
अथ निब्बिन्दति दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया ॥६॥

बुद्धानुबुद्धो यो थेरो, कोण्डञ्ञो तिब्बनिक्कमो ।  
पहीनजातिमरणो, ब्रह्मचरियस्स केवली ॥७॥

ओघपासो दळहखिलो, पब्बतो दुप्पदालयो ।  
छेत्वा खिलं च पासं च, सेलं भेत्वान दुब्भिदं ॥  
तिण्णो पारङ्गतो झायी, मुत्तो सो मारबन्धना ॥८॥

उद्धतो चपलो भिक्खु, मित्ते आगम्म पापके ।  
संसीदति महोघस्मिं, ऊमिया पटिकुज्जितो ॥९॥

अनुद्धतो अचपलो, निपको संवुतिन्द्रियो ।  
कल्याणमित्तो मेधावी दुक्खस्सन्तकरो सिया ॥१०॥

कालपब्बङ्गसङ्कासो, किसो धमनिसन्थतो ।
मत्तञ्ञू अन्नपानस्मिं अदीनमनसो नरो ॥११॥

फुट्ठो डंसेहि मकसेहि, अरञ्ञस्मिं ब्रहावने ।
नागो सङ्गामसीसे व, सतो सत्राधिवासये ॥१२॥

नाभिनन्दामि मरणं, नाभिनन्दामि जीवितं ।
कालञ्च पटिकङ्खामि, निब्बिसं भतको यथा । ॥१३॥

नाभिनन्दामि मरणं, नाभिनन्दामि जीवितं ।
कालञ्च पटिकङ्खामि, सम्पजानो पतिस्सतो ॥१४॥

परिचिण्णो मया सत्था, कतं बुद्धस्स सासनं ।
आहितो गरूको भारो, भवनेत्ति समूहता ॥१५॥

यस्स चत्थाय पब्बजितो, अगारस्मानगारियं ।
सो मे अत्थो अनुप्पत्तो, किं मे सद्धिविहारिना' ति ॥१६॥

*(थेरगाथा - नालंदा प्रकाशन)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**भिञ्ञो** (अ.) - अत्याधिक, अतिशय
**विरागो -विराग** (पुं.) - अनासक्त, वैराग्ययुक्त
**सब्बसो** (क्रि.वि.) - सर्व तऱ्हेने
**मथन्ति** (मथति, क्रि.) - घुसळतात
**महोघस्मिं** (महोघ पुं.) - महापुरात
**निपको** (वि.) - दक्ष
**धमनिसन्थतो** - संपूर्ण शरीर धमन्या-नसांनी मढलेला
**भत्तको** (भतक, पुं.) - नोकर
**परिचिण्णो** (परिचिण्ण, कृ.) - सेवा केलेला
**पसीदामि (पसीदति)** (क्रि.) - मी प्रसन्न आहे
**देसितो** (देसित कृ.) - उपदेशित, उपदेश केलेला
**पठविमण्डले** - (स्त्री.) - पृथ्वीतलावर
**पहिनजाति**- जन्म-मृत्यू क्षीण झाला
**उम्मिया** (उम्मि, स्त्री.) - लाटा
**किसो** (किस, वि.) - कृश, अशक्त, दुर्बळ
**निब्बिस** (वि.) - स्वतंत्र, मुक्त झालेला
**सम्पजानो** (सम्पजान, वि.) - जागृतीपूर्वक
**गरूको** (गरुक, वि.) - भारी

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) अञ्ञाकोण्डञ्ञो थेराने लोकांना कोणता उपदेश केला ?
(२) मार्गभ्रष्ट भिक्खूंना थेराने कसा उपदेश केला ?
(३) ज्ञानप्राप्ती प्रकट करताना थेर स्वतःबद्दल काय म्हणतात ?

**टिपणे**

- अनिच्च, दुक्ख, अनत्त ह्या संकल्पना स्पष्ट करा.
- बंधन म्हणजे काय? बंधनातून मुक्त कसे व्हावे?

✶✶✶

थूलवाचनं - पठमो पाठो ।

# इस्सत्त सुत्तं ।

सावत्थिनिदानं । एकमन्तं निसिन्नो खो राजा पसेनदि कोसलो भगवन्तं एतदवोच – ''कत्थ नु खो, भन्ते, दानं दातब्बं'' ति ?

''यत्थ खो, महाराज, चित्तं पसीदती'' ति ।

''कत्थ पन, भन्ते, दिन्नं महप्फलं'' ति ?

''अञ्ञं खो एतं, महाराज, कत्थ दानं दातब्बं, अञ्ञं पनेतं कत्थ दिन्नं महप्फलं ति । सीलवतो खो, महाराज, दिन्नं महप्फलं, नो तथा दुस्सीले । तेन हि, महाराज, तञ्ञेवेत्थ पटिपुच्छिस्साम । यथा ते खमेय्य तथा नं ब्याकरेय्यासि । तं किं मञ्ञसि, महाराज, इध त्यस्स युद्धं पच्चुपट्ठिंनं सङ्गामो समुपब्यूळहो । अथ आगच्छेय्य खत्तियकुमारो असिक्खितो अकतहत्थो अकतयोग्गो अकतूपासनो भीरू छम्भी उत्रासी पलायी । भरेय्यासि तं पुरिसं, अत्थो च ते तादिसेन पुरिसेना'' ति ?

''नाहं, भन्ते, भरेय्हं तं पुरिसं, न च मे अत्थो तादिसेन पुरिसेना'' ति ।

''अथ आगच्छेय्य ब्राह्मणकुमारो असिक्खितो .... अथ आगच्छेय्य वेस्सकुमारो असिक्खितो .... अथ आगच्छेय्य सद्दकुमारो असिक्खितो .... न च अत्थो तादिसेन पुरिसेना'' ति ।

'तं किं मञ्ञसि, महाराज, इध त्यस्स युद्धं पच्चुपट्ठितं सङ्गामो समुपब्यूळहो । अथ आगच्छेय्य खत्तियकुमारो सुसिक्खितो कतहत्थो कतयोग्गो कतूपासनो अभीरू अच्छम्भी अनुत्रासी अपलायी । भरेय्यासि तं पुरिसं, अत्थो च ते तादिसेन पुरिसेना'' ति ?

भरेय्याहं, भन्ते, तं पुरिसं, अत्थो च मे तादिसेन पुरिसेना'' ति ।

इदमवोच सत्था एतदहोसि –

''इस्सत्तं बलविरियं च, यस्मिं विज्जेथ माणवे ।
तं युद्धत्थो भरे राजा, नासूरं जातिपच्चया ॥

''तथेव खन्तिसोरच्चं, धम्मा यस्मिं पतिट्ठिता ।
अरियवुतिं मेधाविं, हीनजच्चं पि पूजयो ।

''कारये अस्समे रम्मे, वासयेत्थ बहुस्सुते ।
पपञ्चविवने कयिरा, दुग्गे सङ्कमनानि च ॥

''अन्नं पानं खादनीयं, वत्थसेनासनानि च ।
ददेय्य उजुभूतेसु, विप्पसन्नेन चेतसा ॥

''यथा हि मेघो थनयं, विज्जुमाली सतक्ककु ।
थलं निन्नं च पूरेति, अभिवस्सं वसुन्धरं ॥

"तथेव सद्धो सुतवा, अभिसङ्खच्च भोजनं ।
वनिब्बके तप्पयति, अन्नपानेन पण्डितो ॥

"आमोदमानो पकिरेति, देथ देथा ति भासति ।
तं हिस्सं गज्जितं होति, देवस्सेव पवस्सतो ।
सा पुञ्ञधारा विपुला, दातारं अभिवस्सती" ति ॥

*(संयुत्तनिकायो - आवश्यक ते बदल करून)*

## अभ्यास

**१. खालील प्रश्नाचे मराठीमध्ये उत्तर लिहा.**

(१) 'इस्सत्तसुत्त' थोडक्यात स्पष्ट करा.

★★★

थूलवाचनं - दुतियो पाठो ।

# वसल सुत्तं ।

कोधनो उपनाहि च, पापमक्खी च यो नरो ।
विपन्नदिट्ठि मायावी, तं जञ्ञा वसलो इति ॥१॥

एकजं वा द्विजं वा पि, योध पाणं विहिंसति ।
यस्स पाणे दया नत्थि, तं जञ्ञा वसलो इति ॥२॥

यो हन्ति परिरून्धति, गामानि निगमानि च ।
निग्गाहको समञ्ञातो, तं जञ्ञा वसलो इति ॥३॥

गामे वा यदि वा रञ्ञे, यं परेसं ममायितं ।
थेय्या अदिन्नमादेति, तं जञ्ञा वसलो इति ॥४॥

यो हवे इणमादाय, चुज्जमानो पलायति ।
न हि ते इणमत्थी ति, तं जञ्ञा वसलो इति ॥५॥

यो वे किञ्चिक्खकम्यता, पन्थस्मिं वजन्तं जनं ।
हन्त्वा किञ्चिक्खमादेति, तं जञ्ञा वसलो इति ॥६॥

यो अत्तहेतु परहेतु, धनहेतु च यो नरो ।
सक्खिपुट्ठो मुसा ब्रूति, तं जञ्ञा वसलो इति ॥७॥

यो ञातीनं सखानं वा, दारेसु पटिदिस्सति ।
साहसा संपियेन वा, तं जञ्ञा वसलो इति ॥८॥

यो मातरं वा पितरं वा, जिण्णकं गतयोब्बनं ।
पहू सन्तो न भरति, तं जञ्ञा वसलो इति ॥९॥

यो मातरं वा पितरं वा, भातरं भगिनिं ससुं ।
हन्ति रोसेति वाचाय, तं जञ्ञा वसलो इति ॥१०॥

यो अत्थं पुच्छितो सन्तो, अनत्थमनुसासति ।
पटिच्छन्नेन मन्तेति, तं जञ्ञा वसलो इति ॥११॥

यो कत्वा पापकं कम्मं, मा मं जञ्ञा ति इच्छति ।
यो पटिच्छन्नकम्मन्तो, तं जञ्ञा वसलो इति ॥१२॥

योे वे परकुलं गन्त्वा, भुत्वानं सुचिभोजनं ।
आगतं नप्पटिपूजेति, तं जञ्ञा वसलो इति ॥१३॥

न जच्चा वसलो होति, न जच्चा होति ब्राह्मणो ।
कम्मुना वसलो होति, कम्मुना होति ब्राह्मणो'’ति ॥१४॥

*(सुत्तनिपात-उरगवग्ग - आवश्यक ते फेरफार करून)*

## अभ्यास

१. **खालील प्रश्नाचे मराठीमध्ये उत्तर लिहा.**

(१) 'वसल सुत्त' स्पष्ट करा.

★★★

# परिशिष्ट - १

**टीपा -**

१) पब्बज्जा
२) तिसरण
३) चीवर
४) अर्हंत
५) चरियं

**निबंध —**

१) गामं ।
२) कस्सको ।
३) पाठसाला ।
४) उय्यानं ।
५) रूक्खो ।
६) मम अज्झापको ।

# व्याकरण

## समास

दोन अथवा दोहोंपेक्षा अधिक शब्दांना एकत्र केल्यावर तो शब्द लहान करण्याकरिता विभक्तीचा लोप करून जो एक शब्दसमूह केला जातो त्याला समास म्हणतात.

पालि भाषेत समास सहा आहेत —

(१) अव्वयिभाव = अव्ययीभाव
(२) तप्पुरिस = तत्पुरुष
(३) कम्मधारय = कर्मधारय
(४) बहुव्वीहि = बहुव्रीहि
(५) किरियत्थ = क्रियार्थ
(६) द्वन्द = द्वन्द्व

तत्पुरुष समास - (अमादि) प्रथमा विभक्ति सोडून इतर विभक्तींमधील विभक्ती चिन्हांचा लोप होतो तेव्हा तत्पुरुष समास होतो. उदाहरणार्थ —

| विभक्ति | विग्रह | समास | अर्थ |
|---|---|---|---|
| दुतिया | गामं गतो | गामगतो | गावाला गेलेला |
| दुतिया | कुम्भं करोति | कुम्भकारो | कुंभार |
| ततिया | उरसा गच्छति | उरगो | साप |
| ततिया | पादेहि पिबति | पादपो | झाड |
| ततिया | पितुना सदिसो | पितुसदिसो | पित्याप्रमाणे |
| चतुत्थी | धम्मस्सं देय्यं | धम्मदेय्यं | धर्माला देण्यायोग्य |
| चतुत्थी | रजनाय दोणि | रजनदोणि | रंगविण्याचे भांडे |
| पञ्चमी | चोरेहि भयं | चोरभयं | चोरापासून भय |
| छट्ठी | रुक्खस्स साखा | रुक्खसाखा | झाडाची फांदी |
| छट्ठी | रञ्ञो पुरिसो | राजपुरिसो | शिपाई |
| सत्तमी | वने चरति | वनचरो | वनात फिरणारा |

## बहुब्बीहि (अञ्ञत्थ)

ज्या समासातील शब्द विशेषण होऊन तिसऱ्याच शब्दाचा संकेत प्रकट करतात तेव्हा त्यांना बहुव्रीहि समास म्हणतात. उदाहरणार्थ –

| विग्रह | समास | अर्थ | विग्रह | समास | अर्थ |
|---|---|---|---|---|---|
| बहूनि धनानि यस्स सो | बहुधनो | श्रीमंत | जितानि इंद्रियानि यस्स सो | जितिन्द्रियो | मुनी |
| लम्बा कण्णा यस्स सो | लम्बकण्णो | लांब कानाचा | वजिरं पाणिम्हि यस्स सो | वजिरपाणि | वज्रपाणी (इंद्र) |
| समानं उदरं यस्स सो | सोदरियो | (सक्खा) भाऊ | मना सेट्ठा एतेसं इति | मनोसेट्ठा | धर्म |
| उदकं पीयते अस्मिं इति | उदपानं | पाणवठा | | | |

## द्वन्द (चत्थ)

दोन अथवा जास्त शब्दांतील 'च' (आणि) चा लोप करून जो समास तयार होतो त्याला 'द्वन्द' समास म्हणतात. द्वन्द समास दोन प्रकारचे आहेत – १) समाहार, २) इतरेतर

१) **समाहार :** दोन संज्ञा समासांत येऊन 'च' ने जोडल्यावर अर्थ प्रगट करतात आणि एका समाहाराचा (समूहाचा) बोध करतात, तेव्हा तो समाहार द्वन्द्व समास होतो. हा समास नपुंसकलिंगी असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| मुखं च नासिका च | मुखनासिकं | गीतं च वादितं च | गीतवादितं |
| युगं च नङ्गलं च | युगनङ्गलं | असि च चम्मं च | असिचम्मं |
| अहि च नकलं च | अहिनकुलं | डंसो च मकसो च | डंसमकसं |
| विज्जा च चरणं च | विज्जाचरणं | दासि च दासं च | दासिदासं |
| कण्हो च सुक्को च | कण्णसुक्कं | | |

२) **इतरेतर :** जेव्हा समासातील दोन्ही पदे प्रधान असतात तेव्हा त्यांस इतरेतर द्वन्द्व समास म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| चन्दिमा च सुरियो च | चन्दिमसुरिया | समणो च ब्राह्मणो च | समणब्राह्मणा |
| माता च पिता च | मातापिता | जाया च पति च | जयम्पती |
| पिता च पुत्तो च | पितापुत्तो | | |

१) **समाहार-इतरेतर :** खालील समास समाहार आणि इतरेतर दोन्ही आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| साकं च सालं च | साकसालं | गो च महिसं च | गोमहिसं |
| अजो च एळको च | अजेळकं | हिरञ्ञं च सुवण्णं च | हिरञ्ञसुवण्णं |
| सालि च यवकं च | सालियवकं | कासि च कोसलं च | कासिकोसलं |

# परिशिष्ट

कंसातील योग्य शब्दांचा उपयोग करून कथा पूर्ण करा.

१) अतीते वाराणसियं ——— रज्जं कारन्ते हिमवन्तप्पदेसे बोधिसत्तो कपियोनियं ——— नागबलो थामसम्पन्नो महासरीरो सोभग्गपत्तो हुत्वा गङ्गानिवत्तने अरञ्ञातने ——— कप्पेति । तदा गङ्गाय एको सुंसुमारो वसि । अथस्स भरिया बोधिसत्तस्स सरीरं दिस्वा तस्स हदयमंसे ——— उप्पादेत्वा सुंसुमार आह 'अहं सामि, एतस्स ——— हदयमंसं खादितुकामा' ति ।
(कपिराजस्स, वासं, दोळहं, ब्रह्मदत्ते, निब्बतित्वा)

२) अतीते ---------- ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो हिमवन्तप्पदेसे रुक्खकोट्टक सकुणो हुत्वा ---------- । अथेकस्स सीहस्स मंसं खादन्तस्स अट्ठि ———— लग्गि । गलो उद्धमायि, गोचरं गण्हितुं न सक्कोति, खरा ———— वतन्ति । अथ नं सो सकुणो गोचरपसुता दिस्वा साखाय ---------- 'किन्ते दुक्खं' ति पुच्छि । सो तं अत्थ आचिक्खि । (वेदना, निलीनो, गले, वाराणसियं, निब्बति)

३) सोणा सावत्थियं ———— निब्बति । वयप्पत्ता पतिकुलं गता । दस पुत्तधितरा लभित्वा ———— ति पञ्ञायित्थ । सा ———— पब्बजिते पुत्त धीता घरावासे पतिट्ठापेत्वा सब्बं ———— पुत्तानं विस्सज्जेत्वा अदासि । न किञ्चि ———— ठपेसि । (अत्तनो, धनं, बहुपुत्तिका, सामिके, कुलगेहे)

४) अजिण्ठा गुहायो ———— समीपे सन्ति । गुहायो पब्बतमज्झे सन्ति । सब्बे गुहायो ———— सन्ति । गुहाय काले ———— अत्थि । अजिण्ठा गुहाय मज्झे उत्तम ———— थुपं च चेतियं च सन्ति । तानि पस्सितुं ———— अजिण्ठा गच्छन्ति । (बुद्धसिप्पं, बहुजना, पाचीन, ओरंगाबाद, छब्बीसति )

५) अतीते एकस्मि ———— सिहो च व्यग्घो च द्वे सहायका होन्ति । एकिस्सा येव गुहाय ———— । तदा बोधिसत्तोपि तस्मिं येव पब्बतपादे वसति । अथेक दिवसं तेसं ———— सीतं निस्साय विवादो उदपादि । व्यग्घो 'काले येव सीतं होती' ति ————, सिहो 'जुण्हे येवा' ति । ते उभोपि अत्तनो ———— छिन्दितुं असक्कोन्ता बोधिसत्तस्स सन्तिकं गता । (वसति, पब्बतपादे, सहायकानं, कड्ख, आह)

# सर व्यञ्जना च वग्गिकरणं (स्वर-व्यंजनांचे वर्गीकरण)

## सर (स्वर)

स्वरांचे तीन भागांमध्ये वर्गीकरण करण्यात येते. कच्चायन व्याकरणानुसार ते पुढील प्रमाणे आहेत. जसे - १) रस्स सर २) दीघ सर ३) मज्झिम सर

| रस्स सर | दीघ सर | मज्झिम सर |
|---|---|---|
| अ, इ, उ | आ, ई, ऊ | ए, ओ |

## व्यञ्जना

| पकारो | | वग्गो | कठोर | मुदु | अनुनासिक |
|---|---|---|---|---|---|
| १) कण्ठ्य | - | क-वग्गो | क, ख | ग, घ | ङ |
| २) तालव्य | - | च-वग्गो | च, छ | ज, झ | ञ |
| ३) मुर्द्धन्य | - | ट-वग्गो | ट, ठ | ड, ढ | ण |
| ४) दन्त्य | - | त-वग्गो | त, थ | द, ध | न |
| ५) ओष्ठ्य | - | प-वग्गो | प, फ | ब, भ | म |
| ६) अन्तः | - | ——— | य, र, ल, व, ळ | | |
| ७) उष्माक्षर | - | ——— | स | | |
| ८) प्राणध्वनी | - | ——— | ह | | |
| ९) निग्गहीत | - | ——— | अं | | |

## वण्णमाला (वर्णमाला)

आपल्या मुखातून जे मूळ ध्वनी बाहेर पडतात त्यांना वण्ण (वर्ण) असे म्हणतात. पालि भाषेमध्ये कच्चायन व्याकरणानुसार एकूण ४१ तर मोग्गल्लायन व्याकरणानुसार एकूण ४३ वर्ण आहेत. ज्यामध्ये कच्चायन व मोग्गल्लायन व्याकरणानुसार अनुक्रमे ८ व १० स्वर असून ३३ व्यंजने आहेत. त्यांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे –

### सर (स्वर)

कच्चायन व्याकरणानुसार आठ स्वर आहेत. जसे – अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ

तर मोग्गल्लायन व्याकरणानुसार दहा स्वर आहेत. जसे – अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐॅ, ओ, ओॅ

### व्यञ्जना (व्यंजने)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) कण्ठ्य | - क, ख, ग, घ, ङ | २) | तालव्य | - | च, छ, ज, झ, ञ |
| ३) मुर्द्धन्य | - ट, ठ, ड, ढ, ण | ४) | दन्त्य | - | त, थ, द, ध, न |
| ५) ओष्ठ्य | - प, फ, ब, भ, म | ६) | अन्तःस्थ | - | य, र, ल, व, ळ |
| ७) उष्माक्षर | - स | ८) | प्राणध्वनी | - | ह |
| ९) निग्गहीतं (अनुस्वार) | - अं | | | | |

### सर परिवत्तन (स्वर परिवर्तन)

१) मराठीतील/संस्कृतमधील ऋ, ॠ, ऌ, ऐ, औ, अः हे स्वर पालिभाषेत आढळत नाहीत. 'ऋ' बद्दल काही ठिकाणी 'अ' काही ठिकाणी 'इ' आणि काही ठिकाणी 'उ' होतो.

ऋ - अ = कृषि - कसि, घृत - घत, मृत - मत, शृंखला - संखला.

ऋ - इ = कृमि - किमी, ऋण - इण, श्रृंग - सिंग, तृणं - तिणं.

ऋ - उ = ऋतु - उतु, ऋषभ - उसभ, मृदु - मुदु, मृषा - मुसा.

२) ऌ - मराठीत/संस्कृतमध्ये फार क्वचितच ठिकाणी आढळतो. पालि भाषेत त्याचा सर्वथा अभाव आहे.

३) ऐ - ए = तैल - तेल, ऐरावत - एरावत, शैल - सेल, वैशाख - वेसाख.

ऐ - इ = ऐश्वर्य - इस्सरिय, सैन्धव - सिन्धवी, वैभव - विभवो.

४) औ - ओ = औषध- ओसध, गौतम - गोतम, पौर - पोर, औदारिक - ओदरिक

औ - अ = सौम्य - सम्म                औ - आ = गौरव - गारव

औ - उ = मौत्तिकं - मुत्तिकं, औद्धत्व - उद्धत्व, औत्सुक्यं - उस्सुक्कं

### व्यञ्जण परिवत्तन (व्यंजन परिवर्तन)

१) पालिमध्ये 'श' आणि 'ष' उपयोगात आणला जात नाही. त्याऐवजी 'स' चा उपयोग केला जातो.

श, ष - स = शेष - सेस, आकाश - आकास                श, ष - छ = शावक - छापक, षष्ठ= छट्ठ

२) पालिभाषेत कोणतेही पद हलन्त (व्यंजनात) नसते. अशा अन्त्य व्यंजनाचा लोप केला जातो.

भगवा(न्) - भगवा, गुणवा(न्) - गुणवा, याव(त्) - याव, विद्यु(त्) - विज्जु, पश्चा(त्) - पच्छा.

३) पालि भाषेत अन्त्य 'म' च्या स्थानी नेहमी अनुस्वार असतो.

चितम् - चितं, सत्यम् - सच्चं, तीर्थम् - तित्थं

४) पालिभाषेत विसर्गाचा (ः) चा लोप झाला आहे. संस्कृतातील अकारान्त पदाच्या शेवटी जो विसर्ग असतो त्याच्या जागी पालिमध्ये 'ओ' होतो. इतर ठिकाणी विसर्गाचा अभाव असतो.

बुद्धः = बुद्धो, कः - को, एषः - एसो.

५) विसर्गाच्या पुढे जर स, ज्ञ, ष असेल तर विसर्गाच्या स्थानी 'स' होतो.

दुःसह - दुस्सह, निःशोक - निस्सोक

६) पालिभाषेत 'रेफ (रफार)' चा अभाव आहे. ब्राह्मण - बाह्मण, ब्रह्म - बह्म

अ) सर्व ठिकाणी संयुक्त व्यंजनातील 'र'चा लोप होतो व उरलेला वर्ण द्वित्व पावतो.

कर्ण - कण्ण, पर्ण - पण्ण, कर्म - कम्म, चक्र - चक्क, चर्म - चम्म, धर्म - धम्म, सर्व - सब्ब

आ) संस्कृत/मराठी मधील शब्दाच्या आरंभी 'र'युक्त जोडाक्षर असल्यास पालित त्या 'र' चा लोप होतो. परंतु उरलेला वर्ण द्वित्व पावत नाही.

ग्राम - गाम, प्रजा - पजा, ग्रंथ - गंथ, प्रिय - पिय, प्रकार - पकार, प्रपंच - पपंच.

इ) 'र्य' बद्दल 'रिय' होतो व 'र्य' मागील दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो.

भार्या - भरिया, सूर्य - सुरिय, आर्य - अरिय, कदर्य - कदरिय.

७) अ) दीर्घ स्वराच्या पुढे संयुक्त व्यंजन किंवा अनुस्वार आल्यास दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो.

मार्दव - मद्दिवं, तीर्थ - तिथं, ईश्वर - इस्सर, पराक्रम - परक्कम, कुर्म - कुम्म

शालम् - सालं, नदीम् - नदिं

आ) ऱ्हस्व स्वरातील अनुस्वाराचा लोप होऊन तो ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो व दीर्घ स्वरावर अनुस्वार आला असेल तर तो दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो.

सिंह - सीह, विंशति - वीसति, संदंश - संडास, मांस - मंस, पांशु - पंसु

८) पदातील आदि 'क्ष' चा 'ख' होतो.

क्षीरं - खीरं, क्षेम - खेम

९) पदातील मध्य 'क्ष'चा काही ठिकाणी 'क्ख' तर काही ठिकाणी 'च्छ' होतो.

दक्षिण - दक्खिण, मोक्ष - मोक्ख, पक्ष - पच्छ, अक्षि - अच्छि, अक्खि

१०) 'ड', 'ढ' चा अनुक्रमे 'ळ' किंवा 'ळह' होतो.

दाडिम - दाळिम, गुड - गुळ, षोडस - सोळस, क्रीडा - कीळा, तडाग - तळाक, आषाढ - आसाळह

११) जोडाक्षरात शेवटचे व्यंजन 'म', 'न', 'य' किंवा 'व' असेल तर त्याचा लोप होतो व उरलेल्याचे द्वित्व होते.

युग्म - युग्ग, नग्न - नग्ग, सौम्य - सम्म, अध्वा - अद्धा.

परंतु 'म', 'न', 'य', 'व' हे वर्ण 'ह' शी संयुक्त असतील तर त्याचा लोप होत नाही, पण 'म', 'न', 'यू', 'व' बदलते.

सह्य - सय्ह, वह्नि - वन्हि, परंतु 'ब्राह्मण' व 'ब्रह्म' या ऐवजी 'बाम्हण', 'बम्ह' होतात.

१२) जोडाक्षरातील 'व' चा 'ब' होतो व त्याचे द्वित्व होते.

सर्व - सब्ब, पर्वत - पब्बत

१३) जोडाक्षरांचे पालि शब्दातील इतर काही बदल पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | जोडाक्षर | शब्दारंभी | शब्दामध्ये |
|---|---|---|---|
| १) | त्य, भ्य, द्य, ध्य | च, छ, ज, झ<br>त्याग - चाग<br>युति - जुति<br>ध्यान - झान | च्च, च्छ, ज्ज, ज्झ<br>नृत्य - नच्च<br>मद्य - मज्ज<br>तत्थ - तच्छ |
| २) | स्त, स्थ, ष्ठ | थ, ट, ठ, ट्ठ<br>स्तुति - थुति<br>स्थान - ठान | गृहस्थ - गहट्ठ<br>काष्ठ - कट्ठ |
| ३) | श्च, प्स, त्स | —— | च्छ<br>आश्चर्य - अच्छरिय<br>अप्सरा - अच्छरा<br>वत्स - वच्छ |
| ४) | ष्क, स्क, क्ष | ख<br>स्कन्ध - खन्ध<br>शान्ति - खन्ति | क्ख<br>भिक्षु - भिक्खु<br>शुष्क - सुक्ख |
| ५) | क्ष | छ<br>क्षुब्ध - छुब्द | च्छ<br>इक्षु - उच्छु |
| ६) | स्प, ष्प | फ<br>स्पदन - फंदन | प्फ<br>पुष्प - पुप्फ |
| ७) | न्य, ण्य, ज्ञ | ञ<br>न्याय - ञाय | ञ्ञ<br>कन्या - कञ्ञा<br>प्रज्ञा - पञ्ञा<br>अरण्य - अरञ्ञ |
| ८) | ष्ण | —— | ण्ह<br>उष्ण - उण्ह |

## धातुरूपाविषयी माहिती

१) क्रियावाचक शब्दाला 'धातू' म्हणतात. पालिभाषेत हे धातू १) परस्मपद (परस्मैपद) व २) अत्तनोपद (आत्मनेपद) असे दोन पद प्रकारात विभागले गेले आहेत. मूळ धातूला परस्मैपदाचे प्रत्यय लावून क्रियापद बनवता येते. मात्र संस्कृतातील अनेक आत्मनेपदी धातू पालिभाषेत परस्मैपदी मानून चालवले जातात. एकंदरीत पालिभाषेत आत्मनेपदी क्रियापदांची रूपे कमी आहेत.

२) प्रामुख्याने पालिमध्ये परस्सपदाचा उपयोग करण्यात येतो. आत्मनेपद कर्मणि प्रयोग व कवितेत उपयोगात येते.

३) पालिभाषेत द्विवचन नसल्याने क्रियापद एकवचनी किंवा अनेकवचनी असते.

४) पालि व्याकरणात अनुक्रमे तीन पुरुष आहेत. पालि व मराठी व्याकरणातील पुरुषांमध्ये खालीलप्रमाणे क्रम आहेत-

| पालि | मराठी |
|---|---|
| उत्तम पुरिस | प्रथम पुरुष |
| मज्झिम पुरिस | द्वितीय पुरुष |
| पठम पुरिस | तृतीय पुरुष |

५) काळ व अर्थवाचक काही पालि संज्ञा पुढील प्रमाणे –

| पालि | मराठी |
|---|---|
| १) पच्चुपन्न कालो | वर्तमानकाळ |
| २) हीय्यत्तनी /अतीत कालो | भूतकाळ |
| ३) भविस्सन्ती /अनागत कालो | भविष्यकाळ |

## पच्चुपन्न कालो (वर्तमानकाळ)

वर्तमानकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढील प्रमाणे

| | | | 'पच' - शिजविणे | | | 'अस' - असणे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरिस | एकवचन | अनेकवचन | पुरिस | एकवचन | अनेकवचन | पुरिस | एकवचन | अनेकवचन |
| उत्तमपुरिस | मि | म | उत्तमपुरिस | पचामि | पचाम | उत्तमपुरिस | अत्थि | सन्ति |
| मज्झिमपुरिस | सि | थ | मज्झिमपुरिस | पचसि | पचथ | मज्झिमपुरिस | अस्सि | अत्थ |
| पठमपुरिस | ति | अन्ति | पठमपुरिस | पचति | पचन्ति | पठमपुरिस | अस्मि, अम्हि | अस्म, अम्ह |

(खाद, नम, गच्छ, वस, कस इत्यादी धातू 'पच' प्रमाणे चालतात.)

## हीय्यत्तनी (भूतकाळ)

भूतकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे चालतात –

| | | | 'खाद' - खाणे | | |
|---|---|---|---|---|---|
| पुरिस | एकवचन | अनेकवचन | पुरिस | एकवचन | अनेकवचन |
| उत्तमपुरिस | इं | इम्ह | उत्तमपुरिस | खादिं | खादिम्ह |
| मज्झिपुरिस | इ | इत्थ | मज्झिपुरिस | खादि | खादित्थ |
| पठमपुरिस | इ | इंसु, ऊं | पठमपुरिस | खादि | खदिंसु, खादुं |

(कीळ, हस, लभ, गच्छ, वस इत्यादी धातू 'खाद' प्रमाणे चालतात.)

## भविस्सन्ती/अनागतकालो (भविष्यकाळ)

भविष्यकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे चालतात –

| | | | 'पठ' - शिकणे | | |
|---|---|---|---|---|---|
| पुरिस | एकवचन | अनेकवचन | पुरिस | एकवचन | अनेकवचन |
| उत्तमपुरिस | इस्सामि | इस्साम | उत्तमपुरिस | पठिस्सामि | पठिस्साम |
| मज्झिपुरिस | इस्ससि | इस्सथ | मज्झिपुरिस | पठिस्ससि | पठिस्सथ |
| पठमपुरिस | इस्सति | इस्सन्ति | पठमपुरिस | पठिस्सति | पठिस्सन्ति |

(लभ, गच्छ, नम, वस, कस इत्यादी धातू 'पठ' प्रमाणे चालतात.)

# सन्धी

एकापुढे एक येणारे जवळजवळचे वर्ण एकत्र जोडण्याच्या प्रकारास 'सन्धी' असे म्हणतात. पालिमध्ये तीन प्रकारचे सन्धी आहेत — १) स्वर सन्धी, २) व्यंजन सन्धी, ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी. पालित विसर्ग नसल्यामुळे विसर्ग सन्धी होत नाही.

## १- स्वर सन्धी

दोन स्वर एकापुढे एक असल्यास ते एकमेकांत मिळून जातात. पालि भाषेतील स्वरसन्धी विषयीचे काही प्रमुख नियम पुढील प्रमाणे आहेत.

(१) 'अ'पासून 'ऊ' पर्यंत स्वरापुढे सजातीय (म्हणजे त्याच प्रकारचा) स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल एक दीर्घ स्वर होतो.

| प्रकार | उदाहरण | सन्धी | प्रकार | उदाहरण | सन्धी |
|---|---|---|---|---|---|
| अ+अ | पन+अयं | पनायं | आ+अ | पादा+अपि | पादापि |
| आ+आ | तव्हा+आकुला | तव्हाकुला | इ+इ | उपद्दहन्ति+इति | उपद्दहन्तीति |
| इ+ई | नहि+ईदिसो | नहीदिसो | उ+उ | बहु+उपकारो | बहूपकारो |
| उ+ऊ | बहु+ऊसहन | बहूसहन | | | |

(२) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांचा सन्धी होताना क्वचित पहिल्या स्वराचा लोप होतो.

पुरिस+उत्तमो (= अ + उ) = पुरिसुत्तमो
निलानि+एकानि (=इ+ए) =निलानेकानि
तत्र+इमे (=अ+इ) = तत्रिमे
अज्ज+उपोसथो (= अ+उ) = अज्जुपोसथो
एसो+आवुसो (= ओ +आ) = एसावुसो

(३) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदाचा सन्धी होत असता क्वचित पुढच्या स्वराचा लोप होतो.

रुक्खो + अपि (=ओ+अ) = रुक्खोपि
देवो+अम्हि (=ओ+अ) =देवोम्हि
सो+अहं (=ओ+अ)= सोहं
सो+अपि (=ओ+अ) = सोपि
चत्तारो+इमे (=ओ+इ)= चत्तारोमे

(४) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदाचा सन्धी होत असता कधी कधी दोहोंपैकी एकाही स्वराचा लोप होत नाही.

कञ्ञा+इव (=आ+इ) = कञ्ञाइव
लता+इव (=आ+इ) =लताइव

(५) लोप झालेल्या स्वरापुढे 'इ' असेल तर त्याऐवजी 'ए' होतो आणि 'उ' असेल तर त्याचा 'ओ' होतो.

तस्स+इदं (=अ+इ) =तस्सेद
वात+इरितं (=अ+इ) = वातेरितं
वाम+उरू (=अ+उ)=वामोरू
वि+उदकं (=इ + उ) = वोदकं

(६) 'इ' (ऱ्हस्व-दीर्घ) अथवा 'उ' (ऱ्हस्व-दीर्घ) यांच्यापुढे इतर वर्ण आल्यास 'इ' चा 'य' आणि 'उ' चा 'व' होतो.

वि+आकतो (=अ+आ) = व्याकतो
इति + अस्स (=इ +अ) = इत्यस्स (इच्चस्स)
सु+आगतो (=उ+आ)= स्वागतं
बहु+आबाधो (=उ+आ) = बव्हाबाधो

## २- व्यंजन सन्धी

जेव्हा एक व्यञ्जन दुसऱ्या व्यञ्जनाबरोबर अथवा स्वराबरोबर मिळते तेव्हा त्याला व्यञ्जन सन्धी म्हणतात.

(१) जेव्हा एखाद्या स्वरापुढे पर-अक्षर हे जर व्यञ्जन असेल तर पूर्वी असलेला ऱ्हस्व स्वराचा दीर्घ स्वर होतो आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर होतो –

सम्म+धम्मो (= अ+ध+अ) = सम्माधम्मो

खन्ति+परमं (= इ+प्+अ) = खन्तीपरमं

जायति+सोको (= इ+स्+ओ) = जायतीसोको

मुनि+चरे (=इ +च्+अ) = मुनीचरे

(२) स्वरापुढे व्यञ्जन आले असल्यास केव्हा केव्हा त्या व्यञ्जनाचे द्वित्व होते –

वि+गेहो (=इ+ग्+अ) = विग्गहो

प+गहो (=अ+ग्+अ) = पग्गहो

दु+कतं (=उ+क्+अ) = दुक्कतं

(३) 'ए' आणि 'ओ' च्या नंतर कोणताही वर्ण आल्यास 'ए' आणि 'ओ' चा 'अ' होतो -१-

याचके+आगते (=ए+आ) = याचकमागते

सो+सीलवा (=ओ+स्+इ) = ससीलवा

एस्सो+धम्मो (=ओ+ध्+अ) = एसधम्मो

## ३- निग्गहित (अनुस्वार) सन्धी

निग्गहिता(अनुस्वार)बरोबर स्वर अथवा व्यञ्जन मिळते तेव्हा त्याला निग्गहित सन्धी म्हणतात.

(१) काही वेळा निग्गहिताचा लोप होतो.

सं+रत्तो = सारतो

सं+रागो = सारागो

कथं+अहं = कथाहं

गन्तुं+कामो = गन्तुकामो

बुद्धानं+सासनं = बुद्धानसासनं

एव+अहं = एवाहं

(२) निग्गहिता (अनुस्वारा)पुढे आलेल्या स्वराचा काही वेळा लोप होतो.

त्वं+असि = त्वंसि

किं+इति = किंती

इदं+अपि= इदम्पि

अलं +इदानि = अलन्दानि

(३) जर निग्गहितानंतर 'य', 'एव' तसेच 'हि' हे शब्द आल्यास, निग्गहिताचा काही वेळा 'ञ्ञ' होतो. तसेच 'य' पुढे आल्यास पूर्वीच्या 'सं' शब्दावरील निग्गहिताचा 'ञ्ञ' होतो.

तं+एव = तञ्ञेव

तं+हि = तञ्हि

सं+यमो = सञ्ञमो

सं+यतो = सञ्ञतो

## नामरूपावली

### 'बुद्ध' - अकारान्त पुल्लिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | बुद्धो | बुद्धा | दुतिया | बुद्धं | बुद्धे |
| ततिया | बुद्धेन | बुद्धेहि, बुद्धेभि | चतुत्थी | बुद्धाय, बुद्धस्स | बुद्धानं |
| पञ्चमी | बुद्धा, बुद्धम्हा, बुद्धस्मा | बुद्धेहि, बुद्धेभि | छट्ठी | बुद्धस्स | बुद्धानं |
| सत्तमी | बुद्धे, बुद्धम्हि, बुद्धस्मिं | बुद्धेसु | आलपन | बुद्ध, बुद्धा | बुद्धा |

खालील पुल्लिंगी शब्द 'बुद्ध' नामधातूप्रमाणे चालतात. - नर, मनुस्स, पुरिस, मनुज, सुर, नाग, लोक, संघ, पुत्त, याचक, दारक, वाणिज, सुरिय

### 'दुक्ख' - अकारान्त नपुंसकलिंगी शब्द

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | दुक्खं | दुक्खा, दुक्खानि | दुतिया | दुक्खं | दुक्खे, दुक्खानि |
| ततिया | दुक्खेन | दुक्खेहि, दुक्खेभि | चतुत्थी | दुक्खाय, दुक्खस्स | दुक्खानं |
| पञ्चमी | दुक्खा, दुक्खम्हा, दुक्खस्मा | दुक्खेहि, दुक्खेभि | छट्ठी | दुक्खस्स | दुक्खानं |
| सत्तमी | दुक्खे, दुक्खम्हि, दुक्खस्मिं | दुक्खेसु | आलपन | दुक्खं | दुक्खा, दुक्खानि |

खालील शब्द 'दुक्ख' शब्दाप्रमाणे चालतात —

वन, धन, गाम, पाप, उदक, उय्यान, सोत, ञान

### 'साखा' - आकारान्त स्त्रीलिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | साखा | साखा, साखायो | दुतिया | साखं | साखा, साखायो |
| ततिया | साखाय | साखाभि, साखाहि | चतुत्थी | साखाय | साखानं |
| पञ्चमी | साखाय | साखाहि, साखाभि | छट्ठी | साखाय | साखानं |
| सत्तमी | साखायं, साखाय | साखासु | आलपन | साखे | साखा, साखायो |

खालील शब्द 'साखा' शब्दाप्रमाणे चालतात —

सुजाता, विमला, अम्मा, मेत्ता, गाथा, तण्हा, कञ्ञा, भरिया

### 'मुनि' - इकारान्त पुल्लिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | मुनि | मुनी, मुनयो | दुतिया | मुनिं | मुनी, मुनयो |
| ततिया | मुनिना | मुनीहि, मुनीभि | चतुत्थी | मुनिनो, मुनिस्स | मुनीनं |
| पञ्चमी | मुनिनो, मुनिम्हा, मुनिस्मा | मुनीहि, मुनीभि | छट्ठी | मुनिनो, मुनिस्स | मुनीनं |
| सत्तमी | मुनिम्हि, मुनिस्मिं | मुनिसु, मुनीसु | आलपन | मुनि, मुनी | मुनि, मुनयो |

हे शब्द 'मुनि' शब्दाप्रमाणे चालतात — गण्ठि, गिरी, कपि, अहि, मसि, सालि, अग्गि, निधि

### 'भिक्खु' - उकारान्त पुल्लिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | भिक्खु | भिक्खु, भिक्खवो | दुतिया | भिक्खुं | भिक्खु, भिक्खवो |
| ततिया | भिक्खुना | भिक्खुहि, भिक्खुभि | चतुत्थी | भिक्खुनो, भिक्खुस्स | भिक्खुनं |
| पञ्चमी | भिक्खुना,भिक्खुम्हा,भिक्खुस्मां | भिक्खुहि, भिक्खुभि | छट्ठी | भिक्खुस्स | भिक्खुनं |
| सत्तमी | भिक्खुम्हि, भिक्खुस्मिं | भिक्खुसु | आलपन | भिक्खु | भिक्खु, भिक्खवे, भिक्खवो |

पुढील शब्द 'भिक्खु' शब्दाप्रमाणे चालतात — सेतु, गुरु, भानु, पितु, मेरु, मधु, केतु, बाहु.

# सब्बनामो (सर्वनाम)

## 'अम्ह' - प्रथम पुरुषवाचक सर्वनाम

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | अहं | मयं, अम्हं, नो | दुतिया | मं, ममं | अम्हाकं, अम्हे, नो |
| ततिया | मया, मे | अम्हेहि, अम्हेभि, नो | चतुत्थी | मम, मय्हं, ममं, मे | अम्हं, अम्हाकं |
| पञ्चमी | मया, मे | अम्हेहि, अम्हेभि | छट्ठी | मम, मय्हं, ममं | अम्हं, अम्हाकं |
| सत्तमी | मयि | अम्हेसु | | | |

## 'तुम्ह' - द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | त्वं, तुवं | तुम्हे, वो | दुतिया | त्वं, तुवं, तं, तवं | तुम्हाकं, तुम्हे, वो |
| ततिया | तया, त्वया, ते | तुम्हेहि, तुम्हेभि, वो | चतुत्थी | तव, तुय्हं, तुम्हं, ते | तुम्हाकं, वो |
| पञ्चमी | तया, त्वया, ते | तुम्हेहि, तुम्हेभि, वो | छट्ठी | तव, तुय्हं, तुम्हं, ते | तुम्हाकं, वो |
| सत्तमी | त्वयि, तयि | तुम्हेसु | | | |

'अम्ह' व 'तुम्ह' या सर्वनामांचे रूप तिन्ही लिङ्गात समान असतात.

## 'त' = तो तृतीय पुरुषवाचक सर्वनाम

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | सो | ते, ने | दुतिया | तं, नं | ते, ने |
| ततिया | तेन, नेन | तेहि, तेभि, नेहि, नेभि | चतुत्थी | तस्स, अस्स, नस्स | तेसं, तेसानं, नेसानं |
| पञ्चमी | तम्हा, अम्हा, तस्मा | तेहि, तेभि | छट्ठी | तस्स, अस्स, नस्स | तेसं, तेसानं, नेसानं |
| सत्तमी | तम्हि,अम्हि,तस्मिं,अस्मिं | तेसु | | | |

## 'त' = ती, तृतीय पुरुषवाचक स्त्रीलिंगी (इत्थिलिङ्ग)

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | सा | ता,ताओ, ना,नाओ | दुतिया | तं, नं | ता,तायो,ना,नायो |
| ततिया | ताय, नाय, तस्सा,तिस्सा | ताहि, ताभि, नाहि, नाभि | चतुत्थी | तस्सा, अस्सा,नाय,तिस्सा | तासं,आसं,तासानं |
| पञ्चमी | ताय, नाय, तस्सा, तिस्सा | ताहि, ताभि, नाहि, नाभि | | तिस्साय,तस्साय,ताय | |
| छट्ठी | तस्सा, अस्सा, नाय, तिस्सा, तिस्सायु, तस्साय, नाय | तासं, आसं, तासानं | सत्तमी | तिसं,तस्स,अस्सं,ताये, तस्मा,तिस्सा | तासु |

## 'त' = ते, तृतीय पुरुषवाचक नपुंसकलिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | तं, नं | ते, ने, तानि, नानि | दुतिया | तं, नं | ते, ने, तानि, नानि |

(टीप - इतर विभक्तींची रूपे 'त' पुल्लिंगी प्रमाणे होतात.)

★ ★ ★

# परिशिष्ट - ३

## पालिभाषेचे महत्त्व

अडीच हजार वर्षांपूर्वी भारतामध्ये बोलली जाणारी सर्वसामन्यांची भाषा पालि अर्थात मागधी होती. मागधी भाषेला 'पालि' हे नाव इ.स. पाचव्या शतकात प्रसिद्ध अट्ठकथाकार आचार्य बुद्धघोषथेर यांनी दिले आहे. या भाषेने बुद्धवचनाचे पालन केले (पा पालेति रक्खति ति पालि) म्हणून ती पालि, असा तिचा थोडक्यात अर्थ झाला.

भारतामध्ये आणि भारताबाहेरील अनेक देशांच्या भाषेची जननी म्हणजे आई, पालिभाषाच आहे. म्हणून तर मराठी असो वा हिन्दी, बंगाली वा गुजराती ह्या सर्व आजच्या भाषांमध्ये पालि शब्द भरपूर आढळतात.

पालि ही भारतातील मूळ भाषा असली तरी आपण पालिभाषेची ओळख विसरलो होतो. परंतु आपल्या शेजारच्या बौद्ध राष्ट्रांनी बुद्धाचा धम्मच नव्हे तर त्या धम्माचे रक्षण करणारी भाषादेखील सांभाळली आणि एकोणिसाव्या शतकामध्ये इंग्रजी अभ्यासकांच्या मदतीने पालिभाषा पुन्हा भारतात आली.

पालि ही एक स्वतंत्र भाषा आहे, पण दुर्दैवाने पालि ही प्राकृत भाषेचेच एक अंग आहे असे समजून सुरुवातीला पालिभाषेचा अभ्यास झाल्यामुळे पालिभाषेचे थोडे नुकसान झाले. पण आता जगभरच्या विद्वानांनी मान्य केले की, पालिभाषा ही एक स्वतंत्र भाषा असून तिचे स्वतंत्र व्याकरण आहे. कुठल्याही पुरातन वा नव्या भाषेचे गुण व आवश्यकता पालिभाषा पूर्ण करते. म्हणून पालि ही स्वतंत्र भाषा तर आहेच शिवाय इतर भाषांच्याही पुढे जाऊन पालिभाषेचे काही विशिष्ठ वैशिष्ट्ये आहेत.

पालिभाषेत फक्त बुद्धाचा धम्म आहे आणि धम्माच्या अनुषंगाने येणारे अनुभव आहेत. असे असल्यामुळे पालिभाषेत कल्पनांना, अंधश्रद्धा व कल्पनाविलासांना बिलकूल वाव नाही, आहेत ते फक्त सत्य आणि सत्यावर आधारित विद्वानांचे अनुभव.

पालिभाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पालि अभ्यासाचे तीन अंग - ज्याला परियसि, पटिपत्ति व परिवेदन असे म्हणतात. पालिभाषेतील कुठलाही शब्द तिन्ही प्रकारे जोपर्यंत जाणत नाही तोपर्यंत पालिभाषेचे ज्ञान पूर्ण होत नाही, असे मानण्यात येते.

परियति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे. पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा, विचार-विमर्श करणे आणि पटिवेदन म्हणजे त्या शब्दांचा प्रत्यक्ष अनुभव घेणे. उदाहरणार्थ दुक्खाचा अनुभव. आगीचा चटका लागतो. बाळा, आगीपासून दूर रहा असे सांगणे म्हणजे चटका आणि त्यापासून होणारा त्रास वा दुक्ख हे तो लहान मुलगा नुसता ऐकत असतो. आगीचा चटका व त्याचे दुक्ख ह्यावर तो इतरांशी बोलतो, चर्चा करतो पण नेमका चटका काय असतो ह्याची त्याला जाणीव नसते. त्रास होतो ही ती ऐकीव माहिती तो बरच सांगू शकतो, पण जेव्हा खरोखरीच आगीचा चटका बसतो तेव्हा चटक्याच्या दुक्खाचे खरे ज्ञान होते त्याची अनुभूती मिळते आणि हेच खरे अनुभवाचे ज्ञान असते.

'पालि'मधील शब्दांची अशी तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

आचरिय परंपरेने पालिभाषेतील बुद्धाचे वचन स्मरणात ठेवूनच पिढ्यांपिढ्या सांभाळण्यात आले आहे. बुद्धवचनांची शुद्धता आणि धम्माचे शुद्ध स्वरूप पुढच्या पिढीपर्यंत योग्य तऱ्हेने पोहोचविणे हे प्रत्येक गुरु-शिष्याचे काम होते, तरीसुद्धा ही शुद्धता सांभाळली गेली की नाही ह्याची पडताळणी संगिती किंवा संगायन घेऊन करण्यात येत असे.

आतापर्यंत झालेल्या सहा संगितींमध्ये याची शहानिशा होऊन पालिभाषेतील बुद्धवचनाची शुद्धता पटविण्यात आली आहे.

चौथ्या धम्मसंगितीत हे बुद्धवचन प्रथमच श्रीलंकेत लिहिण्यात आले आणि जसे बोलले जायचे तसेच लिहिले गेले म्हणून आज आपल्याला वाचताना बऱ्याचदा ओळींच्या ओळी पुन्हा पुन्हा वाचाव्या लागतात, शब्द पुन्हा पुन्हा येतात कारण ती, ते शब्द स्मरणात ठेवण्याची एक पद्धत होती.

'पालि'मधील संपूर्ण बुद्धवचनाला तिपिटक म्हणतात. सर्वसाधारणपणे त्याचा अर्थ तीन पिटके किंवा तीन टोपल्या (पेटारे) ह्या अर्थी होतो. पण आपणाला माहीत आहे की, पहिल्या धम्मसंगितीमध्ये जेव्हा तिपिटकाचे संकलन झाले तेव्हा ते मौखिक स्वरूपात होते. सगळे तिपिटक स्मरणात असल्यामुळे टोपलीत काय ठेवले असावे? तर विद्वानांचे असे मत आहे की, पिटक ह्या शब्दाचा अर्थ त्या काळात धम्माचे ज्ञान किंवा धार्मिक साहित्य ह्या अर्थाने करण्यात येत होता.

तिपिटकाव्यतिरिक्त पालिभाषेत तिपिटकावर लिहिलेल्या अठ्ठकथा, अठ्ठकथांवर लिहिलेल्या टिका, अनुटिका वगैरे असे बुद्ध आणि त्यांच्या धम्माशी संबंधित प्रचंड साहित्य आहे.

हे साहित्य फक्त भारतातीलच नव्हे तर बुद्धाचा धम्म ज्या ज्या राष्ट्रांमध्ये गेला तिथे निर्माण झालेले आहे. श्रीलंकेची भाषा 'सिंहली' असली, ब्रह्मदेशाची भाषा 'बरमी' असली तरी बुद्धवचनाची भाषा पालिबद्दल तेथील लोकांना इतका आदर आहे की त्यांनी सर्वांनी पालिभाषा शिकून त्याच भाषेत धम्मावर लिखाण केले. 'वंस साहित्य' हे त्यांच देशांचे पालिभाषेतील साहित्य होय. म्हणून भारतातून विसरलो असलो तरी पालि साहित्य आणि पालिभाषा अडीच हजार वर्षांपासून आजपर्यंत लिहिली गेली आहे.

ह्या राष्ट्रांमध्ये पालिभाषेत लिहिलेच जात नाही तर भिक्खु आणि अभ्यासकांची ती संभाषणाची भाषा आहे. श्रीलंकेतील वा ब्रह्मदेशातील भिक्खू वा अमेरिकेतील वा जर्मन देशातील अभ्यासक एकमेकांशी 'पालि'भाषेत संवाद करू शकतात. म्हणून पालिभाषेला आज आंतरराष्ट्रीय भाषेचा दर्जा प्राप्त होत आहे. आपणदेखील पालिभाषा शिकून आंतरराष्ट्रीय संवादात सहभागी होऊ शकतो.

पालिभाषेतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पालिभाषेत असलेले 'नवाङ्गसत्थुसासन' म्हणजे नऊ अंगांनी युक्त बुद्धांची शिकवण. साधारणपणे अभ्यासल्या जाणाऱ्या इतर भाषांमध्ये गदय, पदय, नाटक असे साहित्याचे प्रकार आढळतात. पालिभाषेत बुद्धांनी नऊ प्रकारे धम्म सांगितला आहे. ते म्हणजे सुत्तं, गेय्यं, वैय्याकरणं, गाथा, उदानं, इतिवुत्तकं, जातकं, अब्भुतधम्मं आणि वेदल्लं.

बुद्धांनी धम्म सामान्य लोकांच्या भाषेत सांगितला, पण सामान्य बोलीभाषेतील पालि शब्दांना त्यांनी खूप अर्थ दिले, नवीन संदर्भ दिले, एक नवीन ताकद दिली जी अनुभवता येऊ शकते म्हणून पालिभाषाच शिकावी लागते. इतर भाषांमध्ये भाषांतर केले तर त्या भाषेची, शब्दांची ताकद भाषांतरित शब्दांत उतरत नाही. उदाहरणार्थ धम्म. धम्म ह्या शब्दाला खूप अर्थ आहेत. धम्म कधी बुद्धाच्या शिकवणीला म्हणतात, तर कधी धम्म हा शब्द निसर्गाच्या नियमाला वा वैज्ञानिक सत्याला म्हटले जाते, मनातील विचारांनादेखील धम्म म्हणतात, मग अशा विविध अर्थांच्या शब्दाचे फक्त धम्म असे भाषांतर योग्य होत नसल्यामुळे जगभरातील कुठल्याही भाषेत पालि शब्द पालितच ठेवण्यात येतात. म्हणून पालि भाषेतच मूळ बुद्धवचन शिकणे सोपे वा सोयिस्कर तर आहेच शिवाय फायदयाचे आहे.

बुद्ध हे जगातील सर्वश्रेष्ठ शिक्षक आहेत. विदयार्थ्यागणिक शिकविण्याची पद्धत वेगळी. शेतकऱ्याला शेतीच्या भाषेत तर संगीतकाराला संगीताच्या भाषेत धम्म शिकवायचे. उदाहरणे देऊन, उपमा देऊन रोजच्या जीवनातील प्रसंग सांगून, गोष्टी सांगून धम्म शिकविण्याचे हजारो उदाहरणे पालिभाषेत आहेत.

समाजातील प्रत्येक स्थरातील माणसांचे मग ते पुरुष असो वा स्त्री, लहान मुले असोत वा म्हातारे, तथाकथित ब्राह्मण असो वा शूद्र, राजा असो वा याचक, भिक्खू असो वा उपासक प्रत्येकाचे दुक्ख दूर करताना बुद्धांनी अनेक गोष्टी सांगितल्या आहेत, ज्या पालिभाषेत सुरक्षित आहेत. पालिभाषा शिकली की हा खजिना आपल्या समोर उघडतो आणि संपूर्ण आयुष्यभर पुरेल एवढे ज्ञान त्यातून घेता येते.

पालिभाषेने राष्ट्रीय एकात्मतेचा मूळ स्त्रोत सांगितला आहे. पञ्ञा, सील, करुणा व मेताभावनेचे अपूर्व मिश्रण या भाषेत सामावलेले आहे. पालिभाषा मधूर व समजण्यास सोपी आहे. तसेच या भाषेला वैचारिक स्वातंत्र्याचा, लोकशाहीचा उदात्त वारसा लाभलेला आहे.

बुद्धाने मानवतेचा पुरस्कार करताना त्यामध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय व नीतिमत्ता यांचा योग्य आग्रह धरलेला आहे. त्यामुळे पालि साहित्यात फक्त गोष्टीच नाहीत तर अडीच हजार वर्षांपूर्वीच्या भारताचा ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, नैतिक आणि सांस्कृतिक अभ्यास करण्याची साधने आहेत. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, वैद्यकशास्त्र, कला आणि स्थापत्य भरून आहे.

जगभरचे विद्वान पालिभाषा शिकण्यासाठी उत्सुक आहेत कारण जगाची उत्पत्ती कशी झाली इथपासून खोटे का बोलू नये ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे ह्या भाषेत दिलेली आहेत.

पालिभाषा तिच्या शुद्ध स्वरूपात शिकून त्यातले ज्ञान आत्मसात करून एक सुजाण व्यक्ती तर बनतोच शिवाय आंतरराष्ट्रीय संवादाचे एक दालन उघडे करतो. ''पालिभाषा शिका आणि आयुष्यात पडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्यात शोधा.''

★★★

## इयत्ता - नववी

# तोंडी - परीक्षा

**विषय - पालि (संपूर्ण) सहामाही आणि वार्षिक** **गुण २०/२०**

सूचना - १) १५-१५ विद्यार्थ्यांचा एक गट तयार करावा.
२) तोंडी परीक्षेची काठिण्यपातळी क्रमबद्ध असावी.
३) तोंडी परीक्षेतील उत्तीर्णता ही स्वतंत्र असेल.

### (१) श्रवण किंवा श्रुतलेखन गुण - ०५

एका-एका गटाला पाच ओळींचे अपठितातील पालि शुद्धलेखन देणे.

### (२) प्रकट वाचन गुण - ०५

विद्यार्थ्यांकडून पाठ्य घटकांच्या संदर्भ ग्रंथातील दोन गाथा अथवा लहान उतारा वाचून घ्यावा.

### (३) भाषण गुण - ०५

प्रत्येक विद्यार्थ्याला ''मम पाठसाला/उय्यानं/कस्सको/रुक्खो'' इत्यादी विषयांपैकी एखाद्या विषयावर सलग चार/पाच वाक्ये पालित बोलण्यास सांगावे.

### (४) संभाषण गुण - ०५

विद्यार्थ्यांना पालित संभाषण करता यावे त्यासाठी त्याला पालिभाषेत ''तव नामं किं अत्थि / तव पाठसालायस्स नामं किं अत्थि / त्वं किं वग्ग मज्झे सिक्खस?'' अशाप्रकारचे प्रश्न विचारून त्यांच्याकडून त्यांची पालिभाषेत उत्तरे वदवून घ्यावीत.

★★★

# प्रश्नपत्रिकेचा आराखडा

## इयत्ता नववी विषय - पालि (संपूर्ण)

**वेळ - ३ तास** **गुण - ८०**

**प्र. १.** **(अ)** कोणत्याही **<u>तीन</u>** उताऱ्यांचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा. **(गद्य)** (१५)

१) २) ३)

४) ५)

**(ब)** कोणत्याही **दोन** उताऱ्यांचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा. **(पद्य)** (०८)

१) २)

३) ४)

**प्र. २.** **(अ)** 'गट एक' मधील व 'गट दोन' मधील प्रश्नांची उत्तरे स्वीकृत माध्यमातून लिहा. (०८)

**गट-१** - गद्यावर आधारित **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) २) ३)

**गट-२** - पद्यावर आधारित **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) २) ३)

**(ब)** खालीलपैकी कोणत्याही **तीन** गाथा शुद्ध व पूर्ण करून लिहा. (०६)

१) २)

३) ४)

**प्र.३.** पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पालित **पाच** ओळींचा निबंध लिहा. (०५)

१) २)

३) ४)

**अथवा / OR / किंवा**

पालित भाषांतर करा.

(**पाच** ओळींचा संमत माध्यमातील उतारा - इंग्रजी/हिन्दी/मराठी)

**प्र. ४.** खालिल **पाच** वाक्यांची घटनाक्रमानुसार फेरमांडणी करा. (०५)

१) २) ३) ४)

५) ६) ७)

**अथवा / OR / किंवा**

रिकाम्या जागा भरून कथा/परिच्छेद पूर्ण करा.

(सुमारे **पाच** ओळी दयाव्यात.)

**प्र. ५.** (अ) कोणत्याही **एका** उताऱ्याचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा. (अपठित पालि उतारे) (०५)

१) २) ३)

(ब) खालील कोणत्याही **दोन** टिपांवर पर्याय निवडा. (०४)

१) २) ३) ४)

५) ६) ७) ८)

**प्र. ६.** स्थुलवाचनावर आधारित कथात्मक किंवा वर्णनात्मक प्रश्न विचारावे. (०४)

**प्र. ७.** कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे पालित लिहा. (आठ प्रश्न गद्य-पद्यावर आधारित असावेत.) (०५)

१) २)
३) ४)
५) ६)
७) ८)

**अथवा / OR /किंवा**

पुढीलपैकी **पाच** अव्यय/उपपद विभक्तींचा वाक्यात उपयोग करा.

१) २)
३) ४)
५) ६)
७) ८)

**प्र. ८.** खालीलपैकी कोणतेही **पाच** उपप्रश्न सोडवा. (१५)

(अ) रूप ओळखा. (कोणतेही **तीन**) (०३)

१) २) ३) ४) ५)

(ब) पुढीलपैकी कोणतेही **तीन** समास ओळखा. (०३)

१) २) ३) ४) ५)

(क) कोणतेही **तीन** संधी करा. (०३)

१) २) ३) ४) ५)

(ड) कोणत्याही **तीन** पालि शब्दांचे माध्यम भाषेत अर्थ सांगा. (०३)

१) २) ३) ४) ५)

(इ) कोणत्याही **तीन** जोड्या जुळवा. (०३)

१) २) ३) ४) ५)

(फ) माध्यम भाषेत शब्दांचे अर्थ सांगा. (कोणतेही **तीन**)२ (०३)

१) २) ३) ४) ५)

★★★

### गज्जो विभागो - पठमो पाठो ।

# तिरतन गुणानि ।

सम्बोधिप्राप्तीनंतर तथागतांनी 'चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय बहुजन सुखाय' असा भिक्खू-समूहाला फार मोठा संदेश देत सतत ४५ वर्षे विचरण केले. पालि तिपिटकातील विनयपिटक या ग्रंथामध्ये याचा उल्लेख प्राप्त होतो.

तत्कालीन भारतीय समाजालाच नव्हे तर संपूर्ण जगाला आपल्या बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच शैक्षणिक नीतिमूल्यांद्वारे फार मोठी देणगी दिलेली आहे. बुद्धकालीन श्रमण - ब्राह्मण - परिव्राजकांमध्ये विविध विषयांवर परस्परांमध्ये चर्चा होत असतांना त्यांचे जेव्हा एकमत होत नव्हते, त्यांच्यामध्ये काही शंका उपस्थित होत होत्या अशावेळी आपल्या शंका निरसनासाठी ते तथागताकडे येत असत. तत्पूर्वी ते बुद्ध, धम्म आणि सङ्घ या तीन रत्नांच्या कल्याणकीर्तीची प्रशंसा करीत असत, त्याचेच वर्णन या पाठामध्ये आलेले आहे.



इतिपि सो भगवा अरहं, सम्मासम्बुद्धो, विज्जाचरण - सम्पन्नो, सुगतो, लोकविदू, अनुत्तरो , पुरिसदम्मसारथि, सत्था देवमनुस्सानं बुद्धो भगवा' ति ।

स्वाक्खातो भगवता धन्मो सन्दिट्ठिको अकालिको एहिपस्सिको ओपनेय्यिको पच्चत्तं वेदितब्बो विञ्ञूही' ति ।

सुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, उजुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, ञायप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, सामीचिप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो यदिदं चत्तारि पुरिसयुगानि, अट्ठ पुरिसपुग्गला, एस भगवतो सावकसङ्घो आहुनेय्यो, पाहुनेय्यो, दक्खिणेय्यो, अञ्जलिकरणियो अनुत्तरं पुञ्ञक्खेत्तं लोकस्सा' ति ।

*(Dr. Babasaheb Ambedkar - Writing and Speeches, Vol. 16 - आवश्यक बदल करून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**भगवा** (पुं.) - तृष्णामुक्त, भगवन्त

**सम्मासम्बुद्धो** (पुं.) (सम्मा +सम्बुद्ध) - संपूर्ण ज्ञानी

**सुगतो** (वि.) - चांगल्या गतीला प्राप्त झालेला

**लोकविदू** (वि) (लोक +विद्) - बुद्धाच्या ठिकाणी असलेले गुणवाचक विशेषण

**सत्था** (पुं.प.वि.) - शास्ता, तथागत

**बुद्धो** (वि.) - (बुध) ज्ञानी, बुद्धिमान

**धम्मो** (पुं.) - धम्म, सिद्धान्त, स्वभाव, सत्य, सदाचार

**सन्दिट्ठिको** - सन्दिट्ठिक (वि.) - दृष्टिस पडणारा, दिसून येणारा

**अरहं** (पुं.) - अर्हत, जीवनमुक्त

**विज्जाचरणसम्पन्नो** (नपुं.) (विज्जू +आचरण) - विद्या आणि आचरणाने युक्त

**अनुत्तर** (नपुं.) - सर्वोत्तम

**पुरिसदम्मसारथी** (अकुशल मार्गाला लागलेल्या) - पुरुषांचे दमन करणारा सारथी

**स्वाक्खात** (वि.) - (सु-आख्यात) - चांगल्याप्रकारे व्याख्या केलेला

**अकालिको** (अ+कालिक) - तात्काळ, वेळीच

**एहिपस्सिक** - जो धम्म सर्वांना सूचित करतो की, या आणि परीक्षा करून पहा / या - अनुभवा

**वेदितब्बो** (विद्) - जाणणे

**सुपटिपन्न** (वि.) - सुमार्गावर आरूढ

**उजु** (वि.) - सरळ

**सामीचि - पटिपन्न** (वि.) - उचित मार्गावर आरूढ

**यदिदं** (वि.) - (यद्+इदं) - म्हणजे

**पुग्गल** (पुं.) - पुद्‌गल, व्यक्ती

**अट्ठ** (वि.) - आठ

**पाहुनेय्यो** (वि.) - आदरातिथ्य करण्यायोग्य

**अञ्जलिकरणियो** - हात जोडण्यायोग्य

**ओपनयिको** (वि.) (उपनय+इक) - जवळ नेणारा.

**पच्चत्तं** (क्रि.वि.) - पृथक-पृथक, व्यक्तिगत

**विञ्ञु** (वि.) - बुद्धिमान, विद्वान, ज्ञाता

**सावकसङ्घ** (पुं.) - शिष्यांचा समूह

**ञायपटिपन्न** (वि.) - चांगल्या मार्गाला नेणारा, न्याय्य मार्गाला नेणारा

**चत्तारि** - चार

**युग** (नपुं.) - जोडी

**आहुनेय्यो** (वि.) - भेट देण्यायोग्य

**दक्खिणेय्यो** (वि.) - दान देण्यायोग्य

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) 'बुद्ध' म्हणजे काय ?

(२) 'धम्म' म्हणजे काय ?

(३) 'सङ्घ' म्हणजे काय ?

**२. खालील पालि प्रश्नांची पालिभाषेतच उत्तरे लिहा.**

(१) बुद्धस्स धम्मो किदिसो होति ?

(२) बुद्धस्स सङ्घो किदिसो होति ?

**टिपण**

- बुद्ध, धम्म आणि सङ्घ या शब्दांची ओळख त्याच्या गुण कार्यावरून करून देणे.
- बुद्ध, धम्म आणि सङ्घ हे 'तिरतन' सर्व रत्नांमध्ये मौल्यवान कसे आहे ते जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

★★★

# अञ्ञमञ्ञं सल्लपनं ।

प्रस्तुत पाठाचा हेतू विद्यार्थ्यांमध्ये पालिभाषेतून संवाद-कौशल्य विकसित व्हावे हा आहे.




**धम्मपालो** - त्वं पालिभासा जानसि ?

**रट्ठपालो** - अहं थोकं थोकं जानामि ।

**धम्मपालो** - त्वं पालिभासा सल्लपितुं सक्कोति ?

**रट्ठपालो** - आम, थोकं थोकं सल्लपितुं सक्कोमि ।

**धम्मपालो** - त्वं नामं किं ?

**रट्ठपालो** - ममं नामं रट्ठपालो ।

**धम्मपालो** - त्वं कुहिं वससि ?

**रट्ठपालो** - अहं नागपूर नगरे दिक्खाभूमिस्स समिपे वसामि ।

**धम्मपालो** - तुय्हं भातुभगिनि किं करोन्ति ?

**रट्ठपालो** - एको वाणिजो, दुतियो कस्सको, एका भगिनि उग्गण्हाति ।

**धम्मपालो** - भगिनि, त्वं पाठसालाया नाम किं अत्थि ?

**भगिनि** - मम पाठसालाय नामं महामाया कञ्ञा माज्झमिकं विज्जालयो अत्थि ।

**धम्मपालो** - त्वं किं कम्मं कातुं इच्छति ?

**भगिनि** - अहं पालि भासाय अज्झायका भवितुं इच्छामि ।

**धम्मपालो** - साधु, साधु, साधु ।

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**त्वं** - तु
**अहं** (प्र.पु. सर्वनाम) - मी
**भवितुं** (भू धातू तुमन्त) - होण्याची शक्यता/इच्छा
**कुहि** - कुठे
**समिप** - जवळ

**अज्झायका** - शिक्षिका
**अत्थि** - आहे
**मय्हं** - आम्ही
**सक्कोति** - शक्य
**कांतु** - ('कर' धातू, तुमन्त) - करण्यासाठी

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) मुलीच्या शाळेचे नाव काय ?

(२) ती कोणते कार्य करू इच्छिते ?

(३) रट्ठपाल कोठे राहतो ?

२. **खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) त्वं कुंहि वससि ?

(२) त्वं भातुभगिनि किं करोति ?

(३) विज्जालयं नाम किं अत्थि ?

(४) त्वं किं कम्मं कातुं इच्छति ?

३. **रिकाम्या जागा भरा.**

(१) अज्झायको - - - - इच्छामि । (भवितुं)

(२) दिक्खाभूमिस्स - - - - वसामि । (समिपे)

### टिपण

- पालिभाषा संवाद-क्षमता वाढविणे.
- पालिभाषा प्राचीन असली तरी तिचा दैनंदिन जीवनात उपयोग करणे. लहान-लहान पालि-वाक्य तयार करणे.

★★★

## ततियो पाठो ।

# तथागतो सम्मासम्बुद्धो ।

प्रस्तुत पाठात तथागत सम्यक सम्बुद्धाचे जीवन-चरित्र थोडक्यात दिले असून त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे वर्णन केले आहे.

---

अम्हाकं तथागतो सम्मासम्बुद्धो । तस्स नाम सिद्धत्थो अहोसि । सो कपिलवत्थु जनपदे लुम्बिनिवने जातो । तस्स पिता सुद्धोदनो महाराजा । तस्स माता महामाया । सा सिद्धत्थस्स बालवये मीयति । बालको सिद्धत्थो विचक्खणो च विचारको च होति । सो सिद्धत्थो सोलसवस्सकाले यसोधरा नाम कञ्ञं वारेसि । सा यसोधरा सीलसम्पन्ना अहोसि । एकूनतिंसतिमे वस्से ते राहुलनामं पुत्तरतनं अलभिंसु ।

तदहेव सिद्धत्थ बालको संसारे असारंभावं पस्सि । सो पञ्चकामा सम्पत्तियो पहायि । तेन रत्तिया मज्झिमे यामे महाभिनिक्खमनं कतं । अनन्तर सिद्धत्थो अनोमा नदीतीरं गतो । ततो सो पब्बजि । ततो अनन्तरं एके रुक्खमूले निसीदि । ततो छब्बस्सानि अनन्तरं बोधिगयायं बोधिरुक्खमूले अभिसम्बुज्झि ।

सो सम्मासम्बुद्धो पञ्चचत्तालीसवस्सानि लोककल्याणायं सद्धम्मं अदेसयि । तदनन्तरे सम्मासम्बुद्धो कुसिनारायं महापरि-निब्बायि ।

### सद्दत्थ (शब्दार्थ)

**तथागत** (वि.) - बुद्ध
**अम्ह** (सर्वनाम) - आपला
**सो** (सर्वनाम) - तो
**पहायि** (क्रि.) - सोडून देणे
**महाभिनिक्खमन** (नपुं.) - अभिनिष्क्रमण करणे
**मीयति** (क्रि.) - मरण पावणे
**विचक्खण** (पुं.) - बुद्धिमान
**च** (अव्यय) - आणि
**विचारक** (पुं.) - विचार करणारा
**होति** (क्रि.) - होता
**सोलसवस्सकाले** - सोळाव्या वर्षी
**कञ्ञा** (स्त्री.) - कन्या, मुलगी
**पञ्चचत्तालीसवस्स** (वि.) - पंचेचाळीस वर्षे
**अदेसयि** - उपदेश केला
**कुसिनारा** (नाम) - कुशीनारा नावाचे नगर

**सम्मासम्बुद्ध** (वि.) - संपूर्ण ज्ञानी
**पञ्चकामसम्पत्ति** (पुं.) - पंचेंद्रियांची भोगवासना व संपत्ती
**जात** (पुं.) - जन्मला
**तस्स** - त्याचा
**सा** (स्त्री. सर्वनाम) - ती
**गतो** (धा.वि.) - गेला
**ततो** (अव्यय) - नंतर
**पब्बजा** - प्रव्रजित होणे
**निसीदि** (क्रि.) - बसणे
**छब्बस्सानि** - सहा वर्षे
**अभिसम्बुज्झि** - बुद्धत्वाला प्राप्त होणे
**वारेसि** (क्रि.) - विवाह झाला
**सीलसम्पन्न** (वि.) - शीलवान, सदाचारी
**अहोसि** (क्रि.) - होणे
**एकूनतिंसतिमे** - एकोणतीस

**वस्स** (नपुं./पुं.) - वर्ष, साल
**महापरिनिब्बयि** (क्रि.) - महापरिनिर्वाणाला प्राप्त होणे, मृत्यू पावणे
**पस्स** (मूळ धातू दिस, क्रि.) - जाणणे, ओळखणे, बघणे
**अलभिंस** (क्रि.) - प्राप्त झाला
**तदहेव** (नपुं.) - त्याच दिवशी
**असारभाव** (वि.) - सारहीन भाव

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सिद्धार्थाचा जन्म कुठे झाला ?
(२) सिद्धार्थाच्या आईचे नाव काय आहे ?
(३) तथागतांनी सम्बोधि कुठे प्राप्त केले ?
(४) तथागताचे महापरिनिर्वाण कोठे झाले ?

**२. जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| १) सो कपिलवत्थु जनपदे | १) तस्स माता महामाया । |
| २) तस्सा पिता सुद्धोदन | २) च विचारकोच होति । |
| ३) बालको सिद्धत्थो विचक्खणो | ३) लुम्बिनीवने जातो । |
| | ४) पुत्तरतनं अलभिंसु । |

**टिपण**

- सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या ऐतिहासिक जीवन-चरित्राचा परिचय करून देणे.
- चिकित्सकवृत्ती, त्यागमय आदर्श जीवन व बुद्धकालीन प्राचीन स्थळांचा परिचय करणे.

★ ★ ★

चतुत्थो पाठो ।

# सुजला सुफला भूमि ।

भारत कृषीप्रधान देश आहे. भारतीय शेतकरी अतिशय कष्ट करून पर्यावरणाचा समतोल साधत अन्नधान्याचे उत्पादन करून देशाला समृद्ध करतो. याचे वर्णन प्रस्तुत पाठात केले आहे.



भूमि येव अम्हाकं भारतीयानं पधानो आजीवो । कसिकम्मं हि अम्हाकं पधानो आजीवो । वस्साकालस्स पुब्बेयेव कस्सका नङ्गलेन कसन्ति भूमिं, वपन्ति च बीजानि भूमियं । ततो च आगच्छति पावुसकालो । आकासे वातो मेघमालं मन्दं मन्द नुदति । मेघे दिस्वा मोरा मज्जन्ति च नच्चन्ति च । अथ आकासतो मेघा खेत्तेसु वारिं सिञ्चन्ति तेन च वारिना तुस्सति सा तण्हाकुला भूमि । वारिनो सिञ्चनेन रजोपि सम्मति । अथ कतिपयेहि एव दिवसेहि सद्दला होति भूमि । ततो परं यथाकालं भूमिया सस्सं जायति । तेन हरितेन सस्सेन तुस्सन्ति हदयानि कस्सकानं । इज्झन्ति तेसं मनोरथा । धञ्ञेन परिपुण्णानि होन्ति कोट्ठागारानि । एवं च –

पुनप्पुनं चेव वपन्ति बीज, पुनप्पुनं वस्सति मेघराजा ।
पुनप्पुन खेत्तं कसन्ति कस्सका, पुनप्पुनं धञ्ञमुपेति रट्ठं ॥

आकासा पतितं वारि, भूमियं पविलीयति ।
भूमिया जायते सस्सं, ततो अन्नं, ततो बलं ॥

अन्नदं बलदं चेव, वण्णदं सुखदं तथा ।
सुजलं सुफलं भूमिं, वन्दाम मातरं ॥

*(स्वयंरचित)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**येव** (अ) (एव) - च
**कसि** (स्त्री.) - शेती, कृषी
**कम्म** (नपुं.) - काम
**पधान** (वि.) - प्रमुख
**आजीव** (पुं.) - उदरनिर्वाहाचे साधन
**वस्सा** (स्त्री.) - पाऊस
**हरित** (वि.) - हिरवा
**हदय** (नपुं.) - हृदय
**इज्झति** (क्रि.) - सफल होणे
**मनोरथ** (नपुं.) - इच्छा, मनसुबा
**कोट्ठगार** (नपुं.) - धान्याचे कोठार
**पुनप्पुनं** (क्रि.वि.) - पुनःपुन्हा
**उपेति** - जवळ जाणे, प्राप्त होणे
**पविलीयति** - विलीन होणे
**ततो** (अ.) - त्यापासून, त्यानंतर
**परं** - (क्रि.वि.) - नंतर
**रज** (नपुं.) - धूळ
**सम्मति** (क्रि.) - शांत होणे
**सद्दला** (वि.) - हिरवळलेली
**सस्स** (नपुं.) - पीक
**जायति** (क्रि.) - जन्मास येणे, निर्माण होणे
**पुब्बे** (अ.) - **पुब्बं** (पूर्व) - सप्तम्यन्त अशी दोन अव्यये 'आधी' ह्या अर्थाने पालित येतात.
**वपति** (क्रि.) - पेरणे
**पावुसकाळ** (पुं.) - पावसाळा
**मज्जति** (क्रि.) - आनंदित
**नच्चति** (क्रि.) - नाचतो
**वारि** (नपुं.) - पाणी
**सिञ्चति** (क्रि.) - सिंचन करणे, शिंपडणे
**तुस्सति** (क्रि.) - सन्तुष्ट
**तण्हा** (स्त्री.) - तहान, तृष्णा
**आकुल** (वि.) - व्याकूळ

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) भारताचा मुख्य व्यवसाय कोणता आहे ?
(२) भारतीय लोकांचे मुख्य उदरनिर्वाहाचे साधन कोणते आहे ?
(३) आकाशातील ढगांना पाहून मोर काय करतात ?
(४) शेतातील हिरवे पीक पाहून शेतकऱ्यांना काय वाटते ?

**२. खालील क्रियापदांस रूपे द्या.**

(१) सिञ्चति, नच्चन्ति, तुस्सति, नुदति, इज्झन्ति ।

### टिपण

- भारतीय कृषीचे महत्त्व स्पष्ट करणे.
- शेतीच्या साधनांचा परिचय करणे.

★ ★ ★

पञ्चमो पाठो ।

# वानरिन्दो च कुम्भिलो च ।

दुष्ट शत्रूला प्रसंगी युक्तीने फसवावे लागते हे या कथेत सांगितले आहे.

एको पीनो वानरिन्दो एकचरो नदीतीरे विहरति । अपरापरं गच्छति । तस्सा नदिया एको कुम्भीलो सपजापतिको वसति । कुम्भीलस्स भरिया एकदा कपिं पस्सति । तस्स हदयमंसे दोळहं उप्पादेति । कुम्भीलं वदति, 'मय्ह खो अय्य, वानरिन्दस्स हदयमंसे दोळह उप्पन्नो' ति । नदीतीरे पिट्ठिपासाणे निपज्जति ।

वानरिन्दो सायण्हसमये पासाणं ओलोके' ति । चिन्तेति च, 'अयं पासाणो इदानि उच्चतरो खायति किन्तु खो कारणं' ति । किञ्चि वीमंसेति । पासाणं पुच्छति, 'किं अज्ज मय्ह पटिवचनं न देसी' ति । कुम्भीलो चिन्तेति, 'अद्धा, अयं पासाणो वानरिन्दस्स पटिवचनं देति । अहम्पि ददामी' ति ।



'किं भो वानरिन्दा' ति ।

'को'सि तवं' ति ।

'अहं कुम्भीलो' ति ।

'किमत्थं निपन्नोसी' ति ।

'तव हदयमंसं इच्छामि' ति ।

वानरिन्दो चिन्तेति, 'अञ्ञो मे गमनमग्गो नत्थि । अज्ज अहं कुम्भीलं वञ्चयामी' ति । वानरिन्दो वदति, 'सम्म कुम्भीलं, त्वं मुखं विवर । अहं तव सन्तिकं आगच्छामी' ति । यदा कुम्भीलो मुखं विवरति नेत्ते च निमीलति । वानरिन्दो तथारूपं तं पस्सति उप्पतति । कुम्भीलस्स मत्थकं अतिक्कमति । विज्जुल्लता विय परतीरं गच्छति ।

*(वानरिन्द जातक, आवश्यक बदल करून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**पीन** (वि.) - धष्टपुष्ट
**एकचर** (वि.) - एकटाच हिंडणारा
**वीमंसेति** (वी+मंस वर्त.का.तृ.पु.ए.व.) - विचार करतो
**पटिवचनं** (नपुं.) - उत्तर, प्रतिउत्तर
**कपि** (पुं.) - वानर
**हदयमंसे** (नपुं.) - सप्तमी ए.व. - हृदयाच्या मांसाविषयी
**दोळह** (नपुं.) - इच्छा, डोहाळे
**उप्पादेति** (उत+पद प्रयोजक वर्त.का.तृ.पु.ए.व) - उत्पन्न झाली
**खो** (अ.) - खरोखर

**वानरिन्द** (पुं.) - वानर
**अपरापरं** (अ.) - इकडून तिकडे
**सपजापतिको** (वि.) - पत्नीसह
**भरिया** (स्त्री.) - भार्या, पत्नी
**अद्धा** (अ.) - खरोखर
**निपन्नोसि** - पडलेला आहेस
**सम्म** - मित्रा
**विवर** - उघडणे
**सन्तिकं** (अ.) - जवळ

**यदा-तदा** - जेव्हा-तेव्हा
**नत्ते** (नपुं. - प्रथमा अ.व.) - नेत्र, डोळे
**निमीलन्ति** (वर्तमानकाळ तृ.पु.अ.व) - मिटतात
**अतिक्कमति** - ओलांडतो
**विय** (अ.) - सारखे

**साधु** (अ.) - ठीक आहे, होय
**पिट्ठिपासाणे** - पाषाणावर
**निपज्जति** (नि+पज्ज वर्त.का.तृ.पु.ए.व.) - पहुडतो
**इदानि** (अ.) - आता, सध्या
**खायति** (वर्त.का.तृ.पु.ए.व.) - भासतो, वाटतो

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) मगराला पत्नीने काय मागितले ?

(२) वानराने मगराला कसे ओळखले ?

(३) वानराने मगराला कसे फसविले ?

**२. रूपे ओळखा.**

कुम्भीलस्स, कपिं, गच्छति, ददामि

**३. संधी विग्रह करा.**

अहापि, नत्थि

**टिपण**

- प्रसंगावधान, बुद्धिचातुर्य
- प्रसंगानुरूप निरीक्षण करून निर्णय घेणे.

★ ★ ★

छट्ठो पाठो ।

# एकङ्गदस्सिनो विवदन्ति ।

कोणत्याही गोष्टीचे सर्व बाजूंनी ज्ञान झाल्याशिवाय खरे स्वरूप कळत नाही. एकांगी मत पूर्ण सत्य नसल्यामुळे त्यातून वादविवाद, भांडण कसे निर्माण होते आणि ज्ञानी माणूस ते भांडण कसे मिटवतो हे या पाठात सांगितले आहे.



एकदा किर एकस्मिं नगरे केचि जच्चन्धा राजमग्गेन गच्छन्ति । अथ एको हत्थिगोपको हत्थिनो नहानत्थं हत्थिना सद्धिं, पटिपथेन नदिं गच्छति । जच्चन्धेहि घण्टाय सद्दं सुत्वा पुच्छितं - ‘कस्सायं सद्दो’ ति ? ‘हत्थिनो घण्टा एसा’ ति । पुन तेहि पुच्छितं - ‘कीदिसो अयं पसु हत्थी नामो’ ति । हत्थिं दट्ठुकामा मयं’ ति ।

हत्थिगोपको ‘पस्सन्तु, अय्या, हत्थी’ ति । वत्वा हत्थिं तेसं सन्तिकं उपनेति । सो तेसं एकच्चस्स हत्थिनो सीसं फुसितुं देति, ‘एदिसो हत्थी’ ति । एकच्चस्स कण्णं, एकच्चस्स दन्त, एकच्चस्स सोण्डं, एकच्चस्स कायं, एकच्चस्स पादं, एकच्चस्स नङ्गुट्ठं च दस्सेति । पुन च हत्थिगोपको पुच्छति - ‘दिट्ठो, अय्या, तुम्हेहि हत्थी, ति ? ‘आम भो’ ति । ‘कीदिसो सो’ ति ।

अथ येन हत्थिस्स सीसं फुसितं तेन एवं वुत्तं - ‘एदिसो, सम्म हत्थी, सेय्यथापि कुम्भो’ ति । येन कण्णो फुसितो तेन वुत्तं - ‘हत्थी खो सुप्पसदिसो’ ति । येन दन्तो फुट्ठो सो वदति - ‘नेवं, हत्थी खीलसदिसो येव होती’ ति । येन सोण्डा फुट्ठा तेन वुत्तं - ‘एदिसो हत्थी सेय्यथापि नङ्गलीसा’ ति । अञ्ञेपि हत्थिस्स कायं पादं नङ्गुट्ठं वालधिं च फुसित्वा अनुक्कमेन ‘हत्थी कोट्ठसदिसो’, ‘थुणसदिसो’, ‘मुसलसदिसो’, ‘समज्जनीसदिसो’ ति वदन्ति । एवं तेसु भण्डनं जातं, कलहो उप्पन्नो । ‘एदिसो हत्थी, नेदिसो हत्थी’ ति ते विवदन्ति । अथ एको पण्डितो पुरिसो तेसं कलहं दिस्वा, तस्स कारणं च अधिगन्त्वा, तेसं सब्बेसं हत्थिस्स सब्बानि अङ्गानि फुसितुं देति । तदा हत्थिं यथाभूतं अधिगन्त्वा ते वदन्ति -

**‘एकङ्गदस्सिनो नून, विवदाम निरत्थंक ।**
**यथाभूतेन ञाणेन, विवादो वूपसम्मती’ ति ॥**

*(उदान, पठमनानातित्थियसुत्तं, आवश्यक ते फेरफार करून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**एकङ्गदस्सी** - केवळ एकच बाजू किंवा अवयव पाहणारा
**जच्चन्ध** (वि.) - जन्माने आंधळा
**हत्थिगोपक** (पुं.) - हत्तीचा माहूत
**सद्द** (पु.) (शब्द) - आवाज
**पसु** (पुं.) (पशु) - प्राणी
**फुसित** - स्पर्श करून चाचपलेला
**सोण्डा** (स्त्री.) - सोण्ड
**नङ्गुट्ठ** (नपुं.) - शेपूट
**सुप्प** (नपुं.) - सूप
**नङ्गलीसा** (नपुं.) - नांगराच्या फाळासारखा
**थुणा** (स्त्री.) - खांब
**भण्डनजात** (वि.) - भांडण उत्पन्न झाले
**ञाण** (पुं.) - ज्ञान
**फुसितुं** (तुमन्त अव्यय) - स्पर्श करण्यास
**यथाभूत** (वि.) - यथार्थ
**विवदन्ति** (क्रि.) - वादविवाद करतात
**राजमग्ग** (पुं.) - राजमार्ग
**घण्टा** (स्त्री.) - घंटा
**एकच्च** (वि.) - एक, काही
**कण्ण** (पुं.) - कान
**दन्त** - दात
**काय** (पुं.) - शरीर
**कुम्भ** (पुं.) - घडा
**खील** (पुं.) - खुंटी
**कोट्ठ** (पुं.) - धान्य कोठीसारखे, कणगी
**सम्मज्जनी** (स्त्री.) - झाडूसारखा
**निरत्थक** (अ.) - विनाकारण, व्यर्थ
**विवाद** - मतभेद, कलह
**अधिगन्त्वा** (पूर्वकालवाचक त्वान्त अव्यय) - जाणून
**वूपसम्मति** (क्रि.) - मिटतो, शांत होतो

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) हत्ती सुपासारखा आहे असे म्हणणाऱ्या जन्माने आंधळ्याने हत्तीच्या कोणत्या अवयवाला स्पर्श केला ?
(२) ज्या आंधळ्याने शेपटीच्या केसांना स्पर्श केला त्याला हत्तीचे रूप कसे वाटले ?
(३) सर्व जन्मांधळे 'एकङ्गदस्सी' होते म्हणजे काय ?

**२. रूपे ओळखा.**

हत्थिस्स, वदन्ति, फुसितुं, अधिगन्त्वा

### टिपण

- व्यापक दृष्टी निर्माण करणे.
- त्रोटक ज्ञानाने वादविवाद होतात. संपूर्ण ज्ञानाने वादविवाद मिटतात.

★ ★ ★

सत्तमो पाठो ।

# नामेन सिद्धि नत्थि ।

माणसाचे नाव महत्त्वाचे नसून कर्म आणि आचरण महत्त्वाचे आहे.

---

अतीते तक्कसिलायं बोधिसत्तो आचरियो अहोसि । तस्सको माणवको 'पापको' नाम नामेन अत्थि । आचरियो तं 'एहि पापक' याहि पापका' ति वुच्चति । पापको चिन्तेसि 'मय्ह नाम अवमङ्गलं । अञ्ञं नामं मे होतु' ति । सो आचरियं आह 'आचरिय, मय्ह नाम अवमङ्गलं । 'अञ्ञं मे नामं कारेथा' ति । आचरिय तं अवोच 'गच्छ तात, जनपद चारिकं चरित्वा अत्तनो अभिरुचितं एकं मङ्गलं नामं आनय । तं अञ्ञं नामं ते करिस्सामी' ति । पापको 'साधू' ति वत्वा निक्खमति ।

गामेन गामं चरति । एकं नगरं आगच्छति । तत्थचेको पुरिसो कालङ्कतो जीवको नाम नामेन । पापको तस्स ञातिजनं पुच्छि - 'किं नामेन पुरिसो' ति ? ''जीवको' ति ।'' ''जीवकोपि मरती' ति ?'' ''जीवकोपि मरति, अजीवको पि मरति ।'' नामं नाम पण्णत्तिमत्तं । त्वं बालो मञ्ञे' ति ।

पापको तं कथं सुणित्वा चिन्तेति । अन्तोनगरं गच्छति । अथेकं दासिं सामिका द्वारे रज्जुया पहरति । पापको सामिकं पुच्छि 'कस्मा इमं पोठेथ' ति । 'भतिं दातु न सक्कोती' ति ।'' किं पनस्सा नामं' ति ।'' 'धनपाली नामा' ति ।'' ''नामेन धनपाली समानपि भतिमत्तं दातुं न सक्कोती' ति । धनपालियोपि, अधनपालियोपि दुग्गता होन्ति । नामं नाम पण्णत्तिमत्तं । त्वं पन बालो मञ्ञे' ति ।

पापको तं पि कथं सुणाति । बोधिसत्तो आचरियस्स सन्तिकं आगच्छति वुच्चति च । ''आचरिय, नामं नाम पण्णत्तिमत्तं । नामेन सिद्धि नत्थि, कम्मेनेव सिद्धि । अलं मय्ह अञ्ञेन नामेन । तदेव मे नामं होतू' ति ।

*(नामसिद्धिजातक - आवश्यक बदल करून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**नामेन** (नपुं. तृतीय ए.व.) - नावाने, नाम
**माणवको** (पुं.) - शिष्य
**नाम** (अ.) - म्हणजे, म्हणून
**एहि** (आज्ञार्थ) - येइ
**होतु** (आज्ञार्थ तृ.पु.ए.व.) - व्हावे
**याहि** (आज्ञार्थ द्वि.पु.ए.व.) - जा, या
**आह** (ब्रू. भूतकाळ तृ.पु.ए.व.) - म्हणाला
**भति** - मजुरी, पगार, मोबदला
**समाना** ('अस' व.का.धा.वि. (स्त्री.प्रथमा, ए.व.) - असणारी
**जनपदचारिकं** - गावोगाव फिरून
**ञातिजनं** - नातेवाईक
**पण्णत्तिमत्त** - ओळखण्यापुरते, व्यवहारापुरते
**पण्णत्ति** - व्यवहार, ओळख
**मत्त** - मात्र, पुरते
**मञ्ञे** - वाटते
**पोठेथ** - (पोठ् -वर्त.का. द्वि.पु.अ.व.) - मारत आहे
**कारेथ** - करावे 'कर' प्रयोजक
**अवोच** ('वच' भूतकाळ, तृ.पु.ए.व.) - म्हणाला
**सक्कोति** ('सक' व.का.तृ.पु.ए.व.) - शकतो
**अत्तनो** ('अत्ता' पुं. षष्ठीचे ए.व.) - स्वतःला

**दातुं** ('दा' - तुमन्त अव्यय) - देणे
**अभिरुचितं** - आवडीचे
**अलं** (अ.) - पुरे
**गामेन गामं चरति** - गावोगाव फिरणे
**सुणाति** ('सुण' वर्त.का. तृ.पु.ए.व.) - ऐकतो
**वत्वा** ('वच' त्वान्त अव्यय) - बोलून
**निक्खमति** - निघाला, बाहेर पडला
**कलंकतो** - मृत्यू झालेला

## अभ्यास

**१. कंसातील शब्दांचे योग्य रूप वापरून वाक्य पूर्ण करा.**

(१) ——— नाम अवमङ्गलं । (अम्ह)
(२) आचरियो ——— अवोच । (त)
(३) पापको ——— सुणाति । (कथ)
(४) अलं मय्ह अञ्ञेन ——— । (नाम)

**२. रूपे ओळखा.**

चरति, सुणाति, करिस्सामि, गच्छति, दातुं

**टिपण**

- स्वानुभवातून शिष्यांना प्रेरणा देणे.
- प्रत्येकाची ओळख त्याच्या आचरणातून होते.

★★★

अट्ठमो पाठो ।

# चत्तारो वलाहकूपमा पुग्गला ।

समाजात आपल्याला वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्ती आढळतात. बुद्धाने त्यांची चार प्रकारे विभागणी केली आहे. या व्यक्तींची माहिती 'पुग्गलपञ्ञत्ति' या ग्रंथात सापडते. यातील 'पुग्गल' शब्दाचा अर्थ 'मानुस' असा होतो. अशा प्रकारे व्यक्तीचे अथवा माणसांचे 'पञ्ञत्ति' म्हणजे स्पष्टीकरण. प्रस्तुत गद्य पाठ 'पुग्गलपञ्ञत्ति' या ग्रंथातील 'चतुक्क पुग्गल पञ्ञत्ति' या विभागातून घेतला आहे.



कतमे चत्तारो वलाहकूपमा पुग्गला ?

चत्तारो वलाहका – गज्जिता नो वस्सिता, वस्सिता नो गज्जिता, गज्जिता च वस्सिता च नेव गज्जिता नो वस्सितां । एवमेवं चत्तारोमे वलाहकूपमा पुग्गला सन्तो संविज्जमाना लोकस्मिं । कतमे चत्तारो ? गज्जिता नो वस्सिता, वस्सिता नो गज्जिता, गज्जिता च वस्सिता च, नेव गज्जिता नो वस्सिता ।

कथं च पुग्गलो गज्जिता होति नो वस्सिता ? इधकेच्चो पुग्गलो भासिता होति, नो कत्ता । एवं पुग्गलो गज्जिता होति नो वस्सिता । सेय्यथापि सो वलाहको गज्जिता नो वस्सिता, तथुपमो अयं पुग्गलो ।

कथं च पुग्गलो वस्सिता होति नो गज्जिता ? इधकेच्चो पुग्गलो कत्ता होति, नो भासिता । एवं पुग्गलो वस्सिता होति नो गज्जिता । सेय्यथापि सो वलाहको वस्सिता नो गज्जिता, तथुपमो अयं पुग्गलो ।

कथं च पुग्गलो गज्जिता च होति वस्सिता च । इधकेच्चो पुग्गलो भासिता च होति, कत्ता च । एवं पुग्गलो गज्जिता च होति वस्सिता च । सेय्यथापि सो वलाहको गज्जिता च वस्सिता च, तथुपमो अयं पुग्गलो ।

कथं च पुग्गलो नेव गज्जिता होति नो वस्सिता ? इधकेच्चो पुग्गलो नेव भासिता होति नो कत्ता । एवं पुग्गलो नेव गज्जिता होति नो वस्सिता । सेय्यथापि सो वलाहको नेव गज्जिता नो वस्सिता, तथूपमो अयं पुग्गलो । इमे चत्तारो वलाहकूपमा पुग्गला सन्तो संविज्जमाना लोकस्मिं ।

*(पुग्गलपञ्ञत्ति ४.१६)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**वलाहकूपमा** (वि.) वलाहक+उपमा - ढगाची उपमा द्यावी असा, ढगाप्रमाणे असणारा

**पुग्गल** (पुं.) - व्यक्ती

**गज्जिता** (गज्ज - गज्जति कर्तृवाचक नाम) - गर्जना करणारा

**वस्सिता** (वस्स-वस्सति कर्तृवाचक नाम) - वर्षाव करणारा

**संविज्जमान** (सं+विद व.का.धा.वि.) - विद्यमान असणारे

**सन्त** ('अस' व का.धा.वि.) - अस्तित्वात असणारा

**लोक** (पुं.) - जग

**भासिता** (भास - भासति कर्तृवाचक नाम) - बोलणारा

**कत्ता** ('करोति'पासून कर्तृवाचक नाम) - काम करणारा

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) ढग किती प्रकारचे असतात ?

(२) व्यक्ती किती प्रकारच्या असतात हे या पाठाच्या आधारे लिहा.

(३) 'चत्तारो वलाहकूपमा पुग्गला' चे तात्पर्य काय आहे ?

**टिपण**

- निसर्गाचे अवलोकन करून व्यक्तींच्या गुणदोषांचे विश्लेषण करणे.
- ढगाचे निरीक्षण करून व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.

* * *

नवमो पाठो ।

# पुण्णो भिक्खु ।

प्रस्तुत संभाषण सुत्तपिटकातील 'संयुक्तनिकाय' या ग्रंथामधून घेतले आहे. महाराष्ट्रातील 'नालासोफारा' या प्राचीन व्यापारी बंदराजवळ पुण्ण वास्तव्य करणारा होता. तथागत बुद्धाची कीर्ती ऐकून, प्रेरित होऊन त्यांना भेटण्यासाठी गेला. त्यांचा उपदेश ग्रहण करून प्रव्रज्जित झाला. परत येत असताना बुद्धाने त्याची कार्यतत्परता, सहनशीलता व अहिंसामूलक विचार पाहून 'तू धम्म प्रचार कसा करशिल ?' या विषयीचे संभाषण या पाठात आहे.



**बुद्ध** - इमिना त्वं, पुण्ण, मया सङ्खित्तेन ओवादेत ओवदितो कतस्मिं जनपदे विहरिस्ससी' ति ?

**पुण्ण** - अत्थि भन्ते सुनापरन्तो नाम जनपदो, तत्थाहं विहरिस्सामी' ति ।

**बुद्ध** - चण्डा खो, पुण्ण, सुनापरन्तका मनुस्सा, फरुसा खो, पुण्ण, सुनापरन्तका मनुस्सा । सचे तं, पुण्ण, सुनापरन्तका मनुस्सा अक्कोसिस्सन्ति, परिभासिस्सन्ति, तत्थ ते पुण्ण किन्ति, भविस्सती' ति ?

**पुण्ण** - भन्ते, तत्थ मे एवं भविस्सति – 'भद्दका, वति' मे सुनापरन्तका मनुस्सा सुभद्दका वाति' मे सुनापरन्तका मनुस्सा, यं मे न यिमे पाणिना पहारं देती' ति । एवमे' त्थ, भगवा भविस्सति ।

**बुद्ध** - सचे पन ते पुण्ण, सुनापरन्तका मनुस्सा पाणिना पहारं दस्सन्ति तत्थ पन ते, पुण्ण किन्ति भविस्सती' ति ?

**पुण्ण** - भद्दका वति' मे, सुनापरन्तका मनुस्सा, यं मे न यिमे लेड्डुना पहारं देन्ती' ति । एवमे' त्थ, भगवा भविस्सति ।

**बुद्ध** - सचे पन ते पुण्ण, लेड्डुना पहारं दस्सन्ति ?

**पुण्ण** - भद्दका, सुभद्दका वति' मे मनुस्सा, यं मे न यिमे दण्डेन पहारं देन्ती' ति । एवमे' त्थ, भगवा भविस्सति ।

**बुद्ध** - सचे पन ते पहारं देन्ती' ति ?

**पुण्ण** - भद्दका, सुभद्दका वाति' मे मनुस्सा, यं मे न यिमे सत्थेन पहारं देन्ती' ति । एवमे'त्थ, भगवा भविसन्ति ।

**बुद्ध** - सचे पन ते सत्थेन पहारं, तिण्हेन सत्थेन जीविता वोरोपन्ती' ति ?

**पुण्ण** - सन्ति खो तस्स भगवतो सावका कायेन अटठीयमा हरायमाना जिगुच्छमाना सत्थहारक परिसेसन्ति, तं मे इदं अपरियिटठञ्जेव सत्थहारकं लद्ध' ति । एवमे' त्थ, भगवा भविस्सति ।

**बुद्ध** - साधु साधु, पुण्ण । सक्खिस्ससि खो, त्वं पुण्ण, इमिना दमूपसमेन समन्नागतो सुनापरन्तस्मिं जनपदे विहारं कर ।

*(३५, ८७, ८८ 'संयुक्त निकाया'मधून आवश्यक फेरबदल करून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**सङ्खित्त** (वि.) - संक्षिप्त सार, थोडक्यात
**जनपद** (पुं.) - राज्य, प्रदेश
**चण्ड** (वि.) - भयानक रागीट
**फरूस** (वि.) - कठोर
**भद्दक** (वि.) - चांगला
**लेड्डु** (पुं.) - ढेकूळ
**सत्थ** (नपुं.) - शस्त्र
**सन्ति** (क्रि.) - आहेत
**हरायमाना** (क्रि.) - लाजिरवाणे
**परियेसति** (क्रि.) - शोधणे
**दमुपसमेन** (पुं.) - संयमाने व शांततेने
**ओवाद** (पुं.) - उपदेश
**सुनापरन्त** (पुं.) - कोकण, गुजरात, कठियावड व कच्छचा भूभाग
**अक्कोस** (पुं.) - अपमान, शिव्याशाप
**पाणि** (पुं.) - हात
**तिण्ह** (वि.) - तीक्ष्ण, धारदार
**वोरोपिति** (क्रि.) - वंचित करणे
**सावक** (पुं.) - शिष्य
**जिगुच्छमाना** (वि.) - घृणित
**साधु साधु** (वि.) - फार उत्तम
**समन्नागतो** (वि.) - युक्त होऊन

## टीप

**पुण्ण** - ह्यांचा जन्म सुनापरन्त देशातील सुप्पारक पट्टणात (बंदरात) झाला होता. व्यापारानिमित्त श्रावस्तीला गेले असताना भगवन्ताचा धम्मोपदेश ऐकून प्रव्रजित झाले. अर्हतपद प्राप्तीनंतर आपल्या सुनापरन्त प्रान्तात धम्मप्रचार करू लागले.

## अभ्यास

१. **खालील प्रश्नाचे मराठीमध्ये उत्तर लिहा.**

पूर्ण भिक्खूने तथागत बुद्धांच्या प्रश्नांना कसे कसे उत्तर दिले ?

२. **रूपे ओळखा.**

विहरिस्ससि, भविस्सति, मनुस्सा, विहारं

**टिपण**

- प्राचीन लोकजीवनाचे अवलोकन करून प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढणे.
- ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नशील असावे.

★★★

## पञ्चो विभागो - पठमो पाठो ।

# मधूर वाचा ।

जागतिक वाङ्मयीन दर्जा प्राप्त असलेल्या पालि तिपिटकातील 'सुत्तपिटका'मध्ये 'खुद्दकनिकाय' या ग्रंथाचा समावेश होतो. 'खुद्दकनिकाय' ग्रंथामध्ये लहानमोठे १५ ग्रंथ असून 'धम्मपद' हा दुसऱ्या क्रमांकावर आहे.

प्रस्तुत पद्यपाठ 'धम्मपद' या ग्रंथातून घेतला आहे. मधुरवाचा ही बुद्धवाणी असून यामध्ये नैतिकमूल्य व सामाजिक मूल्यांचे संवर्धन केले आहे.

---

सब्बे तसन्ति दण्डस्स, सब्बेसं जीवितं पियं ।
अत्तानं उपमं कत्वा, न हनेय्य न घातये ॥१॥

यो च बुद्धं च धम्मं च सङ्घं च सरणं गतो ।
चत्तारि अरियसच्चानि सम्मप्पञ्ञाय पस्सति ॥२॥

अक्कोधेन जिने कोधं, असाधुं साधुना जिने ।
जिने कदरियं दानेन, सच्चेनालिकवादिन ॥३॥

सुरामेरयपानं च यो नरो अनुयुञ्जति ।
इधेवमेसो लोकस्मिं मूलं खणति अत्तनो ॥४॥

न तेन थेरो होति येनस्स पलितं सिरो ।
परिपक्को वयो तस्स मोघजिण्णो' ति वच्चति ॥५॥

यम्हि सच्चं च धम्मो च अहिंसा संयमो दमो ।
स वे वन्तमालो धीरो थेरो' ति पवुच्चति ॥६॥



न मुडकेन समणो अब्बतो अलिकं भणं ।
इच्छालोभसमापन्नो समणो किं भविस्सति ॥७॥

न तेन अरियो होति येन पाणानि हिंसति ।
अहिंसा सब्बपाणानं अरियो' ति पवुच्चति ॥८॥

यथापि भमरो पुप्फं वण्णगन्धं अहेठयं ।
पलेति रसमादाय एवं गामे मुनी चरे ॥९॥

चन्दनं तगरं वा पि उप्पलं अथ' वस्सिकी ।
एतेसं गन्धजातान सीलगन्धो अनुत्तरो ॥१०॥

*(धम्मपद - निवडक गाथा)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

तसन्ति (क्रि.) - घाबरतात
कत्वा (कर, पूर्वकालवाचक त्वान्त अव्यय) - कर
न हनेय्य - मारू नये
अहेठयं - इजा न करता
अदाय - घेऊन
गाम (पुं.) - गाव
जिने - जिंकावे
कदरियं (नपुं.) - कंजूष
अलीकवादी (वि.) - खोटे बोलणारा
पलित सिरो - पांढरे केस झाल्याने
वन्तमल (वि.) - चित्तमळ बाहेर काढले आहे
अनुत्तरो (वि.) - सर्वोत्तम
अब्बतो (वि.) - व्रत न पाळणारा
अलिकंभण - खोटे बोलणारा
वण्णगन्धं (पुं.) - वर्ण आणि गंध
घातये - मारायला लावू नये
सम्मप्पञ्ञाय (स्त्री.) - योग्य विचाराने
चरति (क्रि.) - फिरणे
उप्पल (नपुं.) - कमळ
वस्सिकी (स्त्री.) - जाई
तगर (नपुं.) - तगर
गन्धजातानं (नुपुं.) - सुगन्धप्रकार
सीलगन्ध (नपुं.) - शीलगन्ध

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) खरा वयवृद्ध कोणाला म्हणावे ?

(२) मधुरवाचा कशाला म्हणावे ?

**२. खालील पालि शब्दांचे पालित विरुद्धार्थी शब्द लिहा.**

कोध, सच्च, अहिंसा, पिय

**टिपण**

- सामाजिक, नैतिक मूल्यांची ओळख करून देणे.
- बुद्धवचनाची महती जाणून अंगीकार करणे.

★★★

## दुतियो पाठो ।

# सोपाको थेरो ।

सोपाक स्थविर श्रावस्तीमधील दरिद्री मातेचा पुत्र होता. त्याची माता प्रसववेदनांनी दीर्घकाळपर्यंत मूर्च्छितावस्थेत राहिल्याने तिच्या नातलगांनी तिला मृत समजून उत्तरक्रियेसाठी स्मशानात नेले. वादळवारा व पावसाने त्रस्त नातलग उत्तरक्रिया न करताच परत निघून गेले. तेवढ्यात मुलाचा जन्म झाला व त्याची आई तत्काळ मरण पावली. स्मशानपाळाने त्याचे पालनपोषण केले. तो त्याच्या 'सुप्पिय' नावाच्या मुलाबरोबर वाढला. स्मशानपाळाने त्याला दत्तक घेतले. स्मशानात जन्म झाल्यामुळे त्याला 'सोपाक' नाव मिळाले. सोपाक भिक्खुसंघात प्रविष्ट होऊन अर्हत झाले. बुद्धसहवास व बुद्धसंवादाचे वर्णन त्यांनी येथे केले आहे.

---

दिस्वा पासादछायायं, चङ्कमन्तं नरुत्तमं ।
तत्थ नं उपसङ्कम्म, वन्दिस्सं पुरिसुत्तमं ॥१॥

एकंसं चीवरं कत्वा, संहरित्वान पाणयो ।
अनुचङ्कमिस्सं विरजं, सब्बसत्तानमुत्तमं ॥२॥

ततो पञ्हे अपुच्छि मं, पञ्हानं कोविदो विदू ।
अच्छम्भी च अभीतो च, व्याकासि सत्थुनो अहं ॥३॥

विस्सज्जितेसु पञ्हेसु, अनुमोदि तथागतो ।
भिक्खुसङ्घं विलोकेत्वा, इमं मत्थं अभापसथ ॥४॥

लाभा अङ्गानमगधानं, येसायं परिभुञ्जति ।
चीवरं पिण्डपातञ्च, पच्चयं सयनासनं
पच्चुट्ठानञ्च सामीचिं, तेसं लाभा' ति च ब्रवी ॥५॥

अज्जतग्गे' मं सोपाक, दस्सनायोपसङ्कम ।
एसा चे' व ते सोपाक, भवतु उपसम्पदा ॥६॥

जातिया सत्तवस्सोहं, लद्धान उपसम्पदं ।
धारेमि अन्तिम देहं, अहो धम्मसुधम्मता' ति ॥७॥

*(थेरगाथा)*

### सद्दत्थ (शब्दार्थ)

**दिस्वा** (पूर्वकाळवाचक अव्यय) - पाहून
**पासादछाया** (स्त्री.) - प्रासादाची सावली
**विसज्जित** - प्रश्नांचे दिलेले उत्तर

**व्याकासि** (क्रि.) - स्पष्ट करणे, सांगणे, उत्तर देणे
**चङ्कमन्तं** - चिंतन करीत येरझारा घालताना
**अनुमोदि** (क्रि.) - अनुमोदन केले

**नुरत्तम** (पुं.) - नरश्रेष्ठ
**पुरिसुत्तम** (पुं.) - पुरुषोत्तम
**एकंसं** - एका खांद्यावर
**संहरित्वान** (पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) - एकत्र करून, जोडून
**विरज** (वि.) - निर्मल
**सब्बसत्ततानमुत्तम** (वि.) - सर्व प्राण्यांमध्ये श्रेष्ठ
**भवतु** (क्रि.) - होवो
**उपसम्पदा** (स्त्री.) - भिक्खू-पदाची आजन्म दीक्षा
**अच्छम्भी** (वि.) - अविचल
**अभीत** (वि.) - भयरहित
**धम्मसुधम्मता** - सद्धम्माचा प्रभाव
**विलोकेत्वा** (पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) - मागे वळून पाहून, विलोकन करून
**पिण्डपात** (पुं.) - अन्न
**पच्चय** (पुं.) - प्रत्यय, औषध
**पच्चुट्ठान** (नपुं.) - आदर-सत्कारार्थ उभे राहणे
**सामीचि** (स्त्री.) - योग्य मैत्रीपूर्ण वर्तन
**अज्जतग्गे** - यानंतर, आजपासून पुढे
**कोविद** (वि.) - कुशल, पारंगत
**विदू** - विद्वान
**जातिया** - जन्मापासून
**अन्तिमदेह** (पुं.) - शेवटचा जन्म

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**
   (१) सोपाक स्थविराचा जीवनवृत्तांत थोडक्यात लिहा.
   (२) थेरगाथा ग्रंथाविषयी माहिती लिहा.

**टिपण**

- सामाजिक समता स्थापन करणे आणि समाज-सुधारकांचे कार्य सांगणे.
- समता प्रस्थापित करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करणे.

★★★

तितियो पाठो ।

# महापजापति गोतमी ।

प्रस्तुत पद्य पाठ 'थेरीगाथा' या ग्रंथातून घेतला आहे. या ग्रंथात ७३ थोर स्त्रियांचे स्वकथन शब्दबद्ध केले आहेत. थेरीगाथा हा ग्रंथ 'जगातल्या आद्य कवयित्रींचे भावस्पंदन' आहे. या ग्रंथाला प्राचीनकालीन महिलांच्या स्वातंत्र्याचा दस्तावेज म्हणून संबोधतात. बुद्ध उपदेशाने स्त्रियांचे जीवन कसे उंचावले आणि अर्हतपदाला पोहोचल्यावर जीवनात उच्च प्रतीचा आनंद झाल्यावर स्वकथने केलेली आहेत. बुद्धाच्या प्रेरणेने महापजापतीने पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनासुद्धा प्रव्रज्येचा अधिकार मिळावा या न्याय्य मागणीसाठी लाँगमार्च काढून तो अधिकार प्राप्त केला आणि स्त्रीपुरुष समतेचे पुरस्कर्ते असणाऱ्या बुद्धाने भिक्खूणी संघाच्या स्थापनेस अनुमती दिली. भिक्खूणी होण्याचा पहिला सन्मान महापजापतीला मिळाला. या पाठात तिने दुक्खमुक्त होवून स्वकथन केले आहे.

---

"बुद्धवीर नमो त्यत्थु, सब्बसत्तानं मुत्तमं ।
यो मं दुक्खा पमोचेसि, अञ्ञ श्च बहुकं जनं ।।

सब्बदुक्खं परिञ्ञातं, हेतुतण्हा विसोसिता ।
भावितो अरियट्ठङ्गिको मग्गो, निरोधो फुसितो मया ।।

माता पुत्तो पिता भाता, अय्यिका च पुरे अहुं ।
यथाभुच्चं मजानन्ती, संसरि'हं अनिब्बिसं ।।

दिट्ठो हि मे सो भगवा, अन्तिमो'यं समुस्सयो ।
विक्खीणो जातिसंसारो, नत्थि दानिं पुनब्भवो ।।

आरद्धविरिये पहितत्ते, निच्चं दळहपरक्कमे ।
समग्गे सावके पस्से, एसा बुद्धानं वन्दना ।।

बहून वत अत्थाय, माया जनयि गोतमं ।
व्याधिमरणतुन्नानं, दुक्खक्खन्धं व्यपानुदिं" ति ।।

*(थेरीगाथा)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**नमोत्य' त्थु** (नमोते+अत्थु) - त्याला वंदन असो
**मुच** (मञ्चति) (क्रि.) - मुक्त करणे
**परिञ्ञात** (वि.) (परि+ञ्ञात) - संपूर्णपणे जाणले
**अरियट्ठङ्गिको** (अरिय+अट्ठ+अङ्गिको) - आर्य अष्टांगिक मार्ग
**अय्यिका** (स्त्री.) - आर्या, संगोपन करणारी
**संसरि'हं** (संसरि+अहं) - मी भटकत राहिले

**सब्बसत्ता** (पुं.) - (सब्ब+सत्त) - सर्व प्राणी
**अञ्ञञ्च** (अञ्ञं+चं) - आणि दुसऱ्या
**हेतुतण्हा** (स्त्री.) (हेतु+तण्हा) - तृष्णेचे कारण
**निरोधं** (पुं.) - नष्ट करणारा
**यथाभुच्चं** (अ.) (यथा+भुच्चं) - वास्तविकता
**अनिब्बिस** (अ.) - सतत

**अन्तिमो' यं** (अन्तिमो+अयं) - हा शेवटचा
**आरद्धविरिय** (वि.) (आरद्ध+विरिय) - प्रयत्नशील
**निच्चं** (अ.) - नित्य, सतत
**समग्ग** (वि.) - समग्र, संपूर्ण
**वन्दना** (स्त्री.) - उपदेश, मार्गदर्शन, नमस्कार
**व्याधिमरणतुन्नानं** (व्याधि+मरण+तुन्नानं) - दुःख, मृत्यू यांनी परिपूर्ण
**समुस्सय** (पुं.) - समूह, एकत्रित रूप, शरीर, जन्म
**पहितत्त** (वि.) - संयमी
**दळहपरक्कम** (वि.)(दळह+परक्कम) - दृढ पराक्रम
**सावक** (पु.) - श्रावक, उपासक
**जनयि** (क्रि.) - जन्म दिला
**दुक्खक्खन्ध** (दुक्ख+खन्धं) - दुःख समूह
**व्यपानुदि** (क्रि.) - (वि+अप+नुद) - नाश केला

## टीप

**महापजापति गोतमी** - देवदह नगरातील अंजन शाक्याच्या मुलीचे नाव महापजापति होते. ही सिद्धार्थाची आई(महामाया)ची धाकटी बहीण होती. दोघींचेही लग्न राजा शुद्धोदनाबरोबर झाले. सिद्धार्थ जन्माच्या वेळी सातव्याच दिवशी महामाया मरण पावली. तेव्हा महापजापतिनेच सिद्धार्थाचे पालन-पोषण केले. शुद्धोदनाच्या मृत्यूनंतर महापजापतिने संसार त्यागण्याची इच्छा प्रगट केली, परंतु तथागतांनी प्रारंभी अनुमती दिली नाही. आनंदाच्या आग्रहास्तव तथागतांनी अनुमती दिली. इतर स्त्रियांबरोबर सर्वप्रथम महापजापति प्रव्रजित झाली आणि भिक्खूणींचा वेगळा संघ प्रस्थापित झाला. गोतमवंशीय असल्यामुळे महापजापति गोतमी असे नाव रूढ झाले.

## अभ्यास

**१. खालील प्रश्नाचे मराठीमध्ये उत्तर लिहा.**

(१) महापजापति गोतमीचा जीवनवृत्तान्त लिहा.

## टिपण

- बुद्धाच्या उपदेशाने प्रेरित होऊन स्त्रियासुद्धा भिक्खूणी संघाची स्थापना करून दुक्खमुक्त होतात.
- 'अरियट्ठङ्गिको मग्गो' आणि 'नत्थि दानि पुनब्भवो' संकल्पना समजून घेणे.

★★★

चतुत्थो पाठो ।

# कसिभारद्वाज सुत्तं !

जागतिक वाङ्‌मयीन दर्जा प्राप्त असलेल्या 'पालि तिपिटका'तील 'सुत्तपिटका'मध्ये 'खुद्दकनिकाय' या ग्रंथाचा समावेश होतो. खुद्दकनिकाय ग्रंथामध्ये १५ ग्रंथांचा अंतर्भाव होत असून त्यांपैकी ५वा ग्रंथ 'सुत्तनिपात' होय. हा ग्रंथ अत्यंत प्राचीन ग्रंथ म्हणून वाखाणण्यात आलेला आहे.

प्रस्तुत पद्यपाठ 'सुत्तनिपात' मधून घेतला आहे. यामध्ये कसिभारद्वाज ब्राह्मण व तथागत बुद्ध यांचा शेतीविषयी संवाद आहे. मीसुद्धा तुझ्यासारखाच एक शेतकरी आहे. मी मनाची मशागत करतो आणि या शेतीपासून चिरंतन फळ प्राप्त करतो.

---

''कस्सको पटिजानासि, न च पस्साम ते कसिं ।
कसिं नो पुच्छितो ब्रूहि, यथा जानेमु ते कसिं'' ॥१॥

''सद्धा बीजं तपो वुट्ठि, पञ्ञा मे युगनङ्गलं
हिरि ईसा मनो योत्तं, सति मे फालपाचनं ॥२॥

कायगुत्तो वचीगुत्तो, आहारे उदरे यत्तो ।
सच्चं करोमि निद्दानं, सोरच्चं मे पमोचनं ॥३॥

विरियं मे धुरधोरय्हं, योगक्खेमाधिवाहनं ।
गच्छति अनिवत्तन्तं, यत्थ गन्त्वा न सोचति ॥४॥

एवमेसा कसी कट्ठा, सा होति अमतप्फला ।
एतं कसिं कसित्वान, सब्बदुक्खा पमुच्चती'' ति ॥५॥

(सुत्तनिपात)



## सद्दत्थ (शब्दार्थ)

**कस्सको पटिजानसि** - (स्वतःला) शेतकरी म्हणवतोय
**कसिं** (स्त्री.) - शेती, कृषी
**ब्रूहि** (ब्रूति क्रि.) - साग
**वुट्ठि** (स्त्री.) - वर्षा, पाऊस
**युगनङ्गलं** (नपुं.) - जोखड, नांगर
**ईसा** (स्त्री.) - चाबूक
**योत्तं** (नपुं.) - जोखड, जू
**धुरधोरय्ह** (नपुं.) - जोखडाला बांधलेला बैल
**कसित्वान** (पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) - नांगरून
**पस्साम** (दिस) व.का.प्र.पु.अ.) - आम्ही पाहतो
**पुच्छितो** (वि.) - विचारलेला
**यथाजानेमु** (जानति क्रि.) - ज्या प्रकारे कळेल
**पञ्ञा** (स्त्री.) - ज्ञान, बुद्धी
**हिरि** (स्त्री.) - वाईट कृत्याबद्दल वाटणारी लाज
**निद्दानं** (नपुं.) - कापणी यंत्र
**सोरच्चं** (नपुं.) - नम्रता, विनयशीलता
**अनिवत्तन्त** (वि.) - न परतणाऱ्याला

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) शेतकऱ्याला शेतीसाठी कोणत्या साधनांची आवश्यकता असते ?
(२) मनाची मशागत करताना कोणती अवजारे तथागत बुद्धांनी वापरली आहेत ?

### टिपण

- शेतकऱ्यांना बुद्धाने सरळ व सोप्या भाषेत धम्माची शिकवण दिली.
- सद्धा, तपो, पञ्ञा, सति अर्थ समजून घेऊन अंगीकार करणे.

✶ ✶ ✶

# परिशिष्ट - १

**टीपा -**

१) पब्बजा/पब्बज्जा

२) चरियं

३) तिसरण

# व्याकरण

## समास

दोन अथवा दोहोंपेक्षा अधिक शब्दांना एकत्र केल्यावर तो शब्द लहान करण्याकरिता विभक्तीचा लोप करून जो एक शब्दसमूह केला जातो त्याला समास म्हणतात.

पालि भाषेत समास सहा आहेत —

(१) अव्ययिभाव = अव्ययीभाव

(२) तप्पुरिस = तत्पुरुष

(३) कम्मधारय = कर्मधारय

(४) बहुव्वीहि = बहुव्रीहि

(५) किरियत्थ = क्रियार्थ

(६) द्वन्द = द्वन्द्व

तत्पुरुष समास - (अमादि) प्रथमा विभक्ति सोडून इतर विभक्तींमधील विभक्ती चिन्हांचा लोप होतो तेव्हा तत्पुरुष समास होतो. उदाहरणार्थ —

| विभक्ती | विग्रह | समास | अर्थ |
|---|---|---|---|
| दुतिया | गामं गतो | गामगतो | गावाला गेलेला |
| दुतिया | कुम्भं करोति | कुम्भकारो | कुंभार |
| ततिया | उरसा गच्छति | उरगो | साप |
| ततिया | पादेहि पिबति | पादपो | झाड |
| ततिया | पितुना सदिसो | पितुसदिसो | पित्याप्रमाणे |
| चतुत्थी | धम्मस्सं देय्यं | धम्मदेय्यं | धर्माला देण्यायोग्य |
| चतुत्थी | रजनाय दोणि | रजनदोणि | रंगविण्याचे भांडे |
| पञ्चमी | चोरेहि भयं | चोरभयं | चोरापासून भय |
| छट्ठी | रुक्खस्स साखा | रुक्खसाखा | झाडाची फांदी |
| छट्ठी | रञ्ञो पुरिसो | राजपुरिसो | शिपाई |
| सत्तमी | वने चरति | वनचरो | वनात फिरणारा |

## बहुब्बीहि (अञ्ञत्थ)

ज्या समासातील शब्द विशेषण होऊन तिसऱ्याच शब्दाचा संकेत प्रकट करतात तेव्हा त्यांना बहुव्रीहि समास म्हणतात. उदाहरणार्थ –

| विग्रह | समास | अर्थ | विग्रह | समास | अर्थ |
|---|---|---|---|---|---|
| बहूनि धनानि यस्स सो | बहुधनो | श्रीमंत | जितानि इंद्रियानि यस्स सो | जितिन्द्रियो | मुनी |
| लम्बा कण्णा यस्स सो | लम्बकण्णो | लांब कानाचा | वजिरं पाणिम्हि यस्स सो | वजिरपाणि | वज्रपाणी (इंद्र) |
| समानं उदरं यस्स सो | सोदरियो | (सक्खा) भाऊ | मना सेट्ठा एतेसं इति | मनोसेट्ठा | धर्म |
| उदकं पीयते अस्मिं इति | उदपानं | पाणवठा | | | |

## द्वन्द (चत्थ)

दोन अथवा जास्त शब्दांतील 'च' (आणि) चा लोप करून जो समास तयार होतो त्याला 'द्वन्द' समास म्हणतात. द्वन्दसमास दोन प्रकारचे आहेत – १) समाहार, २) इतरेतर

१) **समाहार :** दोन संज्ञा समासांत येऊन 'च' ने जोडल्यावर अर्थ प्रगट करतात, आणि एका समाहाराचा (समूहाचा) बोध करतात, तेव्हा तो समाहार द्वन्द्व समास होतो. हा समास नपुंसकलिंगी असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| मुखं च नासिका च | मुखनासिकं | गीतं च वादितं च | गीतवादितं |
| युगं च नङ्गलं च | युगनङ्गलं | असि च चम्मं च | असिचम्मं |
| अहि च नकलं च | अहिनकुलं | डंसो च मकसो च | डंसमकसं |
| विज्जा च चरणं च | विज्जाचरणं | दासि च दासं च | दासिदासं |
| कण्हो च सुक्को च | कण्णसुक्कं | | |

२) **इतरेतर :** जेव्हा समासातील दोन्ही पदे प्रधान असतात तेव्हा त्यांस इतरेतर द्वन्द्व समास म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| चन्दिमा च सुरियो च | चन्दिमसुरिया | समणो च ब्राह्मणो च | समणब्राह्मणा |
| माता च पिता च | मातापिता | जाया च पति च | जयम्पती |
| पिता च पुत्तो च | पितापुत्तो | | |

१) **समाहार-इतरेतर :** खालील समास समाहार आणि इतरेतर दोन्ही आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| साकं च सालं च | साकसालं | गो च महिसं च | गोमहिसं |
| अजो च एळको च | अजेळकं | हिरञ्ञं च सुवण्णं च | हिरञ्ञसुवण्णं |
| सालि च यवकं च | सालियवकं | कासि च कोसलं च | कासिकोसलं |

# सर व्यञ्जना च वग्गिकरण (स्वर-व्यंजनांचे वर्गीकरण)

## सर (स्वर)

स्वरांचे तीन भागांमध्ये वर्गीकरण करण्यात येते. कच्चायन व्याकरणानुसार ते पुढील प्रमाणे आहेत. जसे - १) रस्स सर २) दीघ सर ३) मज्झिम सर

| रस्स सर | दीघ सर | मज्झिम सर |
|---|---|---|
| अ, इ, उ | आ, ई, ऊ | ए, ओ |

## व्यञ्जना

| एकारो | | वग्गो | कठोर | मुदु | अनुनासिक |
|---|---|---|---|---|---|
| १) कण्ठ्य | - | क-वग्गो | क, ख | ग, घ | ङ |
| २) तालव्य | - | च-वग्गो | च, छ | ज, झ | ञ |
| ३) मुर्द्धन्य | - | ट-वग्गो | ट, ठ | ड, ढ | ण |
| ४) दन्त्य | - | त-वग्गो | त, थ | द, ध | न |
| ५) ओष्ठ्य | - | प-वग्गो | प, फ | ब, भ | म |
| ६) अन्तः | - | ——— | य, र, ल,व, ळ | | |
| ७) उष्माक्षर | - | ——— | स | | |
| ८) प्राणध्वनी | - | ——— | ह | | |
| ९) निग्गहीत | - | ——— | अं | | |

## वण्णमाला (वर्णमाला)

आपल्या मुखातून जे मूळ ध्वनी बाहेर पडतात त्यांना वण्ण (वर्ण) असे म्हणतात. पालि भाषेमध्ये कच्चायन व्याकरणानुसार एकूण ४१ तर मोग्गल्लायन व्याकरणानुसार एकूण ४३ वर्ण आहेत. ज्यामध्ये कच्चायन व मोग्गल्लायन व्याकरणानुसार क्रमशः ८ व १० स्वर असून ३३ व्यंजने आहेत. त्यांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे —

## सर (स्वर)

कच्चायन व्याकरणानुसार आठ स्वर आहेत. जसे — अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ

तर मोग्गल्लायन व्याकरणानुसार दहा स्वर आहेत. जसे — अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऍ, ओ, ऑ

## व्यञ्जना (व्यंजने)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) कण्ठ्य | - | क, ख, ग, घ, ङ | २) तालव्य | - | च, छ, ज, झ, ञ |
| ३) मुर्द्धन्य | - | ट, ठ, ड, ढ, ण | ४) दन्त्य | - | त, थ, द, ध, न |
| ५) ओष्ठ्य | - | प, फ, ब, भ, म | ६) अन्तःस्थ | - | य, र, ल, व, ळ |
| ७) उष्माक्षर | - | स | ८) प्राणध्वनी | - | ह |
| ९) निग्गहीतं (अनुस्वार) | - | अं | | | |

## सर परिवत्तन (स्वर परिवर्तन)

१) मराठीतील/संस्कृतमधील ऋ, , , ऌ, ऐ, औ, अः हे स्वर पालिभाषेत आढळत नाहीत. 'ऋ' बद्दल काही ठिकाणी 'अ', काही ठिकाणी 'इ' आणि काही ठिकाणी 'उ' होतो.

ऋ - अ = कृषि - कसि, घृत - घत, मृत - मत, शृंखला - संखला.

ऋ - इ = कृमि - किमी, ऋण - इण, श्रृंग - सिंग, तृणं - तिणं.

ऋ - उ = ऋतु - उतु, ऋषभ - उसभ, मृदु - मुदु, मृषा - मुसा.

२) ऌ - मराठीत/संस्कृतमध्ये फार क्वचितच ठिकाणी आढळतो. पालि भाषेत त्याचा सर्वथा अभाव आहे.

३) ऐ - ए = तैल - तेल, ऐरावत - एरावत, शैल - सेल, वैशाख - वेसाख

ऐ - इ = ऐश्वर्य - इस्सरिय, सैन्धव - सिन्धवी, वैभव - विभवो

४) औ - ओ = औषध- ओसध, गौतम - गोतम, पौर - पोर, औदारिक - ओदरिक

औ - अ = सौम्य - सम्म                    औ - आ = गौरव - गारव

औ - उ = मौत्तिकं - मुत्तिकं, औद्धत्व - उद्धत्व, औत्सुक्यं - उस्सुक्कं

## व्यञ्जन परिवत्तन (व्यंजन परिवर्तन)

१) पालिमध्ये 'श' आणि 'ष' उपयोगात आणला जात नाही. त्याऐवजी 'स' चा उपयोग केला जातो.

शं, ष - स = शेष - सेस, आकाश - आकास                    श, ष - छ = शावक - छापक, षष्ठ = छट्ठ

२) पालिभाषेत कोणतेही पद हलन्त (व्यंजनात) नसते. अशा अन्त्य व्यंजनाचा लोप केला जातो.

भगवा(न्) - भगवा, गुणवा(न्) - गुणवा, याव(त्) - याव, विद्यु(त्) - विज्जु, पश्चा(त्) - पच्छा.

३) पालि भाषेत अन्त्य 'म' च्या स्थानी नेहमी अनुस्वार असतो.

चितम् - चितं, सत्यम् - सच्चं, तीर्थम् - तित्थं

४) पालिभाषेत विसर्गाचा (ः) चा लोप झाला आहे. संस्कृतातील अकारान्त पदाच्या शेवटी जो विसर्ग असतो त्याच्या जागी पालिमध्ये 'ओ' होतो. इतर ठिकाणी विसर्गाचा अभाव असतो.

बुद्धः = बुद्धो, कः - को, एषः - एसो.

५) विसर्गाच्या पुढे जर स, ज्ञ, ष असेल तर विसर्गाच्या स्थानी 'स' होतो.

दुःसह - दुस्सह, निःशोक - निस्सोक

६) पालिभाषेत 'रेफ (रफार)' चा अभाव आहे. ब्राह्मण - बामण, ब्रह्म - बम्हा

अ) सर्व ठिकाणी संयुक्त व्यंजनातील 'र'चा लोप होतो व उरलेला वर्ण द्वित्व पावतो.

कर्ण - कण्ण, पर्ण - पण्ण, कर्म - कम्म, चक्र - चक्क, चर्म - चम्म, धर्म - धम्म, सर्व - सब्ब

आ) संस्कृत/मराठी मधील शब्दाच्या आरंभी 'र'युक्त जोडाक्षर असल्यास पालित त्या 'र' चा लोप होतो. परंतु उरलेला वर्ण द्वित्व पावत नाही.

ग्राम - गाम, प्रजा - पजा, ग्रंथ - गंथ, प्रिय - पिय, प्रकार - पकार, प्रपंच - पपंच.

इ) 'र्य' बद्दल 'रिय' होतो व 'र्य' मागील दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो.

भार्या - भरिया, सूर्य - सुरिय, आर्य - अरिय, कदर्य - कदरिय.

७) अ) दीर्घ स्वराच्या पुढे संयुक्त व्यंजन किंवा अनुस्वार आल्यास दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो.

मार्दव - मद्दिवं, तीर्थ - तिथं, ईश्वर - इस्सर, पराक्रम - परक्कम, कुर्म - कुम्म

शालम् - सालं, नदीम् - नदिं

आ) ऱ्हस्व स्वरातील अनुस्वाराचा लोप होऊन तो ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो व दीर्घ स्वरावर अनुस्वार आला असेल तर तो दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो.

सिंह - सीह, विंशति - वीसति, संदंश - संडास, मांस - मंस, पांशु - पंसु

८) पदातील आदि 'क्ष' चा 'ख' होतो.

क्षीरं - खीरं, क्षेम - खेम

९) पदातील मध्य 'क्ष'चा काही ठिकाणी 'क्ख' तर काही ठिकाणी 'च्छ' होतो.

दक्षिण - दक्खिण, मोक्ष - मोक्ख, पक्ष - पच्छ, अक्षि - अच्छि, अक्खि

१०) 'ड', 'ढ' चा अनुक्रमे 'ळ' किंवा 'ळह' होतो.

दाडिम - दाळिम, गुड - गुळ, षोडस - सोळस, क्रीडा - कीळा, तडाग - तळाक, आषाढ - आसाळ्ह

११) जोडाक्षरात शेवटचे व्यंजन 'म', 'न', 'य्' किंवा 'व' असेल तर त्याचा लोप होतो व उरलेल्याचे द्वित्व होते.

युग्म - युग्ग, नग्न - नग्ग, सौम्य - सम्म, अध्वा - अद्धा.

परंतु म, न, य, व हे वर्ण 'ह' शी संयुक्त असतील तर त्याचा लोप होत नाही, पण म, न, य, व बदलते.

सह्य - सय्ह, वह्नि - वन्हि, परंतु 'ब्राह्मण' व 'ब्रह्म' या ऐवजी 'बाह्मण', 'बह्म' होतात.

१२) जोडाक्षरातील 'व' चा 'ब' होतो व त्याचे द्वित्व होते.

सर्व - सब्ब, पर्वत - पब्बत

१३) जोडाक्षरांचे पालि शब्दातील इतर काही बदल पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | जोडाक्षर | शब्दारंभी | शब्दामध्ये |
|---|---|---|---|
| १) | त्य, भ्य, द्य, ध्य | च, छ, ज, झ<br>त्याग - चाग<br>युति - जुति<br>ध्यान - झान | च्च, च्छ, ज्ज, ज्झ<br>नृत्य - नच्च<br>मद्य - मज्ज<br>तत्थ - तच्छ |
| २) | स्त, स्थ, ष्ठ | थ, ट, ठ, ट्ठ<br>स्तुति - थुति<br>स्थान - ठान | <br>गृहस्थ - गहट्ठ<br>काष्ठ - कट्ठ |
| ३) | श्च, प्स, त्स | —— | च्छ<br>आश्चर्य - अच्छरिय<br>अप्सरा - अच्छरा<br>वत्स - वच्छ |
| ४) | ष्क, स्क, क्ष | ख<br>स्कन्ध - खन्ध<br>शान्ति - खन्ति | क्ख<br>भिक्षु - भिक्खु<br>शुष्क - सुक्ख |
| ५) | क्ष | छ<br>क्षुब्ध - छुद्ध | च्छ<br>इक्षु - उच्छु |
| ६) | स्प, ष्प | फ<br>स्पदन - फंदन | प्फ<br>पुष्प - पुप्फ |
| ७) | न्य, ण्य, ज्ञ | ञ<br>न्याय - ञाय | ञ्ञ<br>कन्या - कञ्ञा<br>प्रज्ञा - पञ्ञा<br>अरण्य - अरञ्ञ |
| ८) | ष्ण | —— | ण्ह<br>उष्ण - उण्ह |

# धातुरूपाविषयी माहिती (काळ)

१) क्रियावाचक शब्दाला 'धातू' म्हणतात. पालिभाषेत हे धातू १) परस्मपद (परस्मैपद) व २) अत्तनोपद (आत्मनेपद) असे दोन पद प्रकारात विभागले गेले आहेत. मूळ धातूला परस्मैपदाचे प्रत्यय लावून क्रियापद बनवता येते. मात्र संस्कृतातील अनेक आत्मनेपदी धातू पालिभाषेत परस्मैपदी मानून चालवले जातात. एकंदरीत पालिभाषेत आत्मनेपदी क्रियापदांची रूपे कमी आहेत.

२) प्रामुख्याने पालिमध्ये परस्सपदाचा उपयोग करण्यात येतो. आत्मनेपद कर्मणि प्रयोग व कवितेत उपयोगात येते.

३) पालिभाषेत द्विवचन नसल्याने क्रियापद एकवचनी किंवा अनेकवचनी असते.

४) पालि व्याकरणात अनुक्रमे तीन पुरुष आहेत. पालि व मराठी व्याकरणातील पुरुषांमध्ये खालीलप्रमाणे क्रम आहेत-

| पालि | मराठी |
|---|---|
| उत्तम पुरिस | प्रथम पुरुष |
| मज्झिम पुरिस | द्वितीय पुरुष |
| पठम पुरिस | तृतीय पुरुष |

५) काळ व अर्थवाचक काही पालि संज्ञा पुढील प्रमाणे –

| | पालि | मराठी |
|---|---|---|
| १) | पच्चुपन्न कालो | वर्तमानकाळ |
| २) | हीय्यत्तनी /अतीत कालो | भूतकाळ |
| ३) | भविस्सन्ती /अनागत कालो | भविष्यकाळ |

## पच्चुपन्न कालो (वर्तमानकाळ)

वर्तमानकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढील प्रमाणे

| | | | 'पच' - शिजविणे | | | 'अस' - असणे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरिस | एकवचन | अनेकवचन | पुरिस | एकवचन | अनेकवचन | पुरिस | एकवचन | अनेकवचन |
| उत्तमपुरिस | मि | म | उत्तमपुरिस | पचामि | पचाम | उत्तमपुरिस | अत्थि | सन्ति |
| मज्झिमपुरिस | सि | थ | मज्झिमपुरिस | पचसि | पचथ | मज्झिमपुरिस | अस्सि | अत्थ |
| पठमपुरिस | ति | अन्ति | पठमपुरिस | पचति | पचन्ति | पठमपुरिस | अस्मि, अम्हि | अस्म, अम्ह |

(खाद, नम, गच्छ, वस, कस इत्यादी धातू 'पच' प्रमाणे चालतात.)

## हीय्यत्तनी (भूतकाळ)

भूतकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे चालतात –

| | | | 'खाद' - खाणे | | |
|---|---|---|---|---|---|
| पुरिस | एकवचन | अनेकवचन | पुरिस | एकवचन | अनेकवचन |
| उत्तमपुरिस | इं | इम्ह | उत्तमपुरिस | खादिं | खादिम्ह |
| मज्झिपुरिस | इ | इत्य | मज्झिपुरिस | खादि | खादित्य |
| पठमपुरिस | इ | इंसु, ऊं | पठमपुरिस | खादि | खदिंसु, खादुं |

(कीळ, हस, लभ, गच्छ, वस इत्यादी धातू 'खाद' प्रमाणे चालतात.)

## भविस्सन्ती/अनागतकालो (भविष्यकाळ)

भविष्यकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे चालतात –

| | | | ‘पठ’ - शिकणे | | |
|---|---|---|---|---|---|
| **पुरिस** | **एकवचन** | **अनेकवचन** | **पुरिस** | **एकवचन** | **अनेकवचन** |
| उत्तमपुरिस | इस्सामि | इस्साम | उत्तमपुरिस | पठिस्सामि | पठिस्साम |
| मज्झिपुरिस | इस्ससि | इस्सथ | मज्झिपुरिस | पठिस्ससि | पठिस्सथ |
| पठमपुरिस | इस्सति | इस्सन्ति | पठमपुरिस | पठिस्सति | पठिस्सन्ति |

(लभ, गच्छ, नम, वस, कस इत्यादी धातू ‘पठ’ प्रमाणे चालतात.)

## सन्धी

एकापुढे एक येणारे जवळजवळचे वर्ण एकत्र जोडण्याच्या प्रकारास ‘सन्धी’ असे म्हणतात. पालिमध्ये तीन प्रकारचे सन्धी आहेत – १) स्वर सन्धी, २) व्यंजन सन्धी, ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी. पालित विसर्ग नसल्यामुळे विसर्ग सन्धी होत नाही.

### १- स्वर सन्धी

दोन स्वर एकापुढे एक असल्यास ते एकमेकांत मिळून जातात. पालि भाषेतील स्वरसन्धी विषयीचे काही प्रमुख नियम पुढील प्रमाणे आहेत.

(१) ‘अ’पासून ‘ऊ’ पर्यंत स्वरापुढे सजातीय (म्हणजे त्याच प्रकारचा) स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल एक दीर्घ स्वर होतो.

| प्रकार | उदाहरण | सन्धी | प्रकार | उदाहरण | सन्धी |
|---|---|---|---|---|---|
| अ+अ | पन+अयं | पनायं | आ+अ | पादा+अपि | पादापि |
| आ+आ | तण्हा+आकुला | तण्हाकुला | इ+इ | उपद्दहन्ति+इति | उपद्दहन्तीति |
| इ+ई | नहि+इदिसो | नहीदिसो | उ+उ | बहु+उपकारो | बहूपकारो |
| उ+ऊ | बहु+ऊसहन | बहूसहन | | | |

(२) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांचा सन्धी होताना क्वचित पहिल्या स्वराचा लोप होतो.

पुरिस+उत्तमो (= अ + उ) = पुरिसुत्तमो
निलानि+एकानि (=इ+ए) = निलानेकानि
तत्र+इमे (=अ+इ) = तत्रिमे
अज्ज+उपोसथो (= अ+उ) = अज्जुपोसथो
एसो+आवुसो (= ओ +आ) = एसावुसो

(३) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांचा सन्धी होत असता क्वचित पुढच्या स्वराचा लोप होतो.

रुक्खो + अपि (=ओ+अ) = रुक्खोपि
देवो+अम्हि (=ओ+अ) = देवोम्हि
सो+अहं (=ओ+अ) = सोहं
सो+अपि (=ओ+अ) = सोपि
चत्तारो+इमे (=ओ+इ)= चत्तारोमे

(४) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदाचा सन्धी होत असता कधी कधी दोहोंपैकी एकाही स्वराचा लोप होत नाही.

कञ्ञा+इव (=आ+इ) = कञ्ञाइव
लता+इव (=आ+इ) = लताइव

(५) लोप झालेल्या स्वरापुढे 'इ' असेल तर त्याऐवजी 'ए' होतो आणि 'उ' असेल तर त्याचा 'ओ' होतो.

तस्स+इदं (=अ+इ) =तस्सेद
वात+इरितं (=अ+इ) = वातेरितं
वाम+उरू (=अ+उ)=वामोरू
वि+उदकं (=इ + उ) = वोदकं

(६) 'इ' (ऱ्हस्व-दीर्घ) अथवा 'उ' (ऱ्हस्व-दीर्घ) यांच्यापुढे इतर वर्ण आल्यास 'इ' चा 'य' आणि 'उ' चा 'व' होतो.

वि+आकतो (=अ+आ) = व्याकतो
इति + अस्स (=इ +अ) = इत्यस्स (इच्चस्स)
सु+आगतो (=उ+आ)= स्वागतं
बहु+आबाधो (=उ+आ) = बव्हाबाधो

## २- व्यंजन सन्धी

जेव्हा एक व्यञ्जन दुसऱ्या व्यञ्जनाबरोबर अथवा स्वराबरोबर मिळते तेव्हा त्याला व्यञ्जन सन्धी म्हणतात.

(१) जेव्हा एखादया स्वरापुढे पर-अक्षर हे जर व्यञ्जन असेल तर पूर्वी असलेला ऱ्हस्व स्वराचा दीर्घ स्वर होतो आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर होतो –

सम्म+धम्मो (= अ+ध+अ) = सम्माधम्मो
खन्ति+परमं (= इ+प्+अ) = खन्तीपरमं
जायति+सोको (= इ+स्+ओ) = जायतीसोको
मुनि+चरे (=इ +च्+अ) = मुनीचरे

(२) स्वरापुढे व्यञ्जन आले असल्यास केव्हा केव्हा त्या व्यञ्जनाचे द्वित्व होते –

वि+गेहो (=इ+ग्+अ) = विग्गहो
प+गहो (=अ+ग्+अ) = पग्गहो
दु+कतं (=उ+क्+अ) = दुक्कतं

(३) 'ए' आणि 'ओ' च्या नंतर कोणताही वर्ण आल्यास 'ए' आणि 'ओ' चा 'अ' होतो.

याचके+आगते (=ए+आ) = याचकमागते
सो+सीलवा (=ओ+स्+इ) = ससीलवा
एस्सो+धम्मो (=ओ+ध्+अ) = एसधम्मो

## ३- निग्गहित (अनुस्वार) सन्धी

निग्गहिता(अनुस्वार)बरोबर स्वर अथवा व्यञ्जन मिळते तेव्हा त्याला निग्गहित सन्धी म्हणतात.

(१) काही वेळा निग्गहिताचा लोप होतो.

संं+रत्तो = सारतो
संं+रागो = सारागो
कथं+अहं = कथाहं
गन्तुं+कामो = गन्तुकामो
बुद्धानं+सासनं = बुद्धानसासनं
एव+अहं = एवाहं

(२) निग्गहिता (अनुस्वारा)पुढे आलेल्या स्वराचा काही वेळा लोप होतो.

त्वं+असि = त्वंसि
किं+इति = किंती
इदं+अपि= इदम्पि
अलं +इदानि = अलन्दानि

(३) जर निग्गहितानंतर 'य', 'एव' तसेच 'हि' हे शब्द आल्यास, निग्गहिताचा काही वेळा 'ञ्ञ' होतो. तसेच 'य' पुढे आल्यास पूर्वीच्या 'सं' शब्दावरील निग्गहिताचा 'ञ्ञ' होतो.

तं+एव= तञ्ञेव
तं+हि = तञ्हि
सं+यमो = सञ्ञमो
सं+यतो = सञ्ञतो

★ ★ ★

## इयत्ता - नववी

# तोंडी - परीक्षा

**विषय - पालि (संयुक्त) सहामाही आणि वार्षिक** **गुण १०/१०**

सूचना - १) १५-१५ विद्यार्थ्यांचा एक गट तयार करावा.

२) तोंडी परीक्षेची काठिण्यपातळी क्रमबद्ध असावी.

३) तोंडी परीक्षेतील उत्तीर्णता ही स्वतंत्र असेल.

### (१) श्रवण किंवा श्रुतलेखन गुण - ०३

एका-एका गटाला **तीन** ओळींचे अपठितातील पालि शुद्धलेखन देणे.

### (२) प्रकट वाचन गुण - ०३

विद्यार्थ्यांकडून पाठ्य घटकांच्या संदर्भ ग्रंथातील **दोन** गाथा अथवा लहान उतारा वाचून घ्यावा.

### (३) भाषण गुण - ०२

प्रत्येक विद्यार्थ्याला ''मम पाठसाला/उय्यानं/कस्सको/रुक्खो'' इत्यादी विषयांपैकी एखाद्या विषयावर सलग **दोन/तीन वाक्ये** पालित बोलण्यास सांगावे.

### (४) संभाषण गुण - ०२

विद्यार्थ्यांना पालित संभाषण करता यावे. त्यासाठी त्याला पालिभाषेत ''तव नामं किं अत्थि / तव विज्जालयस्स नामं किं अत्थि / त्वं किं वग्ग मज्झे सिक्खसि?'' इत्यादी प्रकारचे प्रश्न विचारून त्यांच्याकडून त्यांची पालिभाषेत उत्तरे वदवून घ्यावीत.

✶✶✶

# प्रश्नपत्रिकेचा आराखडा

## इयत्ता नववी विषय - पालि (संयुक्त)

| वेळ - २ तास | गुण - ४० |
|---|---|

प्र. १. (अ) खालील कोणत्याही **दोन** गद्य उताऱ्यांचे भाषांतर करा. (१०)

१)

२)

३)

(ब) खालील कोणत्याही **तीन** पद्य पाठांचे भाषांतर करा. (०६)

१)

२)

३)

४)

५)

प्र. २. (अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही **तीन**) (०६)

१)

२)

३)

४)

५)

(ब) गाथा पूर्ण करा. (कोणतेही **एक**) (०२)

१)

२)

३)

प्र.३. (अ) पालि प्रश्नांचे पालिभाषेत उत्तरे लिहा. (कोणतेही **दोन**) (०४)

१)

२)

३)

४)

५)

६)

७)

**किंवा**

(ब) खालील कोणत्याही **दोन** टिपांवर पर्याय निवडा (०४)

१) २) ३) ४)

प्र. ४. खालील प्रश्नांची व्याकरणात्मक उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही **चार**) (१२)

(अ) रूपे ओळखा (कोणतेही **तीन**) (०३)

१) २)
३) ४)
५)

(ब) पर्याय निवडा (कोणतेही **तीन**) (०३)

१) २)
३) ४)
५)

(क) जोड्या जुळवा (कोणत्याही **तीन**) (०३)

१) २)
३) ४)
५)

(ड) संधि विग्रह करा. (कोणतेही **तीन**) (०३)

१) २)
३) ४)
५)

(इ) समास ओळखा (कोणतेही **तीन**) (०३)

१) २)
३) ४)
५)

(फ) माध्यम भाषेत शब्दांचे अर्थ सांगा (कोणतेही **तीन**) (०३)

१) २)
३) ४)
५)

★★★














































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – ४११ ००४

पालि - कुसुमावली इयत्ता नववी

₹ : ६७.००

